

**पुण्याचा उडता पंजाब!**

पॉश हॉटेलमधील पार्टीत ड्रग्ज पुरवले गेले. अगदी अल्पवयीन मुलांना दारूदेखील दिल्याचा संशय आहे.



# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS

## » प्रतिक्रिया...

### ना. मोहोळ यांच्या सूचनेनंतर दोन बीट मार्शलचे निलंबन



फर्ग्युसन कॉलेज रोडवर झालेला हा प्रकार अत्यंत भयावह असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय सहकार आणि हवाई वाहतूक राज्यमंत्री ना. मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केली. त्यांच्या सुचनेनंतर येथील जबाबदारी असलेल्या येथील दोन बीट मार्शल वर कामात हलगर्जीपणाचा ठपका ठेवून त्यांना निलंबित करण्यात आले आहे. पोलिसांनी हॉटेल सील केले असून संपूर्ण मद्यसाठा ताब्यात घेतला आहे . हॉटेल पहाटे ५ वाजेपर्यंत सुरू कसे राहिले हा मोठा प्रश्न आहे, असे ना. मोहळ म्हणाले.

### महाराष्ट्र ड्रगमुक्त करू : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे




जिथे ड्रग्ज सापडले तिथे कठोर कारवाई करण्यात येईल. आम्ही महाराष्ट्राला ड्रग्ज मुक्त करू, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यातील या प्रकारावर प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले आहे.

### स्फोटासाठी लागणारे ६७ डेटोनेटर्स सापडले

स्फोट घडविण्यासाठी वापरण्यात येणारे डेटोनेटर्स रात्री पुण्याच्या वडकी नाला परिसरामध्ये सापडले. सुमारे ६७ डेटोनेटर्स असून लोणी काळभोर येथील पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे .

# पुण्यात हे चाललंय तरी काय?

## एफसी रोडवर L3 हॉटेलमध्ये ड्रग्ज विक्री



**पुणे:** एफसी रोडवर नामांकित हॉटेलमध्ये ड्रग्ज विक्री होत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने रविवारी शहरासह राज्यभर मोठी खळबळ माजली. शनिवारी रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या पार्टीत ड्रग्ज पुरवले गेले आणि अनेक अल्पवयीन मुलांना दारूदेखील दिल्याचा संशय आहे. पोलीस व उत्पादन शुल्क खात्याने पाच जणांना ताब्यात घेतले आहे.

शिवाजीनगर भागातील या हॉटेलमध्ये या पार्टीमध्ये काही तरुण बाथरूममध्ये ड्रग्जसदृश पदार्थ घेताना आढळून आले आहेत. एल थ्री लेजर लाऊंज हॉटेलमधील हा प्रकार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या हॉटेलमध्ये खासगी पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. तिथे हा प्रकार घडल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. या हॉटेलवर पोलीस आणि एक्साईज विभागाकडून कारवाई करण्यात येत आहे. हॉटेल मालक आणि पार्टी आयोजकांची चौकशी सुरू आहे.

हे ड्रग्ज, मॅफेनड्रग्स असल्याची प्राथमिक माहितीं आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने पाच जणांना घेतले आहे. त्यात हॉटेलचा मालकसुद्धा आहे. एक मॅनेजर आणि एक कर्मचारी व या हॉटेलचे तीन पार्टनरदेखील पोलिसांच्या ताब्यात असून संतोष कामठे, रवी माहेश्वरी, मानस मलिक, योगेंद्र आणि शर्मा असे ताब्यात घेतलेल्यांची नावे आहेत.

**नशेचा विळखा**

या प्रकाराबाबत आमदार रवींद्र धंगेकर यांनी पोलीस, उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री शंभूराज देसाई आणि राज्य सरकारवर गंभीर आरोप केले. ते म्हणाले, "या प्रकरणामध्ये पूर्णपणे पोलिसांची चूक आहे. अंमली पदार्थ सर्रासपणे मिळतात. हुक्का पार्लरच्या नावाखाली पुणे शहरात असे प्रचंड प्रमाणात अंमली पदार्थ मिळतात. अधिकारी याकडे दुर्लक्ष करतात." दरम्यान, पतित पावनसह अनेक संघटनांनी हॉटेलमध्ये सर्रास ड्रग्ज मिळत असल्याने तीव्र आंदोलने केली.

## बेफाम कारने दुचाकीला उडवले



अपघात

### एकाचा मृत्यू; आमदाराच्या पुतण्यावर गुन्हा दाखल



**पुणे:** पुणे-नाशिक महामार्गावर कळंबजवळ शनिवारी रात्री रॉंग साइडने जाणाऱ्या एसयूव्हीने दुचाकीला धडक दिल्याने एका १९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. अपघातानंतर तेथून पळून गेलेल्या चालकाचे नाव मयूर मोहिते असून तो राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार दिलीप मोहिते यांचा पुतण्या आहे. या प्रकरणी मयूर मोहितेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयूर कार चालवताना दारूच्या नशेत होता, असा आरोप स्थानिकांनी केला आहे. मात्र, आमदार मोहिते यांनी हा आरोप फेटाळून लावला आहे.

ओम सनी भालेराव असे मृताचे नाव असून तो आंबेगाव तालुक्यातील कळंब येथील रहिवासी आहे. एकलहरे गावाजवळ रात्री ९.२५ च्या सुमारास हा अपघात झाला. टोयोटा फॉर्च्युनरचा चालक मयूर साहेबराव मोहिते (वय ३०) शेल पिंपळगाव (ता. खेड) येथील रहिवासी असल्याचे पोलिसांनी सांगितले.

**बेदर 'कार'**

आरोपीने फॉर्च्युनर एसयूव्ही हायवेच्या चुकीच्या बाजूने भरधाव वेगाने चालवली. एसयूव्हीने दुचाकीला धडक दिल्याने ओम खाली पडून त्याला अनेक गंभीर जखमा झाल्या आणि त्याचा मृत्यू झाला. ड्रायव्हरने पीडिताला मदत न करता किंवा वैद्यकीय मदतीची खात्री न देता घटनास्थळावरून पळ काढला. त्याला नंतर अटक करण्यात आली, असे मंचर पोलीस ठाण्यातील एका अधिकाऱ्याने सांगितले.

» पान ११ वर

## पित्यासह काका, चुलतभावाचा अल्पवयीन मुलीवर बलात्कार



**पुणे:** हडपसरमध्ये एका १३ वर्षीय मुलीवर चक्क वडील, काका आणि चुलत भावाकडून बलात्कार करण्यात आल्याची अत्यंत संतापजनक आणि मानवतेने शरमून मान खाली घालावी अशी घटना घडली आहे.


शिक्षणाचे माहेरघर आणि संस्कृती जपणारे शहर असा लौकिक असलेल्या पुण्यात गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत घृणास्पद घटना घडत आहेत. सुजाण अन् सभ्य पुणेकरांकडून त्या त्या वेळी होणारी टीका हवेत विरते न् विरते तोच पुढची आणखी लज्जास्पद घटना घडते. हडपसरमधील ही घटना त्यात मालिकेचा भाग ठरली आहे. गंभीर गोष्ट म्हणजे मुलीचे वडील, चुलते आणि चुलत भावानेच हा बलात्कार केल्याची तक्रार पीडित मुलीच्या आईने दिली आहे. पीडित मुलीने यासंदर्भात आईकडे तक्रार केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार जुलै २०२२ ते जून २०२४ या कालावधी दरम्यान घडला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी तिच्या आई, वडील, काका व चुलत भाऊ यांच्यासह एकत्र कुटुंबात मांजरी भागात वास्तव्यास असून हे कुटुंब परप्रांतीय आहे. पीडित मुलीवर जुलै २०२२ मध्ये तिच्या चुलत भावाने राहत्या घरामध्ये बलात्कार केला. त्यानंतर त्याने तिला ठार मारण्याची धमकी दिली. नंतर जानेवारी २०२४ मध्ये पीडित तरुणीच्या काकाने रात्रीच्यावेळी फायदा घेत तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर काही दिवसांनी या मुलीची आई गावी गेलेली असताना तिच्या वडिलांनी बलात्कार करण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी, पीडित मुलीने वडिलांना विरोध केला असता त्यांनी तिला मारहाण केल्याचेही आईने पोलिसांत दिलेल्या फिर्यादीमध्ये नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, याप्रकरणी पुढील तपास हडपसर पोलिसांकडून सुरू आहे.

**मानवता शरमली!**







## किल्ले सिंहगडावर पालखी सोहळा

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शंख, हलगी आणि पारंपरिक वाद्यांचा गजर, भंडारा आणि फुलांची उधळण, 'जय भवानी, जय शिवराय' व 'छत्रपती संभाजी महाराज की जय'चा अखंड जयघोष आणि छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती ठेवलेल्या पालखीवर झालेली पुष्पवृष्टी... अशा शिवमय वातावरणात सिंहगडावर शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित पालखी सोहळा थाटात साजरा झाला. भगवे झेंडे घेऊन सिंहगडावर शिवरायांना मानवंदना देण्यासाठी जमलेल्या शिवभक्तांच्या जनसागराने इतिहासात घडलेला हा सुवर्णक्षण पुन्हा एकदा अनुभवला.

विश्व हिंदू परिषद, पुणे व श्री शिवराज्याभिषेक अभिवादन समिती (किल्ले सिंहगड) च्या वतीने तिथीनुसार श्री शिवराज्याभिषेक दिन व धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त किल्ले सिंहगड येथे भव्य अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. सोहळ्याचा प्रारंभ रविवारी सकाळी छत्रपती राजाराम पूलाजवळील वीर बाजी पासलकर स्मारकापासून

» पान ११ वर

**अभिवादन :** विश्व हिंदू परिषद, पुणे व श्री शिवराज्याभिषेक अभिवादन समितीच्या वतीने किल्ले सिंहगड येथे भव्य अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पालखी मिरवणुकीत सहभागी झालेले शिवभक्त.

## बस झाडावर आदळून ३० जण जखमी

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दौंड तालुक्यात पुणे-सोलापूर रस्त्यावर यवतजवळ एसटी बस भरधाव वेगाने झाडावर आदळल्याने झालेल्या अपघातात जवळपास ३० प्रवासी जखमी झाले आहेत. ही बस पंढरपूरहून मुंबईकडे जाण्यासाठी निघाली होती. मात्र, सहजपूर गावाच्या हद्दीत या बसला अपघात झाला.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलीस प्रशासनानेही घटनास्थळी धाव घेतली. या अपघातानंतर जखमींना लोणी काळभोर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. चालकाचे बसवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला असल्याची प्राथमिक माहिती आहे.

## कुणबी प्रवर्गाचा वाद मिटता मिटेना



### मुस्लिम कुणबींनाही आरक्षण द्या : जरांगे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** राज्यात काही ठिकाणी मुस्लीम समाजाच्याही कुणबी म्हणून नोंदी सापडल्या आहेत. त्यामुळे आता मुस्लिमांनाही ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे, असे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले, "माळी समाजाला व्यवसायाच्या आधारावर आरक्षण दिले असेल तर आम्हीदेखील तुम्हाला आमचे व्यवसाय दाखवतो. ते बागायती शेती करतात म्हणून त्यांना आरक्षण देण्यात आले. » पान ११ वर

**» कलगीतुरा**

### कुणबी नोंदी असतील तर कोण रोखेल? : हाके

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जालना :** कुणबी नोंदी असतील तर कोणी रोखू शकत नाही. कारण मंडल आयोगात कुणबी बाय डिफॉल्ट आहेत. कुणबी दाखले रद्द करता येत नाहीत. पण मराठा लिहून त्यापुढे 'कु' लावायचं. कुणबी हा प्रवर्ग वेगळा आहे, असे ओबीसी आरक्षण आंदोलक लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे.

» पान ११ वर

## पाच दिवस मुसळधार पाऊस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली:** पश्चिम किनारपट्टीवर येत्या पाच दिवसांत विजांच्या कडकडाटांसह मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे. तेलंगणा, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये मुसळधार पावसाची शक्यता असून, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, कर्नाटक, केरळ, लक्षद्वीप आणि गुजरातमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे, असे हवामान खात्याने म्हटले आहे.

आयएमडीच्या निवेदनानुसार, पुढील ५ दिवसांत मध्य प्रदेश, विदर्भ आणि छत्तीसगडमध्ये वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. कर्नाटक आणि केरळच्या किनारपट्टीवरही मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. केरळमधील कोझिकोड, वायनाड आणि कन्नूर जिल्ह्यात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## वाघोलीत चिरडून एक ठार

**शिक्रापूर :** एसटी बसची धडक बसल्याने ४० वर्षीय पादचाऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची घटना पुणे - नगर महामार्गावर वाघोली येथे एसबीआय बँकेसमोर समोर घडली. अपघातातील मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पादचारी पुणे - नगर महामार्ग ओलांडत होता. राजगुरूनगर ते पैठण ही बस नगरच्या दिशेने जात असताना त्याला बसची धडक बसली. मागील चाकाखाली आल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघाताच्या ठिकाणी रक्ताचा सडाच पडला होता. मृत व्यक्तीला ससून रुग्णालयात हलवून बस रस्त्यातून हटविली. या अपघातामुळे वाहतूक कोंडी झाली होती. अपघातानंतर बस चालक पळून गेला होता. नंतर तो पोलीस ठाण्यात आला.

## 'काश्मिरात दहशतवाद अंतिम श्वास घेतोय'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जम्मू:** जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद शेवटचा श्वास घेत आहे. अलीकडील दहशतवादी कारवाया शत्रूच्या हतबलतेची चिन्हे आहेत, असे लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी रविवारी सांगितले.

रियासी जिल्ह्यातील सबसिडरी पोलिस ट्रेनिंग सेंटर येथे जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या सोळाव्या बेसिक रिक्रूट ट्रेनिंग कोर्स बॅचच्या पासिंग आऊट परेडला संबोधित करताना सिन्हा म्हणाले की, दहशतवादी आणि त्यांना आश्रय देणाऱ्या त्यांच्या साथीदारांचा शोध घेणे गरजेचे झाले आहे. दहशतवाद शेवटचा



श्वास घेत असल्याने दहशतवादाचा समर्थक शेजारी हताश झाला आहे. जम्मू आणि काश्मीरच्या मातीतून दहशतवादाचे संपूर्ण उच्चाटन करणे हेच प्रशासनाचे उद्दिष्ट आहे.

पोलिसांच्या भूमिकेचे कौतुक करताना सिन्हा म्हणाले की, त्यांनी अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत नेहमीच उच्च पातळीवरील काम करून दाखवले आहे.

## 'मुस्लिमांनी दिली कॉंग्रेसला मते'


■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी दावा केला आहे की, नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत बांगलादेशी मुस्लिमांनी कॉंग्रेसला भरभरून मतदान केले. बांगलादेशी अल्पसंख्याक आसाममधील जातीयतेला खतपाणी घालणारा आहे, असा आरोप सरमा यांनी केला.

सरमा यांनी म्हटले की, केंद्र आणि राज्यातील भाजप प्रणित सरकारने अल्पसंख्यांकासाठी केलेल्या विकास कामांचा विचार न करता अल्पसंख्याकांनी कॉंग्रेसला एकगठ्ठा मतदान केले.

## गगनाला भिडणाऱ्या भाजीपाल्याने ग्राहकांचे तोंड आंबट

# टोमॅटोची उसळी; किलोला गाठली शंभरी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** काही दिवसांपूर्वीच कांद्याने ग्राहकांना रडवले होते आणि आता टोमॅटोने तोंड आंबट केले आहे. पूर्वमोसमी पाऊस आणि त्यानंतर कडक उन्हामुळे टोमॅटोच्या लागवडीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे टोमॅटोसह सर्व भाज्यांचे दर गगनाला भिडले आहेत. बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका टोमॅटोला बसला आहे. परिणामी, सध्या देशभरातील बाजारात टोमॅटो दराने मोठी उसळी घेतली आहे. उत्पादन घटल्याने नेहमीच्या तुलनेत आवक निम्मीच झाल्याने टोमॅटोचे भाव गगनाला भिडले आहेत. एरवी घाऊक बाजारात १० ते २० रुपये किलो भावाने विक्री होणाऱ्या टोमॅटोला आता ५० ते ६० रुपये भाव मिळत आहे. परिणामी,

» पान ११ वर

### टोमॅटो लाल, ग्राहक पांढराफटक

• यंदाच्या पावसाळ्याच्या तोंडावर अनेक भागांमध्ये पडलेल्या भीषण उष्णतेचा फटका टोमॅटो पिकाला बसला. मुंबई आणि महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये टोमॅटोला सध्या १०० रुपये प्रति किलो इतका उच्चांकी दर मिळत आहे. तर महाराष्ट्राशिवाय तामिळनाडू, कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये देखील टोमॅटोचे दर देखील ८० ते १०० रुपये प्रति किलोपर्यंत पोहचले आहेत.

#रा

**तरुणांनो सावध व्हा ! :** ड्रग्जची किक अत्यंत कमी किंमतीत, मिळत असल्याने या ड्रगची तस्करी वाढतच असून, पोलिस आणि तरुण पिढीसमोरचे ते एक आव्हान आहे. त्याचे दुष्परिणाम फारच घातक आहेत.



### विज्ञान भारतीच्या सहाव्या राष्ट्रीय अधिवेशनात

# 'अध्यात्म आणि विज्ञान' वर परिसंवाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**परिसंवादात मार्गदर्शन :** विज्ञान भारतीच्या सहाव्या राष्ट्रीय अधिवेशनात 'अध्यात्म आणि विज्ञान' या विषयावरील परिसंवादात डॉ. जितेंद्र सिंह यांनी आपले विचार मांडले.

**पुणे :** "आपली प्राचीन समृध्द परंपरा आणि आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान यांचा सुरेख संगम घडवून भारतीयांनी गेल्या काही वर्षात जगासमोर एक नवा आदर्श घालून दिला आहे," असे प्रतिपादन केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान व पृथ्वी विज्ञान राज्यमंत्री (स्वतंत्र कार्यभार) डॉ. जितेंद्र सिंह यांनी बोलताना केले.

विज्ञान भारतीच्या सहाव्या राष्ट्रीय अधिवेशनात 'अध्यात्म आणि विज्ञान' या विषयावरील परिसंवादात डॉ. जितेंद्र सिंह यांनी आपले विचार मांडले. लोणी काळभोर येथील एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या प्रांगणातील विश्वशांती सभागृहात झालेल्या परिसंवादावेळी रामकृष्ण मठ पुणेचे अध्यक्ष स्वामी श्रीकांतानंद, माजी संरक्षण सचिव डॉ. सतीश रेड्डी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर, एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा. कराड, विज्ञान भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शेखर मांडे आदी उपस्थित होते. या अधिवेशनात देशभरातून १५०० प्रतिनिधी उपस्थित आहेत.

डॉ. जितेंद्र सिंह म्हणाले, "भारताची आयुर्वेदासारखी प्राचीन विद्या कोरोना काळात खऱ्या अर्थाने उपयोगी पडली. कोरोनावर जगभर झालेल्या उपचार पद्धतीमध्ये आयुर्वेदिक औषधांचा प्रामुख्याने वापर केला गेला. गेल्या काही वर्षात जगभर विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात मोठी प्रगती झाली असून, त्यात भारताचा सहभाग पहिल्या श्रेणीतील राहिला असल्याचे जितेंद्र सिंह यांनी स्पष्ट केले. जागतिक पातळीवर संशोधन क्षेत्रात २०१४ मध्ये ८१ व्या क्रमांकावर असलेला भारत २०२२ मध्ये ४० व्या स्थानावर पोचला असून, त्यामध्ये स्टार्टअपसारख्या उद्योगांचा मोलाचा वाटा आहे."

> समुद्र मंथनाचे नवे आव्हान स्वीकारण्यास आता आपण सज्ज झालो आहोत. या संशोधनातून खनिज, धातू आणि जैववैविध्यामध्ये, तसेच माशांच्या निर्यातीत भारत अग्रक्रमावर पोहोचेल. भविष्यात भारताच्या या प्रगतीचा आलेख असाच चढता राहण्यासाठी खासगी आणि सरकारी क्षेत्रातील उद्योगांचे एकत्रीकरण, प्राचीन सामग्रीचा वापर आणि पारंपरिक ज्ञानाचा आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून वापर या तीन गोष्टी अत्यावश्यक आहेत,"
>
> — डॉ. जितेंद्र सिंह

स्वामी श्रीकांतानंद यांनी विज्ञान व अध्यात्मविषयी स्वामी विवेकानंद यांचे विचार मांडले. भारतीय संस्कृती, परंपरा, अध्यात्म आणि विज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यात त्यांनी मोठे योगदान दिल्याचे त्यांनी नमूद केले. विज्ञानाने प्रगती होत असली, तरी ती स्वार्थीपणाकडे घेऊन जाणारी आहे. त्यामुळे देशाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जात असतानाच संस्कार, संस्कृतीचे रक्षण होणे गरजेचे आहे. त्यामुळे विज्ञान आणि अध्यात्माची सांगड घालून पुढे जायला हवे, असे त्यांनी नमूद केले.

डॉ. सतीश रेड्डी म्हणाले की, "पूर्वी भारत संरक्षण क्षेत्रासाठी लागणारी उपकरणे, शस्त्रे आयात करत असे. गेल्या काही वर्षात भारतात मोठ्या प्रमाणावर संशोधन झाले असून, आत्मनिर्भर भारत, मेक इन इंडिया यांसारख्या उपक्रमामुळे आज आपण मिसाईल, शस्त्रे निर्मितीत स्वयंपूर्ण होऊन निर्यातही करू लागलो आहोत. अमेरिका, रशिया आणि चीननंतर प्रगत तंत्रज्ञान असलेला देश म्हणून भारताची ओळख झाली आहे. लढाऊ विमानांची निर्मिती आपण करत आहोत. संरक्षण क्षेत्रात आपण अधिक सक्षम व आत्मनिर्भर झालो आहोत."

## » Selected

### सतार निर्माते हाजी अहमद सो आबासो यांचा विशेष सन्मान

**पुणे :** सुप्रसिद्ध सतारवादक उस्ताद रहिमत खाँ साहेब, उस्ताद अब्दुल करीम खाँ साहेब, उस्ताद बाले खाँ साहेब यासोबतच त्यांच्या पुढील पिढीतील कलाकारांबरोबरच उस्ताद बडे गुलाम अली खाँ साहेब, पंडित मल्लिकार्जुन मन्सूर, गंगुबाई हनगल, पंडित बसवराज राजगुरु यांसारख्या कलाकारांसाठी १९४० पासून सतार या वाद्याची निर्मिती करणारे मिरज येथील ९९ वर्षांचे सुप्रसिद्ध सतार निर्माते हाजी अहमद सो आबासो यांचा ६ व्या सतार नवाज उस्ताद बाले खान संगीत महोत्सवात विशेष सम्मान करण्यात आला. याबरोबरच तालवाद्य कलाकार माऊली टाकळकर यांचाही सन्मान करण्यात आला. पुण्यातील सुहाना बसंत फाउंडेशन आणि कन्नड संघ या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ६ व्या सतार नवाज उस्ताद बाले खान संगीत महोत्सवात मिरज राजघराण्याच्या गायत्रीदेवी पटवर्धन यांच्या हस्ते हे सन्मान करण्यात आले. कन्नड संघाच्या, उपाध्यक्षा इंदिरा सालियान, सचिव मालती कलमाडी, सुप्रसिद्ध सतारवादक छोटे रहिमत खाँ, सुहाना बसंत फाउंडेशनचे अध्यक्ष आणि सुप्रसिद्ध सतारवादक रईस खान आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. एरंडवणे येथील डॉ कलमाडी श्यामराव हायस्कूलच्या शकुंतला शेट्टी सभागृहात सदर महोत्सव संपन्न झाला.



राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## वाहनाचे योग्यता प्रमाणपत्राचे तातडीने नुतनीकरण करा

### आरटीओकडून आवाहन



**पुणे** : नवीन शैक्षणिक वर्षे १५ जूनपासून सुरू झाले. त्यामुळे शहरासह जिल्ह्यात सर्वच रस्त्यावर स्कूल बसमधून विद्यार्थ्यांची वाहतूक केली जात आहे. या शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक होण्याच्या दृष्टीने संबधित बस, व्हॅनचे योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत असणे आवश्यक आहे. तरी सर्व शाळा, महाविद्यालय व्यवस्थापन तसेच खासगी स्कूल बस मालकांनी तत्काळ आपल्या वाहनाचे योग्यता प्रमाणपत्र तातडीने नुतनीकरण करून घ्यावे, यासाठी पुणे आरटीओकडून विशेष सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.धोकादायक वाहने रस्त्यावर आणू नका. तत्काळ आपल्या वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र अद्ययावत करून घ्या, असे आवाहन पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

शहरात आरटीओकडे नोंद असलेल्या स्कूल व्हॅन व बसची संख्या जवळपास सहा हजार ८९५ इतकी आहे. या सर्व स्कूल व्हॅन व बसमधून दिवसाला साधारण चार लाखांच्या पुढे विद्यार्थ्यांची वाहतूक केली जाते. प्रत्येक वर्षी स्कूल व्हॅनला स्कूल बस नियमावलीनुसार योग्यता प्रमाणपत्राचे नूतनीकरण करुन घ्यावे लागते. नूतनीकरण करुन न घेणाऱ्या स्कूल बस व्हॅनवर आरटीओकडून कारवाई केली जाते.

> शालेय बस किंवा व्हॅन या वाहनांना योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण तपासणीसाठी अपॉइंटमेंट घेण्याची आवश्यकता नाही. या वाहनांनी शुल्क भरणा करून दिवे किंवा आळंदी रस्ता कार्यालययात तपासणी करून योग्यता प्रमाणपत्र घेऊ शकतात. तसेच रविवारी सुट्टीच्या दिवशीही नुतनीकरणाचे काम सुरू आहे. त्याबाबत कोणतीही अडचण असल्यास उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, संगम ब्रिज याठिकाणी संपर्क साधावा.
>
> — अर्चना गायकवाड, प्रादेशिक परिवहन अधिकारी

## पदवी प्रदान ..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



# पै वेदा ॲनिमेशन कॉलेजचा पदवी पुरस्कार सोहळा मोठ्या दिमाखात साजरा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एमसीई सोसायटीच्या पै वेदा ॲनिमेशन कॉलेज, आझम कॅम्पसमध्ये पदवी पुरस्कार सोहळा मोठया उत्साहात पार पडला. विद्यार्थ्याच्या जीवनातील सर्वात प्रतीक्षेचा दिवस म्हणजे पदवी मिळणे असल्याने त्यांच्यासाठी हा दिवस मोठ्या आनंदाचा होता. बॅच - २०२२-२३ चे विद्यार्थी त्यांचे पालक या पदवी पुरस्कार सोहळ्याला उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहसंस्थापक आणि CTO - गॉडस्पीड गेम्स द्रुहीन मुखर्जी, सन्माननीय अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (नाशिक) चे प्रादेशिक संचालक डॉ. विश्वास गायकवाड तसेच पै वेदा ॲनिमेशन कॉलेजचे प्राचार्य डॉ. ऋषी आचार्य आणि अध्यापक उपस्थित होते.

महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष आणि डॉ पी ए इनामदार विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. ए. इनामदार, एमसीई सोसायटीच्या उपाध्यक्ष आबेदा इनामदार, एमसीई सोसायटीचे सचिव प्रा. इरफान शेख, एमसीई सोसायटीचे खजिनदार प्रा. मुझफ्फुर शेख यांचे सतत सहकार्य महाविद्यालयाला लाभत असल्याचे प्राचार्य डॉ. ऋषी आचार्य यांनी सांगितले.

डॉ. विश्वास गायकवाड म्हणाले, चांगला व्यवसाय आणि उद्योग निवडण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. विद्यार्थ्यांनी जीवनात सतत शिकत राहून यश मिळवण्यासाठी पुढे जावे.

प्राचार्य डॉ. ऋषी आचार्य म्हणाले, आम्ही आमच्या महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देत राहू आणि त्यांना एक चांगला उद्योजक बनविण्यासाठी मार्गदर्शन करू. आम्ही दुहेरी पदवी कार्यक्रमाच्या सूचनांचा देखील विचार करू आणि विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने अंमलबजावणी करू.

> आज सर्व विद्यार्थी पदवी मिळाल्यामुळे शिक्षणाच्या भीतीतून बाहेर पडून उद्योग आणि करिअरच्या आणखी एका भीतीत प्रवेश करत आहेत. पण भीती चांगली असावी जिचा उपयोग आपण सर्वांनी आपले भविष्य उज्ज्वल करण्यासाठी केला पाहिजे."
>
> — द्रुहीन मुखर्जी

## ध्येय प्राप्तीसाठी मेहनत घ्या : डॉ. दिलीप देशमुख

**पुणे :** 'अभ्यास हे एक शास्त्र असून त्यासाठी वेगळी पद्धती अवलंबल्यास विद्यार्थ्यांना फायदा होऊ शकतो. अभ्यासासोबत अवांतर वाचन केल्यास भविष्यात निश्चितच फायदा होईल. माहितीचे रुपांतर ज्ञानात करणे आवश्यक असून, जेवढ्या शंका मनात येतील त्या सर्व शिक्षकांना विचारा. ध्येय प्राप्तीसाठी मेहनत घ्या, तुम्ही यशस्वी नक्की व्हाल,' असे शिक्षणतज्ज्ञ डॉ दिलीप देशमुख म्हणाले. कसबा विधानसभा निवडणूक प्रमुख हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित मार्गदर्शन शिबिरात ते बोलत होते.

शैक्षणिक क्षेत्रात वाढत असलेल्या स्पर्धेमुळे विद्यार्थी आणि पालक हे तणावाखाली असल्याचे समोर येत आहे. अभ्यासाचे उत्तम नियोजन कसे करावे? अभ्यास करताना कोणते तंत्र अवलंबिले जावे आणि पालकांनी काय काळजी घ्यावी, यासाठी कसबा विधानसभा भाजपा निवडणूक प्रमुख हेमंत रासने आणि भाजपा कसबा विधानसभा यांच्यावतीने मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते.

शिक्षणतज्ज्ञ दिलीप देशमुख यांनी विद्यार्थांना अत्यंत सहज आणि सोप्या भाषेत अभ्यासाचे उत्तम नियोजन, अचूक वेळेचे व्यवस्थापन, आणि पध्दतींच्या बाबतीत बहुमोल मार्गदर्शन केले. आणि अभ्यासपद्धती सांगितल्या.



# पालिकेत पदे रिक्तच; नागरिकांच्या कामांचा खोळंबा !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** महापालिकेत उपायुक्तांची १८ पदे आहेत, त्यात ९ पदे महापालिकेच्या अधिकाऱ्यांसाठी तर ९ पदे शासनाकडून प्रतिनियुक्तीने भरली जातात. त्यातील शासनाकडील केवळ ३ पदावरच अधिकारी नियुक्त असून उर्वरीत सहा पदे रिक्त आहेत. त्यामुळे या पदांचा कारभार महापालिका प्रशासनाने इतर उपायुक्तांमध्ये विभागून दिला आहे. त्यातच या अधिकाऱ्यांना दोन्ही पदांच्या कामकाजावर लक्ष देता येत नसल्याने त्याचा परिणाम पालिका प्रशासकीय कामकाजावर होत असल्याचे चित्र आहे.

राज्य शासनाने लोकसभा निवडणूकीपूर्वी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांच्यासह, चार उपायुक्तांची बदली केली होती. त्यानंतर अद्याप या पदांवर कोणत्याही अधिकाऱ्यांची प्रति नियुक्ती झालेली नसली तरी महापालिकेत सध्या कार्यरत असलेले अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे यांची बदली होणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे त्यांची बदली झाल्यास महापालिकेचा कारभार आयुक्त आणि एका अतिरिक्त आयुक्तांवर येऊन पडणार आहे.

### पालिकेच्या कारभारावर परिणाम

● राज्यात दोन ते तीन महिन्यांत विधानसभा निवडणूका होणार आहेत. त्यामुळे पालिका प्रशासनाची विकासकामे मार्गी लावण्याची लगबग सुरू असतानाच पालिका आयुक्तांच्या खालोखाल शहराचा प्रशासकीय कारभार सांभळण्यासाठी आवश्यक असलेली सहा उपायुक्तांची पदे रिक्त आहेत. या शिवाय, एक अतिरिक्त आयुक्तांचे पदही रिक्त असून त्यांच्याकडील सर्व खात्यांचा कारभार महापालिका आयुक्तांनी स्वत:कडे ठेवला आहे. त्याचा परिणाम प्रशासकीय कामकाजावर होत असल्याचे चित्र आहे. तसेच नागरिकांच्याही कामांचा खोळंबा होत आहे.

# आरटीई अधिनियम मागे घ्या, मुलांचे शाळा प्रवेश करा : आप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** आरटीई खाजगी शाळांमधील राखीव जागा प्रवेशासंदर्भात सरकारने चुकीचा आदेश काढला. तो शिक्षण हक्क विरोधी असल्यामुळे कोर्टाने त्याला स्थगिती दिली. परंतु सरकारने तो अजूनही मागे घेतलेला नाही. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया अजूनही कोर्टात रेंगाळली आहे. हा आदेश युती सरकारने मागे घ्यावा आणि प्रवेश प्रक्रिया तातडीने सुरू करावी म्हणून आप पालक युनियन, आम आदमी पार्टीच्या नेतृत्वात पालकांनी बालगंधर्व चौकात आंदोलन करण्यात केले.

यंदा आरटीई राखीव शाळा प्रवेश तब्बल २ महीने रखडले आहेत. शासनाने काढलेल्या आदेशास उच्च न्यायालयाने शिक्षण हक्क विरोधी ठरवत स्थगिती दिली आहे परंतु शासनाने कायदा अधिसूचना मागे न घेतल्याने त्या बाबत खाजगी शाळा विविध हस्तक्षेप याचिका दाखल करीत आहेत. त्यांच्या सुनावणीस तारखा पडत असल्याने शाळा प्रवेश लॉटरी जाहीर करण्यास कोर्टाने मनाई केली आहे. या खाजगी राखीव जागांवरील प्रवेशाच्या अपेक्षेने महाराष्ट्रात जवळपास अडीच लाख पालकांनी अर्ज भरले असून त्यांची मुले या प्रवेश प्रक्रियेची वाट पाहत आहेत. दरम्यान सर्व खाजगी शाळा आणि सरकारी शाळा सुरू झालेल्या आहेत. या शालाबाह्य अडीच लाख मुलांना खाजगी शाळांमध्ये लॉटरी लागून प्रवेश मिळेल की नाही याची शाश्वती नाही. त्यामुळे पालक द्विधा मनस्थितीत आहेत. इतर मुले शाळेत जावू लागल्याने मोफत प्रवेशाची वाट पाहत असलेल्या मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होतो आहे. त्यांचे शैक्षणिक नुकसानही होते आहे. याला शिक्षणमंत्री केसरकर आणि युती सरकारच जबाबदार आहे असा आरोप मुकुंद किर्दत यांनी आज आंदोलनात केला.

### महापालिकेद्वारे मृत प्राण्यांची विल्हेवाट लावणारा प्रकल्प महिनाभरात सुरु

# कारकस प्रकल्पाला हिरवा कंदील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेकडून पाच ते सहा वर्षांपूर्वी मुंढवा येथील महापालिकेच्या जागेत मृत प्राण्यांची विल्हेवाट लावण्यासाठी सुमारे तीन कोटी रूपये खर्चून कारकस प्रकल्प उभारण्यात आला होता. मात्र, या प्रकल्पास विरोध झाल्याने तसेच काही नागरिक न्यायालयात गेल्याने हा प्रकल्प बंद होता. मात्र, एनजीटीने त्यावरील स्थगिती उठविली असल्याने पुढील महिनाभरात हा प्रकल्पही सुरू केला जाणार असून एक टन क्षमतेचा हा प्रकल्प आहे.मात्र या नव्या प्रकल्पाच्या खर्चाचा बोजा पुन्हा पालिकेला सहन करावा लागणार आहे.

चिकन, मटण आणि पोर्कची दुकाने आहेत. मांस विक्री केल्यानंतर शिल्लक राहणाऱ्या चिकन, मटण वेस्टचे संकलन करून त्यावर प्रक्रिया करणारा एकही प्रकल्प महापालिकेकडे नाही. त्यामुळे पालिकेकडून या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी उरूळी देवाची येथील कचरा डेपोच्या जागेत चिकन व मटण वेस्ट प्रकिया प्रकल्प उभारला जाणार आहे. सध्या, अशा कचऱ्याचे संकलनही होत नसल्याने हे व्यावसायिक हा कचरा नाले, चेंबर, ओढ्यात तसेच टेकडयांवर अथवा उघड्यावर टाकतात. परिणामी, सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याने महापालिकेकडून हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी यातील कोणताही कचरा जाळला जाणार नाही तसेच हा प्रकल्प पूर्णत: धूर विरहित असणार आहे.

### प्रकल्प परिसरात बफर झोन गरजेचा

● स्वच्छ भारत अभियान सर्वेक्षणातही मटण वेस्टचा प्रकल्प उभारण्याच्या सूचना आहेत. प्रकल्पास विरोध असल्याने पालिकेकडे त्यासाठी जागाच नाही. प्रकल्पासाठी पालिकेस २० गुंठे जागा आवश्यक असून, त्या परिसरात २०० मी. बफर झोन असणे आवश्यक आहे, अशी जागा केवळ उरूळी देवाची येथील कचरा डेपो मध्येच असल्याने पालिकेकडून कचरा डेपोच्या परिसरात हा प्रकल्प उभा करण्याचे नियोजन सुरू आहे.





#रा

## 'नृत्य रूपक' कार्यक्रमात कथकचे बहारदार सादरीकरण !



**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत आयोजित 'नृत्य रूपक' कार्यक्रमात कथक नृत्याचे बहारदार सादरीकरण करण्यात आले. 'रूपक नृत्यालय, पुणे 'तर्फे प्रस्तुत या सादरीकरणाला उपस्थित रसिकांनी भरभरून दाद दिली , अशी माहिती भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी दिली. नुकत्याच रशियातील मॉस्को येथे पार पडलेल्या सातव्या ब्रिक्स फेस्टिवलमध्ये पुण्याच्या रूपक नृत्यालयाने यशस्वीरित्या भारताचे प्रतिनिधित्व केले होते, या दौऱ्याचे अनुभव देखील उलगडून दाखविण्यात आले. माजी नगरसेविका माधुरी सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते कलाकारांचा प्रशस्तीपत्रक आणि ज्ञानेश्वरीची प्रत देऊन सत्कार करण्यात आला. रूपक नृत्यालयाच्या संचालक मंजिरी कारुळकर आणि १० कलाकारांनी ब्रिक्स महोत्सवात सादर केलेल्या कथक नृत्याचे सादरीकरण आणि तेथील अनुभवकथन या कार्यक्रमात आयोजित केले होते. त्यांच्याशी नीरजा आपटे यांनी संवाद साधला. 'गजझंपा ताल 'सादर केला. राग मल्हार वर आधारित वर्षाऋतू ची नृत्य प्रस्तुती सादर करण्यात आली. नृत्यगुरु मंजिरी कारूळकर यांनी रशियन कविता प्रस्तुत केली. कार्यक्रमाची सांगता ' गंगावतरण ' या नृत्य प्रस्तुतीने झाली. भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह येथे कार्यक्रम झाला.

# मिळकतीच्या सर्वेक्षण मोहिमेसाठी तब्बल ३७५ अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध




**पुणे :** मिळकतींची संख्या मोठी असल्याने आणि महिनाभरात हे काम पूर्ण करायचे उद्दीष्ट ठेवल्याने मिळकत कर विभागाला अतिरिक्त मनुष्यबळाची गरज होती. यासाठी अतिरिक्त आयुक्तांनी अतिक्रमण विभागाकडील ७५ सहाय्यक निरीक्षक, घन कचरा व्यवस्थापन विभागाकडील १५० आरोग्य निरीक्षक, पंधरा क्षेत्रिय कार्यालयातील प्रत्येकी पाच असे ७५ मोकादम आणि अन्य विभागातील ७५ टंक लिपिक उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले.

शासनाच्या आदेशानुसार महापालिका पालिका प्रशासनाने शहरातील निवासी मिळकत धारकांना मागील आर्थिक वर्षापासून मिळकत करामध्ये चाळीस टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. मूळ मालकच मिळकतीत राहात असलेल्यांनाही सवलत मिळणार आहे. यासाठी महापालिकेने मागील वर्षी एका ठराविक मुदतीत मिळकत धारकांकडून तेच मिळकतीत राहात असल्याबाबत पीटी थ्री फॉर्म भरून घेतले होते. परंतु या मिळकतीस पात्र असलेल्या सुमारे साडेचार मिळकतींपैकी जेमतेम ६७ हजार मिळकत धारकांनीच हे फॉर्म भरले. त्यामुळे उर्वरित मिळकत धारकांना शंभर टक्क्यांनुसार कर आकारणी करण्यात आली. यावरून बराच गोंधळ झाल्यानंतर महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी मागील शनिवारपासून या सर्व मिळकतींचे सर्वेक्षण आणि मालक त्याठिकाणी राहात असल्यास तेथेच पीटी थ्री फॉर्म भरून घेउन त्यांना करात सवलत देण्यासाठी विशेष मोहीमेची घोषणा केली.

सर्वेक्षणाचे काम पूर्ण होईपर्यंत हे मनुष्यबळ कर आकारणी विभागाशी संलग्न राहाणार असून त्यांवर केवळ सर्वेक्षणाची जबाबदारी राहणार आहे. त्यांना कर वसुलीचे कुठलेही अधिकार राहाणार नाहीत, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. २४ जूनपासून हे अतिरिक्त मनुष्यबळ सर्वेक्षणाचे काम सुरू करणार आहे.

### आयुक्तांचे आदेश

● सदनिकाधारकांना मिळकत करातील चाळीस टक्के सूट देण्यासाठी महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्यावतीने घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येत आहे. या कामासाठी अतिक्रमण विभागाकडील ७५ सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक, घन कचरा व्यवस्थापन विभागाकडील १५० आरोग्य निरीक्षक आणि पंधरा क्षेत्रिय कार्यालयांकडील ७५ मोकादमांसह तब्बल ३७५ अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून देण्याचे आदेश अतिरिक्त महापालिका आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी दिले आहेत.




## अवतीभवती
CITY UPDATE

### योगसाधनेव्दारे मधुमेहावर नियंत्रण मिळवावे : डॉ. रवींद्र नांदेडकर

**पुणे :** मधुमेह हे भारतापुढील एक महत्त्वाचे आव्हान असून महासत्ता होण्याची स्वप्ने पाहणाऱ्या भारतीयांनी योगसाधनेव्दारे मधुमेहावर नियंत्रण मिळवावे, असे आवाहन राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त मधुमेह संशोधक डॉ. रवींद्र नांदेडकर यांनी व्यक्त केले. हर्बायुतर्फे जागतिक योग दिनानिमित्त 'मधुमेहावरील उपचारात योगसाधनेचे महत्त्व' या विषयावर आयोजित ऑनलाईन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. रवींद्र नांदेडकर बोलत होते. या कार्यक्रमात हर्बायुचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय निंबाळकर, अनुयश आरोग्य प्रतिष्ठानचे विश्वस्त विलास नेवपूरकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. मुकुंद घोडके, तसेच जेसीआय भोपाळचे पदाधिकारी आदी मान्यवर सहभागी झाले होते. या विशेष कार्यक्रमाचा लाभ भारतभरातील स्वास्थ्य प्रचारक आणि मधुमेही व्यक्तींनी घेतला. या कार्यक्रमात ज्येष्ठ योग अभ्यासक डॉ.विजय काथार यांनी योगासनांच्या प्रात्यक्षकांसह मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना डॉ. रवींद्र नांदेडकर म्हणाले, मधुमेह ही भारतीयांच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणावर परिणाम करणारी व्याधी असून भारत जगाची मधुमेहाची राजधानी झाला आहे. या पार्श्वभूमीवर विविध योगासने हा आपल्या सगळ्यांच्याच दीनचर्येचा भाग होणे आवश्यक आहे. अनुवंशिकता, तणाव आणि लठ्ठपणा ही टाईप २ प्रकारच्या मधुमेहाची तीन प्रमुख कारणे आहेत. तणाव आणि लठ्ठपणा या दोन्हीवर मात करण्यासाठी योगासनांची भूमिका खूप महत्त्वाची असते. टाईप १ आणि टाईप २ या दोन्ही प्रकारच्या मधुमेहामध्ये योगासनांचा फायदा होतो. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात मधुमेहावर नियंत्रण मिळविण्यासाठी योगसाधना आवश्यक आहे. योगासनांमुळे स्वास्थ्य परिपूर्ण होऊन त्यातून लठ्ठपणावर नियंत्रण मिळण्यास मदत मिळते आणि हळुहळू रक्तातील शर्करेचे प्रमाण नियंत्रणात राहते.

### झाडाच्या फांद्या न छाटल्याने नागरिकांची उद्यान विभागावर नाराजी

**महर्षीनगर :** म्हाडा वसाहतमध्ये विजेच्या खांबाला झाडाने



वेढले असून, धोकादायक झाडाच्या फांद्या छाटण्यात याव्यात, अशी मागणी नागरिकांनी केल्यानंतर मनपा अधिकाऱ्यांकडून सदर झाड सार्वजनिक जागेत नसल्याचे कारण देऊन या कामास टाळाटाळ केली जात आहे. झाडाच्या फांद्या काढव्यात, या मागणीसाठी आता काय न्यायालयात जायचे का, असा सवाल नागरिक करीत आहेत. या परिसरात अनेक झाडे ही वैयक्तिक मालकीच्या जागेत असून, फांद्या मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धोकादायकरित्या आल्या आहेत. याबाबत नागरिकांनी तक्रारी करूनही फांद्या छाटल्या जात नसताना दुसरीकडे उद्यान अधिकारी हद्दीचे कारण देऊन मुख्य रस्त्यावरील धोकादायक वाढलेल्या फांद्या कमी करण्याची जबाबदारी झटकत आहेत. त्यामुळे नागरिकांनी उद्यान विभागाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली आहे.

> महर्षी नगर म्हाडा वसाहतीमधील धोकादायक फांद्या आम्ही काढणार होतो. मात्र पावसामुळे झाडे पडण्याच्या घटना वाढल्या त्यामुळे विभागाकडील काम वाढले. आता विजेच्या खांबा लगत असलेल्या झाडांच्या फांद्या विद्युत विभागानेच काढाव्यात, त्यांना तसे अधिकार आहेत.
>
> **— भारत गायकवाड,**
> उद्यान अधिकारी, बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय

**'लाल महाल' मधील संपूर्ण वातावरण शिवमय**

## टीजेएसबी सहकारी बँकेचा शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न



**पुणे :** श्री. छत्रपती शिवाजी महाराज हे सकल हिंदुस्तानाचे आराध्य दैवत. त्यांचे कार्यही प्रेरणादायी आणि याच प्रेरणेतून टीजेएसबी सहकारी बँक अधिकारी कर्मचारी संघटना विविध सामाजिक कार्य आत्तापर्यंत करत आलेली आहे. श्री शिवछत्रपतींना आदर्शस्थानी ठेवून संघटनेने यंदा शिवराज्याभिषेक सोहळा उत्सव-२०२४,चे आयोजन पुण्यातील ऐतिहासिक शिवकालीन वास्तू "लाल महाल" येथे केले. सोहळ्यामुळे संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जनता सहकारी बँक पुणे चे अध्यक्ष रवींद्र हेजीब आणि उपाध्यक्ष अ‍ॅड. अलका पेठकर उपस्थित होते. सदर कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून जेष्ठ इतिहासकार मोहन शेटे लाभले होते. या कार्यक्रमात एकूण १३० पेक्षा अधिक संख्येने बँकेचा स्टाफ व कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय तसेच काही नागरिकही उपस्थित होते. राज्याभिषेक सोहळ्याची सुरुवात अमोल पारखी यांच्या "छत्रपती शिवरायांचा त्रिवार जय-जयकार" या पद्याने झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक लतेश नाईक यांनी, प्रमुख पाहुण्यांचा परिचय राहुल जवळकर यांनी, तर आभार प्रदर्शन समीर चव्हाण यांनी केले.

### व्याख्यानाच्या माध्यमातून छत्रपतींचे महत्त्व उलगडले

● प्रमुख वक्ते मोहन शेटे यांनी लाल महाल या ऐतिहासिक वास्तूमध्ये छत्रपती शिवरायांचे बालपण असल्याचे सांगितले. छत्रपतींचे बालपण ते शेवटी त्यावेळी झालेला प्रत्यक्ष शिवराज्याभिषेक सोहळा इथपर्यंतचे रोमहर्षक वर्णन सर्वांना विशद केले. त्यांनी आपल्या उगवत्या वाणीने व्याख्यानाच्या माध्यमांतून छत्रपतींचे महत्त्व व आजच्या तरुणांचे देशा प्रतीचे प्रेम यातील फरक सुद्धा विषद केले.

## सिंहगड किल्ल्यावर रोप-वे उभारणार

### आता पाच मिनिटांत पोहोचा सिंहगडावर

**पुणे :** सिंहगड किल्ल्यावर जाणाऱ्यासाठी होणारी वाहतूक कोंडी, दरड कोसळणे यामुळे रस्ता बंद करावा लागत होता. यामुळे पर्यटकांना किल्ल्यावर जाण्यासाठी त्रास होत होता. आता, मात्र सिंहगड किल्ल्यावर १.८ किमी लांबीचा "रोप-वे' उभारला जाणार आहे. लवकरच या कामाला सुरुवात केली जाणार आहे, त्यामुळे पर्यटकांना सिंहगड किल्ल्यावर फक्त चार ते पाच मिनिटांत पोहचता येणार आहे.

सिंहगड किल्ला शहरापासून जवळ असल्याने पर्यटकांचे हक्काचे ठिकाण आहे, त्यामुळे हा किल्ला पाहण्यासाठी पावसाळ्यात नेहमी गर्दी होते. तसेच शनिवार, रविवारी आणि सलग सुट्ट्यांच्या दिवशी या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असतात. सिंहगडवर किल्ल्यावर जाण्यासाठी घाट रस्त्याचा वापर करावा लागतो.

हा रस्ता अरुंद असल्याने वाहन चालकांना कसरत करावी लागते, त्याचबरोबर पावसाळ्यात दरड कोसळण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे हा घाट रस्ता १० ते १५ दिवस बंद ठेवावा लागतो. त्यामुळे पर्यटकांची गैरसोय होते. सिंहगड किल्ल्यावर रोप-वे करणार असल्याच्या फक्त चर्चाच होत राहिल्या. आता, प्रत्यक्षात कामाला सुरुवात होणार आहे. या सुविधेमुळे पर्यटकांना गडावर जाणे सोपे होणार आहे. तासाला सुमारे १०० पर्यटक रोप-वे ने किल्ल्यावर जाऊ शकतात. या प्रकल्पासाठी आवश्यक त्या परवानग्या मिळाल्या आहेत, हे काम खासगी कंपनी करणार आहे.



**सिंहगड किल्ल्यावर जाण्यासाठी आतकरवाडी येथून पायवाट आहे. आतकरवाडी ते किल्ल्यावर असलेल्या दूरदर्शनच्या टॉवरशेजारी रोपवे प्रकल्प साकारला जाणार आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.**

## माझा गौरव हा रसिकांचाच गौरव : पं. उपेंद्र भट



**पुणे :** मी पुण्यात आलो, तेव्हा माझ्याकडे गाण्याशिवाय काही नव्हते. माझे गुरू पं. भीमसेन जोशी यांनी मला एकच सल्ला दिला गाणं उत्तम करा, लोक तुम्हाला काही कमी पडू देणार नाहीत. गुरुजींचे हे शब्द हाच मला मिळालेला आशीर्वाद होता, तो सदैव खरा ठरला. माझा गौरव हा माझा नसून, पुणेकर रसिकांचा गौरव आहे. रसिकांनी मला स्वीकारले, मी त्यांचा चिरऋणी आहे, असे भावनोत्कट उद्गार ज्येष्ठ गायक पं. उपेंद्र भट यांनी शनिवारी येथे काढले.

संवाद, पुणे व कोहिनूर ग्रुपतर्फे भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांचे ज्येष्ठ शिष्य पंडित उपेंद्र भट यांच्या अमृत महोत्सवी गौरव समारंभाचे शनिवारी आयोजन करण्यात आले होते. टिळक स्मारक मंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात पंडित भट यांचा गौरव प्रख्यात गायिका उषा मंगेशकर यांच्या हस्ते झाला.

> राज्य सरकारतर्फे सुरू केलेल्या लता मंगेशकर संगीत अकादमीचे प्राचार्य म्हणून पं. उपेंद्र भट उत्तम जबाबदारी सांभाळतील, याचा विश्वास आहे. ते पं. भीमसेनजींचे शिष्य आहेत, हे त्यांच्या गायनाची झलक ऐकूनही लक्षात येते. त्यांच्या मार्गदर्शनाने अकादमीत उत्तम विद्यार्थी घडतील, असा मंगेशकर कुटुंबियांचा विश्वास आहे.
>
> **— उषा मंगेशकर**

कोहिनूर ग्रुपचे संचालक कृष्णकुमार गोयल, सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी, पंडित शौनक अभिषेकी, संवाद, पुणेचे सुनील महाजन आणि निकिता मोघे यांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. संयोजन केतकी महाजन-बोरकर यांनी केले. कृष्णकुमार गोयल म्हणाले, देशविदेशात किराणा घराण्याचे सूर पोचवण्यात पं. भट यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या सांगीतिक वाटचालीत मराठी आणि कन्नड संस्कृतींचा मिलाफ आहे. त्यांच्या रूपाने युवा कलाकारांसमोर एक आदर्श उभा आहे. पं. श्रीनिवास जोशी म्हणाले, पं. भट हे जोशी कुटुंबाचे सदस्य आहेत. त्यांचे गायन छाप पाडणारे आहे. ते मधुकर वृत्तीने जिथे शिकता येईल, तिथून शिकत असतात. संगीताच्या सर्व प्रकारांवर त्यांचे मनापासून प्रेम आहे.

सुनील महाजन यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले. निकिता मोघे यांनी आभार मानले. गीता देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

## जनतेला आश्वसने नको; रिझल्ट हवा : आ. महादेव बाबर

**हडपसर :** लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर आता विधानसभा निवडणुकीचे



पडघम वाजू लागले आहेत. महाविकास आघाडीचा धर्म पाळला, मताधिक्क्य देण्यात यशस्वी ठरलो आहे. त्यामुळे वरिष्ठ नेत्यांनी कामाला लागा असे सांगितल्याची माहिती माजी आमदार महादेव बाबर यांनी दिली.

याप्रसंगी अमोल हरपळे, प्रसाद बाबर, सागर जगताप, अमर कामठे, महेंद्र भोजणे उपस्थित होते. बाबर म्हणाले की, कोणी काय केले यापेक्षा मी काय केले हे महत्त्वाचे आहे. मागिल दहा वर्षांपासून सत्तेत नसलो तरी सामान्यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्या सोडवित आहे.

सत्ताधारी आमदारांनी हडपसरमधील वाहतूककोंडी, कात्रज बाह्यवळण मार्ग, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न रेंगाळत ठेवला आहे. जनतेला आता आश्वसने नको आहेत, रिझल्ट हवा, अशा भावना व्यक्त होत आहेत. कष्टकरी कामगारवर्ग मोठ्या प्रमाणावर राज्य-पराज्यातून आला आहे, त्यांना सुरक्षितता हवी, जाती-पाती पलीकडे जाऊन काम करणारा कार्यकर्ता अशी ओळख निर्माण केली आहे. पक्षाध्यक्ष हाच आमच्यासाठी महत्त्वाचा असतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

## संत कबीर-छत्रपती शाहू महाराज यांचे विचार म्हणजे शुद्ध प्रबोधन : डॉ. सबनीस



**पुणे :** कबीर हे संतसाहित्यातील महानायक आहेत. त्यांचा एक वेगळा पंथ आहे, ज्याला मर्यादा नाही. कबीरांचे मानवतावादी विचार छत्रपती शाहू महाराज यांनी पुढे नेले. सामाजिक क्षेत्रात त्यांनी मानवतावादी भूमिकेतून समता साधली. समतेच्या विचारांची पेरणी करणारा पहिला राजा म्हणून छत्रपती शाहू महाराजांकडे पाहिले जाते. संत कबीर आणि छत्रपती शाहू महाराज यांचे विचार-कार्य म्हणजे शुद्ध प्रबोधन होय, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

फुले-शाहू-आंबेडकर विचारमंचतर्फे विश्वपारखी संत कबीर व छत्रपती शाहूजी महाराज यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त विश्वपारखी संत कबीर पुरस्काराने आचार्य रतनलाल सोनग्रा तर छत्रपती शाहूजी महाराज पुरस्काराने हनुमंत पपुल यांचा गौरव डॉ. सबनीस यांच्या हस्ते करण्यात आला त्या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रमाई महोत्सवाचे अध्यक्ष अ‍ॅड. प्रमोद आडकर होते. पत्रकार भवन येथे र्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

> आजचा महाराष्ट्राचा नकाशा बेचिराख झाला आहे, तो छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, फुले-शाहू-आंबेडकर यांचा राहिलेला नाही. येथे जातीभेदांच्या भिंती निर्माण झाल्या असल्याने महापुरुषांच्या संवादी विचारांची बेरीज होणे आवश्यक आहे. आजच्या काळात धार्मिक वाद निर्माण न करता सर्व धर्माच्या संकुचित भिंती दूर करून समाज जपणे गरजेचे आहे. संत कबीर व छत्रपती शाहू महाराज यांचे विचार अमलात आणून ते समाजात पेरावे लागतील.
>
> **— डॉ. श्रीपाल सबनीस**

# चिंता धनिकांच्या 'भारत छोडो'ची

हेन्ले प्रायव्हेट वेल्थ मायग्रेशन रिपोर्ट २०२४ मधून भारतातील उच्च उत्पन्न गटातील लोकांच्या ब्रेन ड्रेनचे वास्तव पुन्हा एकदा समार आले आहे. या अहवालानुसार भारतातील ४,३०० लक्षाधीश यावर्षी देश सोडणार आहेत. २०२३ मध्ये लक्षाधीशांच्या संख्येत ५१०० ने घट झाली आहे, परंतु जागतिक स्तरावर उच्च नेट वर्थ व्यक्तींच्या स्थलांतराच्या बाबतीत भारत अव्वल देशांपैकी एक आहे. भू-राजकीय तणाव, आर्थिक अनिश्चितता आणि सामाजिक अशांततेमुळे स्थलांतर होत आहे. मानवी संस्कृतीला स्थलांतराचा प्रदीर्घ इतिहास आहे. किंबहुना, स्थलांतरातूनच मानवी संस्कृती, लोकजीवन विस्तारत गेले. जागतिक महासत्ता असणाऱ्या अमेरिकेसारख्या देशाला स्थलांतरीतांचा किंवा बाहेरुन आलेल्यांचा देश म्हटले जाते. भारताचा विचार करता प्राचीन काळापासून भारतीय नागरीक परदेशात स्थलांतरित होत असल्याचे ऐतिहासिक पुरावे सूचित करतात. १८३४ च्या सुरुवातीपासून गयाना, मॉरिशस, फिजी आणि दक्षिण आफ्रिका यांसारख्या ब्रिटिश वसाहतींमध्ये साखर लागवडीवर काम करण्यासाठी भारतीयांना करारबद्ध मजूर म्हणून पाठवण्यात आले. त्यानंतर असुरक्षितता, अस्थिरता आणि पोटापाण्याची खळगी भरणे, चांगली आर्थिकता यांसारख्या कारणांमुळे स्थलांतरामध्ये वाढ झाली. परंतु अलीकडच्या काळात भारतातून अन्य देशांमध्ये होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाण वाढत आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या आर्थिक आणि सामाजिक गोष्टींशी संबंधित विभागाने जगभरातल्या स्थलांतरित लोकांवर आधारित 'इंटरनॅशनल मायग्रेशन २०२० हायलाइट्स' नावाचा एक अहवाल जाहीर केला होता. त्यानुसार भारतातील लोक सर्वाधिक प्रमाणात जगभरात पसरले आहेत. संयुक्त अरब अमिरात, अमेरिका आणि सौदी अरबमध्ये सर्वाधिक संख्येने भारतीय लोक वास्तव्यास असल्याचे हा अहवाल सांगतो. जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३.६ लोकसंख्या ही स्थलांतरीत असल्याचे हा अहवाल सांगतो. अलीकडील काळात भारत सोडून अन्य देशांचे नागरिकत्व स्वीकारणाऱ्यांची वाढता आकडा हा काही प्रश्न निर्माण करणारा आहे. सध्या या विषयाची चर्चा होण्याचे कारण म्हणजे २०११ नंतर गेल्या १२ वर्षांमध्ये तब्बल १६ लाख भारतीयांनी इथले नागरिकत्व सोडल्याचे दिसून आले आहे. भारतातून अन्य देशांत स्थलांतरीत होणाऱ्यांमध्ये, नागरिकत्व स्वीकारणाऱ्यांमध्ये नोकरीच्या निमित्ताने गेलेल्यांचा समावेश तर आहेच; पण त्याबरोबरीने गेल्या काही वर्षांमध्ये अनेक धनाढ्य, लक्षाधीश, कोट्याधिश, अब्जाधिशही भारतीय नागरिकत्व सोडून जात आहेत. हेन्ली प्रायव्हेट वेल्थ मायग्रेशन अहवालाच्या आधारे ६,५०० धनश्रीमंत किंवा एचएनआय किंवा उच्च उत्पन्न असणाऱ्या व्यक्ती भारत सोडणार आहेत. २०२२ मध्ये हा आकडा ७५०० होता. दुसरीकडे ग्लोबल वेल्थ मायग्रेशन रिव्ह्यूची आकडेवारी दर्शवते की २०२० मध्ये देशातील २ टक्के धनाढ्य व्यक्तींनी भारताला अलविदा करुन परदेशस्थ झाले आहेत.

भारत सरकारने यामागची कारणे सांगताना काही गोष्टी नमूद केली आहेत. त्यानुसार वैयक्तिक कारणांमुळे यापैकी अनेक नागरिकांनी भारतीय नागरिकत्व सोडले असावे. त्याचबरोबर भारत दुहेरी नागरिकत्वाला परवानगी देत नसल्याचाही पैलू यामागे आहे. याखेरीज लोकांचे स्थलांतर करण्याचे मुख्य कारण म्हणजे आर्थिक कल्याण होय.अन्य देशांत चांगली जीवनशैली मिळेल, चांगला रोजगार मिळेल या आशेने भारतातून तेथे जाणाऱ्यांची संख्या वाढत गेली. भारतातील श्रीमंतांचा विचार केल्यास त्यांना भविष्यात वैविध्य आणण्यासाठी, पर्यायी निवासस्थाने उभारण्यासाठी, व्यवसाय चालवण्यासाठी आणि आलिशान जीवनशैलीसाठी परदेशी वातावरणाचे आकर्षण असते. ग्लोबल वेल्थ मायग्रेशन रिव्ह्यू अहवालात म्हटले आहे की इतर देशांमध्ये स्थलांतर करण्याचा निर्णय घेण्यामागील अनेक कारणांमध्ये महिला आणि मुलांची सुरक्षा, हवामान आणि प्रदूषण, कुटुंबांसाठी चांगल्या आरोग्यसेवा आणि मुलांसाठी शैक्षणिक संधी यांसह करांमधील सवलती यांचाही समावेश असतो. अन्य देशांचे नागरिकत्व स्वीकारण्यामागे भारतीय पासपोर्ट स्कोअरचे प्रकरण देखील महत्त्वाचे आहे. स्थलांतरितांच्या या आकडेवारीचे विश्लेषण करताना दोन प्रकारात विभागणी करणे उचित ठरेल. एक म्हणजे शिक्षण आणि नोकरीसाठी जाऊन परदेशस्थ होणारे नागरीक आणि दुसरे एचएनआय. यापैकी एचएनआयबाबत अधिक आलिशान आणि गुणवत्तापूर्ण जीवनशैली जगण्याची लालसा हे एकमेव कारण नसून विदेशात संपत्तीवरील, उत्पन्नावरील करांमध्ये असणाऱ्या सवलती, नियम- कायदे यांचाही समावेश असल्याचे सांगितले जाते. यामध्ये काही अंशी तथ्य असले तरी कॅनडा, अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांमध्ये अतिश्रीमंतांसाठी कराचे दर भारतापेक्षा खूप जास्त आहे. वैयक्तिक उत्पन्नावरील कराचा कमाल दर कॅनडामध्ये ५४ टक्के आहे; तर अमेरिकेत ५१.६ टक्के आणि ऑस्ट्रेलियामध्ये तो ४५ टक्के आहे. भारतात तो ३० टक्के आहे. जी-२० देशांपैकी १५ देशांचा वैयक्तिक प्राप्तीकर दर भारतापेक्षा जास्त आहे. याच जी२० देशांमध्ये कमाल कॉर्पोरेट कर असणाऱ्या देशांमध्ये भारत तिसऱ्या स्थानी आहे. भारतातील कमाल कर दरावर अधिभार आणि उपकर हे दोन्हीही लागू आहेत. ब्रिक्सच्या पाच देशांबाबत विचार करता चीन आणि दक्षिण आफ्रिकेमध्ये कमाल आयकर ४५ टक्के असून तो भारताच्या तुलनेत किती तरी जास्त आहे. त्यामुळे जगभरातील सर्व देशांच्या कर स्लॅबवर नजर टाकली तर हे लक्षात येते की लक्षाधीशांनी भारत सोडण्यामागे करांचा बोजा हे मुख्य कारण नाही. कारणे काहीही असली तरी अतिश्रीमंतांनी भारतीय नागरिकत्व त्यागून अन्य देशांत जाणे हे जागतिक अर्थव्यवस्थेत तिसऱ्या स्थानापर्यंत झेप घेणाऱ्या भारतासाठी चिंताजनक आहे. याबाबत राज्यकर्त्यांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

**जागतिक तापमानवाढीमुळे येणाऱ्या भविष्यात हिमनद्या वितळल्याने लाखो टन जिवाणू आणि विषाणू या हिमनद्यांतून बाहेर पडतील, असे युरोपियन शास्त्रज्ञांनी केलेल्या एका अभ्यासात दिसून आले आहे. शास्त्रज्ञांनी सांगितले की हवामानाच्या संकटामुळे बर्फ जलद वितळून अनेक जिवाणू आणि विषाणू एकतर नाहीसे होत आहेत किंवा ते बर्फातून समुद्राकडे वाटचाल करत आहेत. यामुळे जग कोरोनापेक्षाही महाभयंकर महामारीच्या विळख्यात अडकण्याची भीती आहे. या पार्श्वभूमीवर जगातील सर्वच देशांनी घनदाट जंगलातील, पर्वतातील, नदीतील, बर्फातील आणि वाळवंटातील मानवी हस्तक्षेप रोखण्यासाठी उपायोजना केल्या पाहिजेत. तरच आपण भूतकाळापासून होणार भविष्यातील धोका टाळू शकतो.**

# दडलेल्या विषाणूंचे महासंकट



डॉ. नानासाहेब थोरात
प्रख्यात संशोधक, लंडन



साधारणपणे दहा वर्षांपूर्वी फ्रान्समधील एक शास्त्रज्ञांची टीम अतिथंड वातावरणाचा जीवजंतूंवर होणार परिणाम अभ्यासण्यासाठी जगभर फिरत होती. यूरोपमधील अनेक अतिथंड प्रदेशातून त्यांनी प्रवास करून ते रशियातील सायबेरियन भागामध्ये आली होती. सायबेरिया हा जगातील अतिथंड भागात गणला जातो आणि जवळपास ९५ टक्के प्रदेशात अजूनही मनुष्य पोहोचू शकला नाही. या भागात त्या शास्त्रज्ञांनी जमिनीवरील बर्फाच्या थराचे आणि जमिनीपासून सुमारे १०० फूट खाली जिथेपर्यन्त बर्फ आहे अशा ठिकाणचे काही नमुने घेतले. आणि त्याच्यावरती वैज्ञानिक प्रयोग सुरु केले. जमिनीपासून १०० फूट खालील जे नमुने घेतले होते त्यामध्ये त्यांना काही जिवाणू आणि विषाणू सापडले, ते जीवजंतू निष्क्रिय अवस्थेत होते; पण त्यांनी जेव्हा प्रयोगशाळेत योग्य ते वातावरण निर्माण केले तेव्हा असे दिसून आले की ते जिवाणू आणि विषाणू सक्रिय होऊ शकतात. त्यामधील काही जिवाणू आणि विषाणू फक्त सक्रियच नाही तर संसर्गजन्य सुद्धा आहेत. म्हणजेच हे जिवाणू किंवा विषाणू एखाद्या मनुष्याच्या शरीरात गेले तर त्यांच्यापासून एखादा नवीनच संर्गजन्य रोग होऊ शकतो आणि त्यावरती उपचार मात्र लवकर शोधला जाऊ शकणारा नाही.

यामधील काही विषाणू तीस हजार वर्षांपासून त्या बर्फाखाली निपचिप होते आणि त्यांच्यामुळे गेल्या हजारो वर्षांमध्ये मानवाला कोणताही धोका झाला नव्हता. त्याच वेळी या शास्त्रज्ञांनी जगाला इशारा दिला होता की निसर्गात ज्या ठिकाणी मानवी हस्तक्षेप झाला नाही अशा ठिकाणी हस्तहक्षेप करू नका; अन्यथा जग पुन्हा एखाद्या महामारीमध्ये अडकून पडेल.

शास्त्रज्ञांनी दिलेली धोक्याची सूचना आता खरी होताना दिसून येत आहे. अद्यापही या धोक्याबाबतचे गांभीर्य जगभरात दिसून येत नाहीये; पण येणाऱ्या भविष्यात आपल्याला याचे दूरगामी परिणाम दिसून येतील. अगदी अलीकडे चीनच्या ताब्यात असलेल्या तिबेटच्या परिसरात काही नवीनच विषाणू आणि जिवाणू सापडले आहेत. चीनने आपला महत्वाकांक्षी रेल्वे प्रकल्प तिबेटच्या अनेक भागात विस्तारित केला आहे. तिबेट हासुद्धा लाखो वर्षांपासून मानवी हस्तक्षेपापासून दूर राहिलेला प्रदेश आहे. लाखो वर्षांपासून बर्फ त्या ठिकाणी साचून राहिलेला आहे. या बर्फाखालीसुद्धा हजारो प्रकारचे जिवाणू आणि विषाणू निपचिप अवस्थेत अजूनही आहेत. जानेवारी २०२० मध्ये यावरील काही वैज्ञानिक अहवाल प्रकशित झाले. या अहवालांमध्ये प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार तिबेटच्या ज्या भागामध्ये सध्या मानवी हस्तक्षेप जोरात सुरु आहे अशा प्रदेशात २८ प्रकारचे विषाणू सापडले आहेत आणि हे विषाणू कमीत कमी पंधरा हजार वर्षांपासून बर्फखाली निपचिप पडलेले आहेत. अशाच प्रकारचे प्रयोग तिबेटमध्ये १९९२ आणि २०१५ मध्ये पण केले होते, पण त्यावेळी आधुनिक तंत्रज्ञान नसल्यामुळे नक्की ते जीवजंतू बर्फाखालील आहेत की जमिनीवरील आहेत हे समजणे अवघड होते. मात्र आता आधुनिक तंत्रज्ञानामुळे हे विषाणू कधीचे आहेत किंवा ते नक्की संर्गजन्य आहेत का नाहीत हे समजणे अतिशय सोपे झाले आहे आणि त्यामुळेच ही नवीन माहिती जगासमोर आली आहे.

फक्त चीनचाच नाही तर भारतीय उपखंडाच्या विचार केला तर भारताच्या हद्दीत असणाऱ्या हिमालयातसुद्धा हजारो प्रकारचे विषाणू आणि जिवाणू यांचा अधिवास लाखो वर्षांपासून आहे. अगदी अलीकडेच भारतातील प्रथितयश अशी विज्ञान संशोधन संस्था इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स आणि निगाता युनिव्हर्सिटी, जपान, यांनी संयुक्तरित्या केलेल्या संशोधनामध्ये शास्त्रज्ञांना, सुमारे ६०० दशलक्ष वर्षांपूर्वी अस्तित्वात असलेल्या प्राचीन महासागरातून सोडलेल्या खनिज साठ्यांमध्ये अडकलेल्या पाण्याचे थेंब सापडले आहेत. हिमालयात उंचावर, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम कार्बोनेट दोन्ही असलेल्या ठेवींचे विश्लेषण केल्यामुळे, पृथ्वीच्या इतिहासातील ऑक्सिजनची माहिती आता शास्त्रज्ञांना मिळू शकेल आणि या माहितीवरून हिमालयात वेगळे काही अजूनपर्यंत मानवाला माहित नसलेले जिवाणू किंवा विषाणू यांचा सुगावा घेता येऊ शकतो.

येणाऱ्या भविष्यात हिमनद्या वितळल्याने लाखो टन जिवाणू या हिमनद्यांतून बाहेर पडतील, असे युरोपियन शास्त्रज्ञांनी केलेल्या एका अभ्यासात दिसून आले आहे. शास्त्रज्ञांनी सांगितले की हवामानाच्या संकटामुळे बर्फ जलद वितळणे म्हणजे हिमनद्या आणि त्यांनी आश्रय घेतलेली अद्वितीय सूक्ष्मजीव परिसंस्था आमच्या डोळ्यांसमोर मरत आहेत, म्हणजेच अनेक जिवाणू आणि विषाणू या परिणामामुळे एक तर नाहीसे होत आहेत किंवा ते बर्फातून समुद्राकडे वाटचाल करत आहेत. हिमालयासारखेच इतर युरोप अमेरिकेतील शास्त्रज्ञांनी युरोप आणि उत्तर अमेरिकेतील आठ हिमनद्या आणि ग्रीनलँड बर्फाच्या टोपीवरील दोन ठिकाणांहून पृष्ठभागावर वितळलेले पाणी गोळा केले. त्यांना प्रत्येक मिलिलिटर पाण्यात हजारो सूक्ष्मजंतू आढळले. यामध्ये जिवाणू, विषाणू, बुरशी यांचा समावेश होता.

या जिवाणूंमुळे होणाऱ्या संसर्गन्य आजारांकडे आणि त्याच्यावरील संशोधनकडे लक्ष दिले नाही तर नजीकच्या भविष्यात हे आंतरराष्ट्रीय संकट ठरणार आहे. जर वेगेवेगळ्या देशांतील राज्यकर्त्यांनी लवकरात लवकर याकडे लक्ष दिले नाही तर काही दिवसांतच वेळ निघून जाईल असे अनेक वैद्यकीय सूक्ष्मजीवविज्ञानाचे प्राध्यापक आणि शास्त्रज्ञ यांचे म्हणणे आहे.

मार्च २०२० पासून एका विषाणूमुळे आलेला आजार हा एका लहान तीव्र भूकंपाप्रमाणे आहे, तर अँटिबायोटिक्सच्या प्रतिरोधकांच्यामुळे येणारा भविष्यातील संसर्गजन्य रोग ही प्रचंड त्सुनामी असेल. लाखो रुग्णावर जेव्हा एखादी शस्त्रक्रिया केली जाते तेव्हा डॉक्टरांना सर्वात मोठी भीती ही जिवाणूमुळे होणाऱ्या संसर्गाची असते आणि असा संसर्ग होऊ नये म्हणून त्या रुग्णाला अँटिबायोटिक्स घ्यावी लागतात. नजीकच्या भविष्यात जेव्हा ही अँटिबायोटिक्स निरुपयोगी होतील तेव्हा शस्त्रक्रिया झाल्यानंतर जो संसर्ग होतो तो आपण रोखू शकणार नाही आणि वेगवेगळ्या आजारांवर शस्त्रक्रिया होणाऱ्या लाखो रुग्णांसाठी ते प्राणघातक असेल, यामध्ये सर्वाधिक मृत्यू कॅन्सर आणि मधुमेह सारखे आजार होणाऱ्या रुग्णांचे असतील.

हा प्रश्न अजून जटिल होऊ नये म्हणून हिमालयीन देशांनी म्हणजेच भारत, चीन, नेपाळ, भूतान आणि पाकिस्तान या देशांनी हिमालयातील ज्या ठिकाणी मानवी हस्तक्षेप झाला नाही अशा ठिकाणी अधिक खबरदारी आणि नियमावली केली पाहिजे. कारण हिमालयामध्येसुद्धा हजारो प्रकारचे जिवाणू आणि विषाणू तसेच अनेक प्रकारच्या बुरशी लाखो वर्षांपासून बर्फाखाली निर्जीव अवस्थेत आहेत. मानवी हस्तक्षेपामुळे त्यांचा संसर्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा धोका रोखायचा असेल तर या देशांमध्ये अशा प्रकारची वैज्ञानिक जनजागृती करायला हवी, राजकीय आणि प्रशाशकीय लोकांना याची गंभीरता पटवून दिली पाहिजे. जगातील सर्वच देशांनी घनदाट जंगलातील, पर्वतातील, नदीतील, बर्फातील आणि वाळवंटातील मानवी हस्तक्षेप रोखण्यासाठी उपायोजना केल्या पाहिजेत तरच आपण भूतकाळापासून होणार भविष्यातील धोका टाळू शकतो.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरूवात


**पंचांग** — **सोमवार, दिनांक २४ जून २०२४ ज्येष्ठ कृ. ३, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू शुभ दिवस सकाळी ११.५१ पर्यंत नक्षत्र : उत्तराषाढा, योग : ऐंद्र, करण : वणिज सूर्योदय : स.०६.०५ सूर्यास्त : सायं.०७.१७ वा. राहू काळ : सकाळी : ७:३० ते ९:००**

**दिनविशेष** — .* १८६३ : इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा जन्मदिन. *१९६१ : आशियातले पहिले ध्वनीवेगी विमान भारतात तयार झाले.*१९८० : भारताचे माजी राष्ट्रपती व्ही. व्ही. गिरी यांचा स्मृतिदिन.*१८६९ : चार्लस रॅंड यांची हत्या करणारे दामोदर हरी चापेकर यांचा जन्म. *१८८१ : टेबुट या धूमकेतूची हेन्री ड्रेपर यांनी छायाचित्रे घेतली आणि धूमकेतूची प्रथमच छायाचित्रे घेण्याचा मान मिळवला. *१८९७ : प्रसिद्ध गायक, गीतक्षेत्रातील एक अभ्यासक, कलावंत, पंडित ओंकारनाथ ठाकूर यांचा जन्म. * १९९८ : अभिनेते चंद्रकांत मांडरे यांना 'चित्रभूषण पुरस्कार' जाहीर. * २००१ : आयएनएस विराट ही भारतीय नौदलाची एकमेव विमानवाहू नौका आधुनिकीकरणानंतर पुन्हा नौदलात दाखल.



**राशीभविष्य** — .***मेष** : गाठीभेटी, प्रवास, सभासंमेलन इ. साठी खूप धावपळ होईल. ***वृषभ** : कौटुंबिक खर्चासाठी पैसा उपलब्ध होईल.***मिथुन** : उत्साहाने रेंगाळलेली कामे पूर्ण कराल. ***कर्क** : कामे रेंगाळतील. ***सिंह** : आर्थिक लाभाच्या घटना घडतील. ***कन्या** : मानसन्मान लाभेल. कार्यसाफल्याचा आनंद मिळेल.***तुळ** : वरिष्ठांची मर्जी साभाळा. ***वृश्चिक** : सर्दी, पडसे होईल. ***धनु** : इतरांच्या साहाय्याने कामे होतील. ***मकर** : कष्टाच्या मानाने मोबदला कमी मिळेल.***कुंभ** : संततीच्या सहवासात आनंद लाभेल.***मीन** : मानसन्मान लाभेल.

**मेसेज आया**



साखरेची गोडी जिभेवर फक्त काही सेकंदातच राहते. मात्र माणसाच्या स्वभावातील गोडी शेवटपर्यंत मनात घर करून जाते.

**व्यक्तीविशेष**

### मृणाल गोरे

सर्वसामान्यांच्या समस्यांवर रान उठवून सरकारची झोप उडवणाऱ्या ज्येष्ठ समाजवादी नेत्या म्हणून मृणाल गोरे यांची ओळख महाराष्ट्रातील घराघरात आहे. २४ जून १९२८ रोजी त्यांचा जन्म झाला. वैद्यकिय शिक्षण घेत असताना एस.एम. जोशी, मधु लिमये, भाऊसाहेब रानडे यांच्या भाषाणांनी प्रभावित होऊन शिक्षणमध्येच सोडून सामाजिक कार्यात उडी घेतली आणि राष्ट्र सेवादलाच्या कार्यात स्वतःला झोकून दिले. महागाई, पाणी टंचाई अशा सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर आंदोलने करुन त्यांनी सरकारला जेरीला आणले. हंडा मोर्चा, लाटणे मोर्चा अशा अभिनव आंदोलनांमुळे सामान्य गृहिणी त्यांच्या नेतृत्वाखाली एकत्र आल्या. १९७२ मध्ये मुंबईतील मालाड विधानसभा मतदारसंघातून त्या पहिल्यांदा विधानसभेवर निवडून गेल्या. मात्र कोणताही पक्षाभिनिवेश न ठेवता सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्यात त्या नेहमी आघाडीवर असत. पाणीटंचाई विरोधातील त्यांचे आंदोलन इतके तीव्र होते की त्यांना पाणीवाली बाई म्हणूनच ओळखले जाऊ लागले. १७ जुलै २०१२ रोजी त्यांचे निधन झाले.

**व्यक्तिमत्व**

### करा क्षमतांचे योग्य व्यवस्थापन

नामवंत अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांनी गरिबीची व्याख्या करताना म्हटले आहे, 'पॉव्हर्टी इज मिस मॅनेजमेंट ऑफ अॅव्हेलेबल रिसोर्सेस.' उपलब्ध साधन सामुग्रीचे गैर व्यवस्थापन म्हणजे गरिबी. भारताच्या गरिबीमागचे मूळ कारण हेच आहे. जगात भारताचा उल्लेख 'गरीब लोकांचा श्रीमंत देश' असा केला जात असतो. असे म्हणतात की, भारत हा श्रीमंत देश आहे पण त्यात गरीब लोक राहतात. याचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. आपल्या देशाला साधन सामुग्री खूप मिळालेली आहे. निसर्गाने भरभरून दिले आहे. या देशात भरपूर पाणी आहे, सुपीक जमीन आहे, वर्षातून सरासरी २५० दिवस स्वच्छ सूर्यप्रकाश पडतो, खनिजे खूप आहेत. एवढे सगळे असूनही हा देश गरीब का आहे ? कारण आपल्याला उपलब्ध असलेल्या या साधनांचे नीट व्यवस्थापन करता येत नाही. (क्रमशः)

**जिज्ञासा**


### अशी उलगडली अणुंची संरचना

यापेक्षा फारसं काही घडेल असं त्यांना वाटत नव्हतं. मर्सिडेन हा रूदरफोर्ड यांचा विद्यार्थी होता. अनअनुभवी होता. या प्रयोगाचे फारसे महत्त्व नसल्यामुळे त्यांनी मर्सिडेनला काही अनुभव मिळावा या उद्देशाने प्रयोगाची रचना करायला सांगितली. प्रयोग करताना मर्सिडेनला आढळले की काही अल्फाकन धातूच्या पत्र्यावर आपटून उलट दिशेने परत फिरत आहेत. हे निरिक्षण रूदरफोर्ड यांना सांगितल्यानंतर त्यांचा प्रथम यावर विश्वासच बसला नाही. त्यांनी पुन्हा तो प्रयोग स्वतः करून बघितला. त्यावेळी त्यांना तेच चित्र दिसले. या अनपेक्षित आणि आश्चर्यकारक घटनेसंबंधी रूदरफोर्ड सतत दोन वर्षे विचार करत होते. अखेरीस १९११च्या सुरुवातीला त्यांना या घटनेचे कोडे उलगडले. त्यातून अणूंच्या रचनेचे एक चित्र त्यांच्या नजरेसमोर तयार झाले. प्रत्येक अणूंची जणू अतिसुक्ष्म अशी सूर्यमालाच आहे. जिच्या केंद्रस्थानी धनविद्युतभार असलेले आणि खूप कमी वस्तूमान असलेले अणूकेंद्र असते. या भोवती ऋणविद्युतभारीत अती सुक्ष्म वस्तूमान असलेल्या इलेक्ट्रॉन सूर्यमालेतील ग्रहांप्रमाणे वर्तुळाकार फिरत असतात. त्याने सुचविलेल्या अणूरचनेच्या चित्रामध्ये कालांतराने काही फेरफार झाले आणि पुढे अणुशक्तीचा सर्वात महत्त्वाचा शोध यामुळेच लागला. (उत्तरार्ध)

**नवं संशोधन**

### 'पिकासा'ची धमाल

पिकासामध्येही खूप सुंदर ऑप्शन्स आहेत, ज्यांच्या साहाय्याने आपण फोटो शार्प बनवू शकतो. रंगीत फोटो ब्लॅक अॅण्ड व्हाईट करता येतात. जुन्या काळातील फोटो असतील त्यांना सेफिया या ऑप्शनद्वारे तसा जुना फील देता येतो. एखाद्या फोटोचे पेन्सिल स्केच बनवायचे असेल तर एका क्लिकवर करता येते. गंमत म्हणजे एकाहून अधिक फोटोंचे कोलाज बनवायचे असेल तर तेही अतिशय सोप्या रितीने बनवता येते. यासाठी क्रिएट'मध्ये कोलाज असा स्वतंत्र ऑप्शनही देण्यात आला आहे.



पिकासा'ची आणखी एक खासियत म्हणजे सर्व पर्यायांना सेटींग बदलण्याचा मार्ग खुला आहे. त्यामुळे आपल्याला फोटो अगदी हवा तसा आपल्या मनासारखा बनवता येतो. (पूर्वार्ध)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक १५३**


| | | | |
|---|---|---|---|
| | 4 | | |
| | 1 | | 4 |
| 4 | | 2 | 1 |
| | 2 | 4 | 3 |

**क्रमांक १५२ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | 1 | 3 | 2 |
| 3 | 2 | 1 | 4 |
| 1 | 4 | 2 | 3 |
| 2 | 3 | 4 | 1 |

**हसा चकटफू**

संध्यांच्या वडिलांना कळलं की दिनू लग्नाचा आहे. स्थळ चांगलं आहे. मुलगाही फार साधा व सरळ आहे, अशी माहिती कळल्याने ते जास्तच आनंदी झाले. त्यांनी संध्याचे चार कोनांतून काढलेले चार फोटो पाठवून दिले. त्यावर दिनूच उत्तर आलं, मला चारही मुली पसंत आहेत. तुम्हांला पाहिजे ती एक मुलगी घेऊन दाखवायला या.



**महिलायन**

### चलती मेसेज टीशर्टस्ची

बऱ्याच टीशर्टस्वरील मेसेज रोमँटीक तर असतातच पण त्याचबरोबर सामाजिक विषयांवरदेखील अचूक बोट ठेवणारे असतात. बरेचदा त्यातून विनोदनिर्मितीही होत असते.

परिधान केलेला टी शर्ट आणि त्यावरचा संदेश हा व्यक्तिमत्वाचीही ओळख करून देत असतो. म्हणूनच व्यक्तिमत्वाची वेगळी छाप पाडण्यासाठी अशा टी शर्टस्ची निवड केली जाते. आपल्या मनातील गोष्ट व्यक्त करणारा टीशर्ट म्हणजे जणू आपल्या मनाचा आवाजच, असे म्हणायला हरकत नाही. आय एम जिनिअस, डोन्ट ड्रंक मायब्लड, आयएम इंटेलिजंट, लूक मी, प्लीज किप डिस्टंस, फॉलो मी ऑन फेसबुक, लाईफ माय स्टेटस आदी कितीतरी प्रकारचे संदेश आपली एकूणच स्टाईल दर्शवत असतात. आपले व्यक्तीमत्व आणि स्वभाव सांगण्याचा उत्तम मार्ग किंवा माध्यम म्हणजे हे मेसेज टी शर्ट होय. ज्या गोष्टी आपण समोरच्याला थेट सांगू शकत नाही, त्या गोष्टी यावर लिहिलेल्या संदेशाच्या किंवा स्लोगनच्या माध्यमातून सहज पोहोचतात. म्हणूनच आजची पिढी अशा टिशर्टची निवड मोठ्या चिकित्सक पद्धतीने करते आणि आपल्या व्यक्तिमत्वाला एक वेगळाच परिणाम देण्याचा प्रयत्न करते. (उत्तरार्ध)



**गंमतग्यान**

### लक्षवेधी पिवळा रंग

वैज्ञानिकांनीही याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. ते सांगतात, तुमची नजर एखाद्या विशिष्ट क्षेत्रात बघू शकत असेल आणि पिवळा रंग एका विशिष्ट कोपऱ्यात असेल तरी सर्वात वेगाने दिसणारा आणि स्पष्ट मानला जाणारा लाल रंगाच्या तुलनेतसुध्दा पिवळा रंग १.२४ पट अधिक स्पष्ट दिसतो.

धुके किंवा धूर असल्यास समोरचे वाहन स्पष्टपणे न दिसल्यामुळे बरच अपघात होतात. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार धुक्यातही लाल रंगाच्या तुलनेत पिवळा रंग अधिक स्पष्ट दिसू शकतो. खराब वातावरणात किंवा धुक्याच्या स्थितीतही ड्रायव्हर पिवळ्या गाडीला किंवा पिवळ्या प्रकाश सहज आणि चटकन बघू शकतो. यामुळे वातावरण खराब असले तरी पिवळ्या रंगाच्या गाडीमुळे एखादी अप्रिय घटना टळू शकते. म्हणून अधिकांश स्कूल बसचा रंग पिवळा म्हणजेच लेमन यलो किंवा नारंगी पिवळा असतो. (उत्तरार्ध)

'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# ‘रोबो’लाच बनवले मुख्याध्यापक!

सध्या सर्वत्र रोबो आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा बोलबाला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच ‘एआय’ किंवा कृत्रिम बुद्धिमत्ता ही सर्वात ‘ट्रान्सफॉर्मेटिव्ह’ आणि अद्ययावत असे तंत्रज्ञान आहे. माणसाच्या विचार प्रक्रियेची नक्कल करणारी ‘स्मार्ट’ यंत्रे या तंत्राने बनवली जात आहेत. अनेक क्षेत्रांमध्ये सध्या ‘एआय’चा वापर केला जात आहे. आता ब्रिटनमधील एका शाळेत एका ‘एआय’रोबोलाच मुख्याध्यापक बनवण्यात आले आहे.

वेस्ट ससेक्समधील कॉट्समोर स्कूलने शाळेच्या मुख्याध्यापकांच्या मदतीसाठी एआय रोबो ‘अबीगॅल बेली’चे डिझाईन केले. त्यासाठी एका एआय डेव्हलपरची मदत घेण्यात आली. हे तंत्रज्ञान बऱ्याच अंशी चॅटजीपीटी, ऑनलाईन एआय सर्व्हिससारखे काम करते जिथे यूजर्स प्रश्न ‘इनपूट’करतात आणि चॅटबॉटच्या अल्गोरिदमच्या द्वारे बनवण्यात आलेली उत्तरे मिळवतात. शिक्षणावर ‘एआय’चा मोठाच प्रभाव पडत आहे. हा प्रभाव दूरगामीही आहे. त्यामुळे विध्यार्थ्यांची शिकण्याची आणि शिक्षकांची अध्यापनाची पद्धतही बदलत चालली आहे. या शाळेतील हा एआय रोबोही एखाद्या खऱ्या मुख्याध्यापकासारखेच काम करतो. अध्यापनापासून ते शाळेच्या प्रशासना पर्यंतच्या अनेक गोष्टींचा ऊहापोह या रोबोच्या माध्यमातून केला जातो.



# ‘आधी आबादी’ ॲनिमियाग्रस्त



रक्ताची, लोहाची कमतरता विशेषत: महिलांमध्ये अधिक असून येते. या स्थितीला ‘ॲनिमिया’असे म्हटले जाते. युवा महिला वर्गात आयर्नची म्हणजेच लोह तत्त्वाची कमतरता वाढू लागली आहे. २१ वर्षापर्यंतच्या १७ टक्के महिला किंवा तरूणींमध्ये लोहाची कमतरता दिसून आली. अमेरिकेत पन्नास वर्षांखालील ३५ टक्के, तर भारतात ५२ टक्के महिला ॲनिमियाने पीडित आहेत. आयर्नची कमतरता असलेल्या महिलांमध्ये थकवा जाणवतो, चिडचिडेपणा येऊ लागतो; परंतु या गोष्टी जीवनाचा एक भाग असल्याने मानून महिला त्याकडे दुर्लक्ष करतात, असे जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालात म्हटले आहे.

ही स्थिती आणखी काही काळ राहिल्यास त्याचे रूपांतर तणाव, वैफल्य तसेच हृदयासंबंधी विकारात होऊ शकते. तांबड्या रक्तपेशींचे प्रमाण राखण्यात आयर्नची महत्त्वाची भूमिका असते. आयर्न कमी असल्यानंतर शरीराची ऊर्जा या पेशींची क्रिया सुरळीत राहावी यावर अधिक खर्च होते. हृदय, मेंदू आण हृदयाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. एकूणच आरोग्यावर विपरीत परिणाम करणारी ठरते. आयर्नची कमतरता दर्शवणारे काही लक्षणे आहेत. श्वास घेण्यात अडचण, विचारांत अस्पष्टता, थकवा, चक्कर येणे, थंड तापमानाबद्दलच्या संवेदनशीलतेत वाढ, हृदयाच्या ठोक्यात अनिश्चितता, इत्यादी त्याची लक्षणे असतात. आहारात सफरदचंद, बीट, पालक, डाळिंब यांचा समावेश करणे गरजेचे असते. तसेच अंडी, मासे, डाळी, दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचाही आहारात समावेश असावा, असे तज्ज्ञ सांगतात.



# एक हजार वर्षांपूर्वीची तलवार

दक्षिण फिनलंडमध्ये एका गृहस्थाला आपल्या घराच्या परसात काही काम करीत असताना खोदकामावेळी चिखलात माखलेली एक लोखंडी वस्तू आढळली. त्याने ही वस्तू ओढून बाहेर काढली आणि स्वच्छ करून पाहिली असता ती एक जुनी तलवार असल्याचे दिसून आले. संशोधकांनी आता या तलवारीचा अभ्यास करून म्हटले आहे की ती तब्बल एक हजार वर्षांपूर्वीची आहे!

ही तलवार सापडताच या गृहस्थाने तत्काळ स्थानिक पुरातत्त्व संशोधकांशी संपर्क साधून तलवारीची माहिती दिली होती. ही तलवार काहीशी वाकली आहे. युद्धावेळी स्विडीश योद्धे अशा तलवारींचा वापर करीत असत. या तलवारीची रेडिओ कार्बन चाचणी घेतली असता ती इसवी सन १०५० आणि ११५० या काळातील असल्याचे स्पष्ट झाले. बाराव्या आणि तेराव्या शतकानमध्ये स्विडीश योद्धे फिनलंडवर ताबा घेण्यासाठी अनेक हल्ले करीत होते. जुहा रूहोनेन यांनी याबाबतची महिती दिली. त्यांनी सांगितले की या तलवारीवर धार्मिक मजकूरही कोरलेला आहे.

# प्राचीन मद्यपात्राचा शोध

इजिप्तमध्ये उत्खननात पुरातत्त्व संशोधकांनी मद्य साठवण्याच्या मातीच्या अनेक भांड्यांचा किंवा जारचा शोध घेतला आहे. व्हीएन्ना युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी हा शोध लावला. पुरात्त्वशास्त्रज्ञ क्रिस्टियाना कोहलर यांच्या नेतृत्वातून हे संशोधन करण्यात आले.

जर्मनी आणि ऑस्ट्रियाच्या संशोधकांच्या एका टीमनं इजिप्तची पहिली महिला फेरो (सत्ताधीश) राणी मेरेट-नीथ हिची कबर शोधली आहे. त्यावेळी उत्खननात ५००० वर्षे जुन्या वाईनच्या सीलजार सापडल्या आहेत. व्हिएन्ना विद्यापीठाच्या माहितीनुसार, यावेळी शेकडो मद्याचे जार सापडले असून, त्यासोबतच अजून अनेक वस्तूही सापडल्या आहेत. हे सर्व एका पेटाऱ्यात बंद होते.

राणी मेरेट-नीथ हिच्याबद्दल शिलालेखांमध्ये बरेच काही लिहिण्यात आले आहे. तिने आपल्या कारभारातही बरेच महत्त्वाचे बदल केले होते. ती अशी एकमेव महिला होती जिची भली मोठी कबर ही इजिप्तच्या पहिल्या शाही दफनभूमीत होती.



# नाचणीच्या भाकरीचे आरोग्यलाभ

२०२३ हे वर्ष हे संयुक्त राष्ट्रसंघाने ‘मिलेट्स’म्हणजेच भरडधान्यांचे वर्ष म्हणून घोषित केलेले आहे. या भरडधान्यांमध्ये नाचणी, बाजरी यासारख्या अनेक प्रकाराच्या धान्यांचा समावेश होतो. बाजरीची भाकरी आणि राळ्याचा भात असतोच. नाचणीची भाकरीही अशीच चविष्ट असते आणि तिच्यामध्ये अनेक आरोग्यदायी गुणही असता. विशेषत: न्याहारीच्या वेळी ही भाकरी खावी, असे आहारातज्ज्ञांचे म्हणणे आहे.

नाचणीच्या भाकरीतून शरीराला अनेक पोषक घटक मिळतात. या भाकरीतून शरीराला अनेक पोषक घटक मिळतात. या भाकरीत व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई, बी-कॉम्प्लेक्स, आयर्न, कॅल्शियम, अंटिऑक्सिडंट्स, प्रोटिन, फायबर, कॅलरी, गुड फॅट्स असतात. ज्यातून आपल्या शरीराला अनेक फायदे मिळतात. नाचणीची भाकरी खाल्ल्याने रक्तदाब नियंत्रित राहतो. संपूर्ण शरीरात यामुळे रक्तप्रवाह सुरळीत राहतो.



शरीरात जर कार आयर्न म्हणजेच लोहाची कमतरता असेल, तर नाचणीची भाकरी उपायकारक आहे. नाचणीची भाकरी खाल्ल्यानं आपली हाडं अधिक मजबूत राहतात. त्यामुळे आपल्याला अधिकाधिक शक्ती प्राप्त होते. ऑस्टियोपोरोसिसच्या गुणकारी आहे. नाचणीच्या भाकरीत अमिनो ॲसिडचे प्रमाण चांगले असते. त्यामुळे त्वचा आणि के निरोगी राहतात. तसेच दातांचे आरोग्यही चांगले राहते.

# पॉकेट साईज हेलिकॉप्टर

सध्या जगभर अनेक प्रकारचे ड्रोन पाहायला मिळतात. वेगवेगळी कामे करण्यासाठी या ड्रोनचा वापर होत असतो. फोटोग्राफीपासून ते साहित्य पुरवठा करण्यापर्यंतच्या अनेक कामांचा यामध्ये समावेश असतो. काही ड्रोन असे असतात जे सर्वसामान्यांना मिळत नाहीत. अशा ड्रोनचा वापर केवळ सैन्याकडून केला जात असतो. भारतीय लष्कराकडेही असे पॉकेट साईज ड्रोन आहेत. हे ड्रोन सहजपणे शत्रूच्या गोटात शिरू शकते. शत्रूच्या प्रत्येक हालचालींवर बारीक लक्ष ठेवून त्याचे व्हिडिओ भारतीय लष्कराकडे पाठवू शकते. असेच एक हेलिकॉप्टरच्या आकाराचे छोटे ड्रोनही लष्कराकडे आहे जे मुठीतही सामावू शकते!

हे एक पॉकेट साईज हेलिकॉप्टर आहे. त्याचे नाव आहे ‘पीडी-१०० ब्लॅक हॉर्नेट’ अतिशय लहान आकाराचे हे ड्रोन आपले काम चोख बजावते. त्याचा वापर टेहळणीसाठी केला जातो. ज्याठिकी माणूस सहजासहजी पोहोचू शकत नाही, अशा भागात या हेलिकॉप्टरच्या सहाय्याने टेहळणी केली जाते. प्रतिकूल हवामान असलेल्या ठिकाणीही हा ड्रोन केवळ लष्करी वापरासाठीच आहे.



‘पीडी-१०० ब्लॅक हॉर्नेट’ ड्रोन अत्यंत संवेदनशील परिसरामध्ये टेहळीसोबत गुप्त मोहिमांमध्येही वापरता येऊ शकते. अनेक देशांच्या सैन्यदलांकडून अशा ड्रोनचा वापर केला जातो. हे ड्रोन रिमोट कंट्रोलच्या सहाय्याने नियंत्रित करता येते. संकटकाळात बचाव मोहिमांवेळीही त्याचा वापर होऊ शकतो. या ड्रोनची निर्मिती नॉर्वेमधील ‘प्रॉक्स डायनॅमिक्स’या कंपनीने केली आहे. ते १० सेंटीमीरट लांब आणि २.५ सेंटीमीटर रूंद आहे. हे ड्रोन २० मिनिटांपर्यंत उडवता येऊ शकते. त्यामध्ये तीन कॅमेरे लावलेले असून त्याची किंमत सुमारे १ कोटी रूपये आहे!

# प्राचीन पेंटिंग!

सध्या आपण अनेक व्यक्तिचित्रे किंवा पोर्ट्रेटस् पाहत असतो. युरोपमध्ये नवजागृतीच्या काळात लिओनार्डो डी विंची याने ‘मोनालिसा’हे पोर्ट्रेट बनवले आणि ते जगप्रसिद्ध झाले. मात्र, सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी इजिप्तमध्ये अशी सुंदर पोर्ट्रेटस् बनवली जात असत.



त्यापैकी सोबतच्या छायाचित्रात दिसणारे हे चित्र लाकडावर रंगवलेले असून ते इसवी सन १५० मध्ये बनवलेले आह. हे चित्र सध्या पॅरिसच्या लुव संग्रहालयात आहे.

प्राचीन इजिप्तमध्ये ममी बनवलेल्या मृतदेहांना ठेवण्यासाठी जे मोठे मकबरे बनवले जात असत त्यामध्ये अशी मृतांची चित्रेही ठेवली जात असत. त्यापैकीच हे एक चित्र आहे. त्यामध्ये एक सुंदर तरूणी दिसत असून तिचे गडद तपकिरी डोळे, चाफेकळी नाक, नाजूक जीवणी, दाट भुवया लक्ष वेधून घेतात. तिची केशभूषा आणि दागिनेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

पहिल्या सहस्त्रकाच्या प्रारंभीच्या काळातील हे चित्र आहे. पुरातत्त्व संशोधकांनी अशी अनेक ‘ममी पेंटिंग्ज’शोधून काढली आहेत. त्यापेकी बहुतांश चित्रे ‘फायूम’या शहरातील असल्याने या चित्रांना आता ‘फायूम पोर्ट्रेटस्’असेच नाव मिळाले आहे. सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीची असूनही ही चित्रे अद्याप सुस्थितीत आहेत हे विशेष.

# झुडपे तोडताना सापडले बंकर!

कधी कधी अत्यंत अनपेक्षितपणे काही शोध लागत असतात. विशेषत: दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील अनेक गोष्टी अजूनही लोकांसमोर येत असतात. इंग्लंडच्या नैऋत्येकधील कॉर्नलॉल काऊंटीजवळील पोर्ट्रीथमध्ये आता अशाच पद्धतीने एक भूमिगत गुप्त बंकर सापडले आहे. हे बंकर दुसऱ्या महायुद्धातील असल्याचे म्हटले जाते. हे बंकर आजपर्यंत जगासमोर आलेले नव्हते, कारण ते अतिशय घनदाट हिरव्या दाट झुडपात लपलेलं होतं, ज्याचा शोध आता एका बांधकाम प्रकल्पातील लोकांनी लावला आहे.



कॉर्नवॉल लाईव्हच्या वृत्तानुसार, ज्या ठिकाणी हे गुप्त बंकर सापडले, तिथे एक ‘वूमेन्स ऑक्झिलरी एअर फोर्स(डब्ल्यूएएएफ) तळ होते, ज्याचा दुसऱ्या महायुद्धादरम्यान आणि त्यानंतर पोर्ट्रीथ एअरफिल्डवर सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी बॅरेक्स, मेस आणि आश्रयस्थानांसाठी वापर करण्यात आला. आता कोस्टलाईन हाऊसिंगला या ठिकाणी २२ बंगले बांधायचे आहेत. त्यासाठी विकासकांनी येथे पसरलेली झुडपे आणि झाडे तोडण्याचे काम सुरू केले होते. यादरम्यान, त्यांची नजर एका दरवाजावर पडली, आत गेल्यावर त्यांना हा गुप्त बंकर दिसला, जो काँक्रिट ब्लॉक्स बनलेला आहे. जो आता ऐतिहासिक दुसऱ्या महायुद्धाच्या तळाच्या अवशेषांचा भाग असल्याचे म्हटले जाते. हा बंकर पूर्वीच्या ‘डब्ल्यूएएएफ’ तळावर बांधलेल्या भूमिगत बंकरांपैकी एक आहे. त्याला बाहेरून एक लाकडी दरवाजा होता, जो आत जाण्याचा एकमेव मार्ग होता. त्याच्या आतही काँक्रिटच्या ठोकळ्यांची भिंत होती, त्यात छिद्र पाडल्यावर आत एक रिकामी, अंधारी जागा होती. त्याचप्रमाणे या बंकरचे इतर प्रवेशद्वार काँक्रिट ब्लॉक्सने बंद करण्यात आले आहेत. जेव्हा त्या लोकांनी भिंतीला बनवलेल्या छिद्रातून बंकरमध्ये प्रवेश केला तेव्हा त्यांना आत जाणाऱ्या पायऱ्या दिसल्या. पायऱ्यांवरून खाली उतरल्यानंतर, त्यांना बंकरच्या आत ४० फूट लांब एक अरूंद खोली दिसली.



# सर्वात मोठा ‘अंडरवॉटर टेलिस्कोप’

चीनमधील संशोधक महासागराच्या पृष्ठभागाखाली तब्बल ३५०० मीटर खोलीवर जगातील सर्वात मोठ्या ‘अंडरवॉटर टेलिस्कोप’ची उभारणी करीत आहेत. हा टेलिस्कोप ‘घोस्ट पार्टिकल्स’यान नावाने ओळखल्या जाणाऱ्या सूक्ष्म कणांच्या शोधासाठी आहे. या टेलिस्कोपचे नाव ‘ट्रॉपिकल डीप-सी न्यूट्रिनो टेलिस्कोप’ (ट्रायडंट) असे आहे. चिनी भाषेत त्याला ‘हाई लिंग’ म्हणजेच ‘महासागरातील घंटा’असे नाव आहे. या टेलिस्कोपचे काम पूर्ण झाल्यावर २०३० मध्ये पश्चिम पॅसिफिक महासागराच्या तळाशी हा टेलिस्कोप उभा राहील.

प्रकाश किरणांमधील दुर्मिळ घटकांचे स्कॅनिंग करण्याचे काम ही दुर्मीण करील. दर सेकंदाला सुमारे १०० अब्ज घोस्ट पार्टिकल्स आपल्या शरीरातून प्रत्येक चौरस सेंटीमीटरमधून आरपार जात असतात. त्यांना ‘न्युट्रिनोस’असे म्हटले जाते. या कणांना ‘घोस्ट पार्टिकल्स’म्हणजे ‘भूत कण’असे नाव देण्यामागेही रंजक कारण आहे. या कणांवर कोणताही विद्युतभार नसतो. तसेच त्यांचे वस्तुमानही जवळजवळ शून्यच असते. त्यामुळे त्यांचा अतिशय क्वचित प्रसंगीच अन्य मॅटरशी थेट संपर्क येतो. काही न्यूट्रिनोसचा वेग कमी करू संशोधक त्यांचा अब्जावधी प्रकाशवर्ष अंतरावरील स्त्रोत शोधत असतात. हा स्त्रोत एखाद्या ताऱ्यामधील स्फोटात किंवा दोन खगोलांच्या धडकेतही असू शकतो. त्यांचा छडा लावण्यासाठीच हा टेलिस्कोप बनवला जात आहे. यामध्ये २४ हजारांपेक्षाही अधिक ऑप्टिकल सेन्सर्स आहेत जे १२११ स्ट्रींग स्ट्रींग्जमध्ये बसवले आहेत. प्रत्येक स्ट्रींग ही २३०० फूट लांबीची आहे. या स्ट्रींग समुद्रतळातून वरच्या दिशेने निघतील.

# वाळूत घेतले कृषीउत्पादन !

वेगाने होत असलेले शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे शेतजमिनीची कमतरता भासू लागली आहे. त्यावर उपाय म्हणून दत्तीसगढच्या कृषी संशोधकांनी एक अनोखा प्रयोग केला आहे. त्यांनी मातीऐवजी वाळू, लाकडाचा आणि धान्याचा भुसा यांचा वापर करून त्यामध्ये टोमॅटो आणि काकडीचे बंपर पीक घेण्यात यश मिळवले. इतकेच नव्हे तर हायड्रोपोनिक्स सिस्टीमने लसून, स्ट्रॉबेरी आणि शेवंतीचेही उत्पादन घेतले.

हवेतील शेती म्हणजेच एअरोपोनिक्स सिस्टीमच्यायशाबाबतही या कृषी संशोधकांना खात्री आहे. नापिक आणि ओसाड जमिनीचाही अशी पद्धतींमुळे पिकोत्पादन धेण्यासाठी चांगला उपयोग होऊ शकतो असे त्यांनी म्हटले आहे.इंदिरा गांधी कृषी विद्यापीठातील संशोधकांनी हे प्रयोग केले आहेत.



# दर्शन दोन नेब्युलांचे

हबल’या अंतराळ दुर्बिणीने टिपलेली दोन नेब्युलांची छायाचित्रे ‘नासा’ने दर्शवली आहेत. यामधील मोठ्या लालसर रंगाच्या नेब्युलाला ‘एनजीसी २०१४’आणि त्याच्यापाशी असणाऱ्या निळसर नेब्युलाला ‘एनजीसी २०२०’अशी नावे देण्यात आली आहेत. तारे तयार होणाऱ्या एका क्षेत्रामध्ये हे नेब्युला आढळून आले असून, त्या भागात असंख्य तारे आहेत.

‘नासा’ने शेअर केलेल्या फोटोच्या मध्यभागी दिसणारे तारे सूर्याहून दहा ते वीसपट मोठे आहेत. या ताऱ्यांमधून बाहेर पडणाऱ्या उष्णतेमुळे तिथे असणाऱ्या इतर वायूंचे तापमान वाढते. डाव्या बाजूला तयार झालेले निळे रिंगण अर्थात हा निळसर नेब्युला सूर्याहून २,००,००० पट प्रकाशमान असणाऱ्या ताऱ्यापासून तयार झाल्याचे ‘नासा’ने म्हटले, ‘हा फोटो दोन भागांमध्ये विभाजला आहे. डावीकडे खालच्या बाजूला त्याचा पहिला भाग आहे, तर लालसर रंगाचे रिंगण दुसरा भाग.’ हबल दुर्बिणीच्या वाईड फिल्ड कॅमेरातून ही दृश्य टिपण्यात आली आहेत. सर्वसामान्य नजरेतून पाहिल्यास प्रथमदर्शनी हे एखाद्या चित्रकारानं रेखाटलेलं चित्र असल्याचं वाटतं; पण ही अवकाशीय किमया आहे. नेब्युलांचे आकारही अनेक प्रकारचे आणि अनोखे असतात. कधी ते विशाल डोळ्यासारखे दिसता तर कधी हाताच्या पंज्यासारखे.

# कैलास पर्वतावर गिर्यारोहण का अशक्य?

शिवशंकर आणि परिवाराचे निवासस्थान म्हणून तमाम हिंदू लोक कैलास पर्वताकडे पाहतत असतात. या पर्वताचा परिसर भारताच्या हद्दीत नसून तो तिबेट म्हणजेच पर्यायाने चीनच्या हद्दीत आहे, पण तरीही या पर्वताविषयीची अतूट आस्था त्याच्या दर्शनासाठी भाविकांना खेचतच असते. आता उत्तराखंडच्या लिपुलेख पास येथून कैलास दर्शन घडू शकते आणि त्यासाठी चीनमध्ये जाण्याची गरज राहणार नाही. विशेष म्हणजे एव्हरेस्टपेक्षा उंचीने बराच लहानन असूनही कैलास पर्वतावर अद्याप एकही गिर्यारोहक जाऊ शकलेला नाही. त्यामागे काही गूढ कारणे दडलेली आहेत.

आपण ६,६५६ मीटर उंचीचा कैलास पर्वत केवळ दूरवरून पाहिला आहे. त्याची उंची एव्हरेस्टपेक्षा २००० किमी कमी आहे, परंतु अद्याप कोणीही त्यावर चढाई



करू शकलेले नाही. यामुळे लोक याला एक रहस्यमय पर्वत देखील म्हणतात. बरेच लोक म्हणतात की, या पर्वतावर अलौकिक शक्ती आहेत आणि वैज्ञानिकही या युक्तिवादासमोर मौन बाळतात, या पर्वतावर चढण्यासाठीही बरेच प्रयत्न केले गेले, परंतु आतापर्यंत कोणालाही यश आले नाही. बऱ्याच लोकांचे म्हणणे आहे की, हवामानामुळे कोणीही येथे पाय ठेवू शकले नाही. बरेच लोक असा दावा करतात की येथे नेव्हिगेशन करणे खूप अवघड आहे कारण येथे वारंवार दिशाभ्रम होतो. सरगे सिस्टियाकोव्ह या रशियन निर्यारोहकाने सांगितले की, ‘जेव्हा मी कैलास पर्वताच्या अगदी जवळ पोहोचलो तेव्हा माझे हृदय जोराने धडधडू लागले. आजपर्यंत कोणीही चढू शकले नाही अशा पर्वताच्या अगदी समोर होतो, पण अचानक मला खूप अशक्तपणा जाणवू लागला आणि मी इथे आणखी थांबू नये, असा विचार माझ्या मनात आला. यानंतर मी जसाजसा खाली उतरू लागलो तसे माझे मन हलके होत होते. रशियन नेत्र रोग विशेषज्ञ अर्नेस्ट मुलादाशेव म्हणाले की, कैलास पर्वत एक नैसर्गिक रचना नाही तर अलौकिक शक्तींमुळे तयार झालेला पिरॅमिड आहे. ते म्हणाले की, कैलाश पर्वत १०० रहस्यमय पिरॅमिड्सपासून बनलेला आहे. हा पर्वत ‘ॲक्सिस मंडी’चे ठिकाण असल्याचेही म्हटले जाते जिथे सर्व दिशा एकत्र येतता किंवा जे जगाचे केंद्रस्था आहे. बरेच लोक म्हणतात की कैलास पर्वत अत्यंत किरणोत्सर्गी आहे. त्याचा उतार ६५ अंशापेक्षा जास्त आहे. माऊंट एव्हरेस्टवर हा उतार ४० ते ६० अंशांपर्यंतचा आहे. या कारणास्तव निर्यारोहक देखील येथे चढण्यास घाबरतात. सध्या कैलास पर्वत चढून जाण्यास किंवा तिथे निर्यारोहण करण्यास पूर्णपणे बंदी आहे. हिंदू, बौद्ध आणि जैन अशा तीन धर्मातील लोकांसाठी हा पवित्र पर्वत आहे. बौद्ध भिक्षू योगी मिलारेपा ११ व्या शतकात कैलास पर्वतावर चढून गेले होते असे म्हणतात. या पवित्र आणि रहस्यमय पर्वतावर जाऊन जिवंत परत येणारी ही आधुनिक जगातील पहिली व्यक्ती असल्याचे म्हटले जाते.

### वाहतूक विभागाची माहिती: पालखी सोहळ्यामुळे वाहतूकीत मोठे बदल

# पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक यंत्रणा सज्ज!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** दि. २८ रोजी श्री संत तुकाराम महाराज यांची पालखी आणि श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी शनिवारी (दि. २९) आळंदीतून आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. तुकाराम महाराजांच्या पालखीचा पहिला मुक्काम देहू येथील इनामदार वाड्यात असणार आहे. तर शनिवारी हा सोहळा आकुर्डीतील विठ्ठल मंदिर येथे मुक्कामासाठी येणार आहे. तसेच जानेश्वर माऊलींचा पालखीचा पहिला मुक्काम आळंदी येथील गांधी वाडा येथे असेल. या दोन्ही पालख्या (दि. ३०) रोजी पुण्याच्या दिशेने प्रस्थान ठेवणार आहेत. त्यामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर भाविकांची वर्दळ राहणार आहे. या पार्श्वभूमीवर भाविक भक्तांना कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी पिंपरी चिंचवड, आळंदी आदी भागात वाहतूकीत मोठे बद्दल करण्यात आले आहे. महावीर चौक चिंचवड येथून पालखी पास होत असताना महावीर चौककडे येणारी वाहतूक पुर्णपणे बंद असेल. तसेच श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक चिंचवड येथून पालखी पास होत असताना शिवाजी चौकाकडे येणारी वाहतूक पुर्णतः बंद ठेवण्यात येईल असे वाहतूक विभागाकडून सांगण्यात आले आहे. .

### पिंपरीतील बदल

- बंद मार्ग: महावीर चौक ते डी मार्ट सर्व्हीस रोड. पर्यायी मार्ग: डी मार्ट समोरील ग्रेड सेपरेटर मधून वाहतूक वळविण्यात येईल.
- बंद मार्ग: अटो क्लस्टर ते हनुमान मंदिर चौक. पर्यायी मार्ग: मदर तेरेसा पुलावरून काळेवाडी मार्गे वळविण्यात येणार आहे.
- बंद मार्ग: पिंपरी पुल ते सम्राट चौक. पर्यायी मार्ग: महावीर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
- बंद मार्ग: पिंपरी चौक ते गांधीनगर. पर्यायी मार्ग: रॉक्सी हॉटेल व गोकुळ हॉटेलमागून इच्छित स्थळी जातील.
- बंद मार्ग: गांधीनगर ते आंबेडकर चौक. पर्यायी मार्ग: नेहरुनगर मार्गे इच्छितस्थळी जातील.
- बंद मार्ग: वल्लभनगर ते पुणे सर्व्हिस रोड. बंद पर्यायी मार्ग: ग्रेडसेपरेटर मार्गे पुणे बाजुकडे जातील.
- बंद मार्ग: वल्लभनगर आऊटलेट. पर्यायी मार्ग: सर्व्हिसरोडने न जाता ग्रेडसेपरेटर मधून पुण्याकडे जातील.
- बंद मार्ग: केएसबी चौक ते शिवाजी चौक तसेच अटो क्लस्टर. पर्यायी मार्ग: या मार्गावरील वाहने केएसबी चौकाकडून भोसरी मार्गे इच्छित स्थळी जातील.

- ३० जूनला मध्यरात्री ते रात्री नऊ वाजेपर्यंत बदल असणार आहेत किंवा मग जोपर्यंत वाहतूक सुरळीत होत नाही तोपर्यंत हे बदल असणार आहेत.



चिंचवडमधील वाहतुकीत बदल

- हे वाहतूकीतील बदल २९ जून रोजी दुपारी ४ ते ३० जून रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत असणार आहेत. किंवा मग वाहतूक सुरळीत होईपर्यंत लागू असणार आहेत.

- बंद मार्ग – बिजलीनगर ते भक्ती शक्ती चौक
- पर्यायी मार्ग – ही वाहने बिजलीनगर चौक येथून डावीकडे वळून डी.वाय.पाटील कॉलेज समोरील मार्गाने रावेत मार्गे मुंबईकडे अथवा डांगे चौक थेरगाव कडे जातील.
- बंद मार्ग- दळवीनगर ते खंडोबामाळ चौक व दळवीनगर ते चिंचवड
- पर्यायी मार्ग – ही वाहने बिजलीनगर चौक मार्गाने इच्छिस्थळी जातील
- बंद मार्ग – चिंचवड गाव व चापेकर उड्डाण पुल ते महावीर (रिव्हर व्ह्यू चौक व चाफेकर चौक)
- पर्यायी मार्ग – ही वाहने चिंचवडे फार्म मार्गाने वाल्हेकरवाडी रावेतमार्गे इच्छितस्थळी जातील तसेच भोसरीकडे जाणारी वाहने हि बिजलीनगर चौक संभाजी चौक, भेळ चौक,काचघर चौक, भक्ती शक्ती चौक मार्गे इच्छितस्थळी जातील.
- बंद मार्ग – चिंचवडे टी जंक्शन ते महावीर चौक
- पर्यायी मार्ग – ही वाहने चिंचवडे फार्म मार्गाने वाल्हेकरवाडी, रावेत मार्गे इच्छितस्थळी जातील. तसेच भोसरीकडे जाणारी वाहने ही बिजलीनगर चौक, संभाजी चौक भेळ चौक काचघर चौक, भक्ती-शक्ती चौक मार्गे इच्छितस्थळी जातील.
- बंद मार्ग – लोकमान्य हॉस्पीटल ते महावीर चौक
- पर्यायी मार्गे – ही वाहतूक लोकमान्य हॉस्पीटल चौकातून दळवीनगर मार्गे जातील.
- बंद मार्ग – एस.के..एसएफ चौक ते खंडोबामाळ
- पर्यायी मार्ग –बिजलीनगर चौक मार्गाने इच्छितस्थळी जातील.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## पालखी काळात फेरीवाल्यांना बंदी

**पिंपरी :** श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा २८ जून रोजी देहूगावातून इनामदार वाडा देहूगाव येथे मुक्कामी असणार आहे. दुसऱ्या दिवशी म्हणजेच २९ जून रोजी हा पालखी सोहळा विठ्ठल मंदीर,आकुर्डी येथे मुक्काम असणार आहे. तसेच श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २९ जून रोजी गांधीवाडा दर्शन मंडप, आळंदी येथे मुक्कामी असणार आहे. त्यानंतर ३० जून रोजी आळंदी येथून दिघी-विश्रांतवाडी येथे म्हणजेच पुणे शहर आयुक्तालय हद्दीत जाणार आहे. या काळात पालखी मार्गावर फूल, फळ, खेळणी विक्रेते हातगाड्या लावून जमीनीवर बसून साहित्य विक्री करीत असतात. रस्त्याच्या दोन्ही बाजूला फेरीवाले बसल्यामुळे रस्ता वापरासाठी अरुंद होतो. त्यामुळे भाविक व दिंड्यांना चालण्यास व रहदारीस अडथळा निर्माण होतो. मोठ्या प्रमाणात गर्दी होऊन चेंगराचेंगरी होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. त्यामुळे पोलीस आयुक्त सुनील रामानंद यांनी कलम १४४ नुसार प्रतिबंधात्मक आदेश दिलेले आहेत. संपूर्ण पालखी मार्गावर हार, फुल, फळ, खेळणी विक्रेते, हातगाडीवाले, खाद्य पदार्थ विक्रेते व सर्व प्रकारचे फेरीवाले यांना विक्री करणे, थांबणे, विक्रीस बसणे, फिरणे अथवा इतर मार्गाने तेथे उपस्थित राहण्यास मनाई केली आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.



## जीवदान...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



## डॉक्टरांनी दिले बाळाला जीवदान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेच्या वायसीएम रुग्णालयाकडे जात असाताना गरोदर महिलेची रिक्षामध्येच प्रसूती झाली. यावेळी या महिलने जुळ्या बाळांना जन्म दिला. अकाली जन्मलेल्या या बाळांचे वजन ८१० ग्रॅम आहे. त्यांच्यावर उपचार केल्यानंतर त्यांचे वजन हळूहळू वाढत आहे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथील एनआयसीयू टीमने जन्मापासूनच गंभीर आरोग्याच्या आव्हानांना सामोरे जाणाऱ्या अकाली जन्मलेल्या मुलाचे प्राण वाचवले आहे. या मातेने दोन जुळ्या मुलांना जन्म दिला असून बाळाच्या जुळ्या बहीणीचे वजन ९०० ग्रॅम भरेल आहे. तिच्यावर उपचार सुरू असताना तिला तीव्र श्वसन त्रास सिंड्रोमने मरण पावली आहे.

वायसीएमच्या शस्त्रक्रिया विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. आनंद झिंगाडे यांनी ७२० ग्रॅमच्या अर्भकावर गंभीर स्वरूपाचे आणि गुंतागुंतीचे ऑपरेशन करण्यासाठी पुढाकार घेतला. शस्त्रक्रियेनंतर, मेंदूतील ग्रेड २ जर्मिनल मॅट्रिक्स रक्तस्राव यासह एनईसी आणि इतर गुंतागुंतीसाठी बाळाचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले.

यामुळे श्वसनक्रिया सुरुळीत होण्यास मदत झाली. बालरोग विभागाच्या प्रमुख डॉ. दीपाली अंबिके आणि डॉ. सूर्यकांत मुंडलोड, सहयोगी प्राध्यापक, डॉ. गौथम आणि डॉ. तनवीर यांच्यासह त्यांच्या टीमच्या परिश्रमपूर्वक देखरेखीखाली, बाळामध्ये सुधारणा दिसून आली. ६३ दिवसांच्या कालावधीत बाळाला दोन अतिरिक्त रक्त संक्रमण प्राप्त झाले आणि त्याचे वजन वाढत जाऊन १३०० ग्रॅमपर्यंत पोहोचले. वायसीएमच्या एनआयसीयू विभागासाठी बाळाला यशस्वी डिस्चार्ज मिळवून देणे ही प्रतिष्ठेची आणि अनिवार्य गोष्ट होती. या आव्हानात्मक प्रकरणात सतत सहकार्य केल्याबद्दल वायसीएम रुग्णालयाचे डीन डॉ. राजेंद्र वाबळे आणि आरोग्य विभागाचे अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांना विशेष परिश्रम घेतले.

» Selected



## शिक्षकांची पदे भरण्याची मागणी

**पिंपरी :** येथील वाल्हेकरवाडीतील पालिकेच्या मुलांच्या शाळेमध्ये शिक्षकांची रिक्त जाग आहेत. या जागेवर शिक्षकांची नियुक्ती करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) महिला उपशहर संघटिका ज्योती संदीप भालके यांनी प्रशासकीय अधिकारी संगीता बांगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी शिवसेना शहर संघटक संतोष सौंदणकर, विभाग प्रमुख संदीप भालके उपशहर प्रमुख हरेश नखाते, उपशहर संघटिका रजनी वाघ, रहाटणी विभाग प्रमुख गोरख पाटील, चिंचवड विभाग प्रमुख किरण दळवी उपस्थित होते. वाल्हेकरवाडी शाळेमध्ये पहिली ते पाचवीची पटसंख्या ३५० इतकी आहे. तर सहावी ते सातवीतीच्या वर्गात १४० विद्यार्थी आहेत. यानुसार शाळेमध्ये १४ शिक्षकांची आवश्यकतचे गरज आहे. पटसंख्येनुसार शाळेला अजून ४ उपशिक्षक व ३ पदवीधर शिक्षकांची आवश्यकता आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका एका महिन्याने निवृत्त होणार आहेत. शिक्षकांच्या कमतरतेमुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे वाल्हेकरवाडीतील शाळेतील मुलांची गैरसोय होत असल्याने लवकरात लवकर शिक्षकांची रिक्त पदे भरण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## पालखी सोहळ्यानिमित्त प्रशासनाकडून जय्यत तयारी

**देहू :** संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त देहू नगरपंचायतीकडून जय्यत तयारी करण्यात येत आहे. यामध्ये



रस्तेदुरुस्ती, इंद्रायणी नदीसह ठिकठिकाणी स्वच्छता तसेच डास प्रतिबंधात्मक औषधांची फवारणी आदी कामे करण्यात येत आहे. पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देहू नगरपंचायत प्रशासनाच्यावतीने विविध कामे करण्यात येत आहे. इंद्रायणी नदीत मोठ्या प्रमाणावर असलेली जलपर्णी काढण्यात आलेली आहे बाह्यवळण मार्गावरील खड्डे बुजविण्यात आले असून पालखी मार्गाची दुरुस्ती सुरू आहे. वारकरी, भाविकांना पिण्याचे पाणी २४ तास उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच डासांपासून संरक्षण मिळावे यासाठी गावात औषध फवारणी करण्यात येत आहे. नगरपंचायत कार्यालयात मदत कक्ष सुरू करण्यात येणार आहे. संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त साप्ताहिक सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित राहावे, असे आदेश मुख्याधिकाऱ्यांनी दिले आहेत.



## अल्कोह सोसायटीत योगदिन उत्साहात साजरा

**पिंपळे सौदागर :** येथील कुणाल आयकॉन रस्त्यावरील अल्कोह सोसायटीमध्ये जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर योग प्रशिक्षक रमेश भट आणि रश्मि दुसाने यांनी दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व तसेच त्याचे फायदे या विषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर प्रत्यक्ष योगा करण्यास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमास रमेश भट, सुनील चोपडे, जगदिश चौधरी, भालचंद्र गाडगे, रमेश चांडगे, रमेश दुसाने, शशिकांत मुलमुले, सुरेश बिरारी, चंदन जयस्वाल, माणिकराव हटवार, राजेश पाटील, पांडुरंग नवले, थन्नीलाल कटरे, हितेश मेहता, शशिकांत पितांबरे, लक्ष्मण खडसे, रश्मि दुसाने सोनाली बुटे, प्रिया शुक्ल, स्मिता कदम, स्मिता कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

### शहरातील मा. नगरसेवकांनी घेतली शरद पवारांची भेट

# शहरात अजित पवार गटाला मोठी गळती लागण्याची शक्यता?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** लोकसभा निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला. येत्या काही महिन्यांवर राज्याच्या विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. यामुळे पिंपरी-चिंचवडमधील माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, शहरातील १५ ते २० माजी नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शरद पवार यांची भेट घेतली. त्यामुळे आता अजित पवार गटाला मोठी गळती लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पिंपरी-चिंचवड शहर अजित पवारांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला होता. २०१७ मध्ये राष्ट्रवादीतून भाजपत गेलेल्या दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप, महेश लांडगे यांनी अजितदादांच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावला. महापालिकेवर भाजपची एकहाती सत्ता आणण्यात या दोघांचा मोठा वाटा आहे. पक्षातील फुटीनंतर शहरातील संघटना, आमदार, सर्व माजी नगरसेवक अजित पवारांसोबत कायम राहिले. केवळ दोन माजी नगरसेवक शरद पवार यांच्याबरोबर राहिले. पक्षातील फुटीनंतर दोन्ही गटांनी बालेकिल्ला पुन्हा ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले. लोकसभा निवडणुकीनंतर राजकीय वारे बदलले. महाविकास आघाडीच्या बाजूने जनमत असल्याचे दिसल्याने अजितदादांच्या राष्ट्रवादीतील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांमध्ये चलबिचल सुरू झाली. अजित पवार गटाचे प्रवक्ते, माजी नगरसेवक विनायक रणसुभे, भाजपच्या माजी नगरसेविका प्रियंका बारणे यांनी नुकताच पवार गटात प्रवेश केला. गेल्या दोन दिवसांत चिंचवड, भोसरीतील १५ ते २० माजी नगरसेवकांनी शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांची भेट घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. सुप्रिया सुळे शहरातील राजकारणाकडे लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीतील अनेकांचा पवार गटाकडे ओढा वाढल्याचे सांगितले जात आहे. बारामतीनंतर अजित पवार यांना पिंपरी-चिंचवडमध्ये घेरण्याची रणनीती पवार गटाने आखल्याची जोरदार चर्चा शहराच्या राजकीय वर्तुळात रंगली जात असल्याचे दिसत आहे.

> लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या पाठिशी जनता असल्याचे दिसले. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही माजी नगरसेवक कोणाच्या संपर्कात नाही. मी शरद पवार यांची भेट घेतली नाही. परंतु भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्याची माझी तयारी सुरू आहे.
> **-अजित गव्हाणे,** शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)

> शहरातील सर्वपक्षीय २० माजी नगरसेवक संपर्कात आहेत. काहींनी शरद पवार यांची भेट घेतली आहे. योग्य वेळी योग्य निर्णय होतील.
> **-तुषार कामठे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष

## चारित्र्याच्या संशयावरून पतीने केला पत्नीचा खून

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** ओढणीने गळा आवळून पतीने पत्नीचा खून केला असल्याची धक्कादायक घटना देहूगाव येथे घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी नराधम पतीला अटक केली आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यास सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. देहूगाव येथील गाथा मंदिर मागील आनंद डोह घाट परिसरात गुरुवारी (दि. २०) रोजी सायंकाळी साडेसात ते नऊ या कालावधीत ही खुनाची घटना घडली. या घटनेत प्रतीक्षा जयदीप यादव (वय २१), असे खून झालेल्या विवाहितेचे नाव आहे. मयत प्रतिक्षाचा पती जयदीप अर्जुन यादव (वय २९, रा. देहूगाव) याला पोलिसांनी अटक केली. पोलीस अंमलदार किरण राजाभाऊ पाटील यांनी याप्रकरणी शुक्रवारी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. प्रतीक्षा आणि जयदीप यादव या दोघांचे दोन महिन्यांपूर्वी लग्न झाले होते. पत्नी शारीरिक संबंध ठेवू देत नाही. तिचे अनैतिक संबंध असल्याचा संशय जयदीपला आला होता. यामुळे त्याने आनंद डोह घाट परिसरात गेले असता ओढणीने गळा आवळून पत्नीचा खून केला.

### वारकरी, ग्रामस्थांचा प्रशासनाला संतप्त सवाल

# इंद्रायणीचे पात्र शुद्ध होणार तरी कधी?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. असे असताना येथील इंद्रायणी नदीतील प्रदूषण काही केल्या थांबल्याचे नाव घेत नाहीये. प्रदुषणात कमी होण्याऐवजी त्यात वाढ होत आहे. प्रदूषित सांडपाणी गेल्या महिनाभरापासून नदीत सोडल्यामुळे पाण्यावरचा फेस (तवंग) कायम असल्याचे पाहिला मिळत आहे. यात कमी काय म्हणून महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेचा प्रदूषण नियंत्रण विभाग या सर्व गोष्टींकडे डोळझाक करीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून इंद्रायणी नदीत होणारे प्रदूषणाबाबत आता नागरिकांकडून विचारणा केली जात आहे. तसेच यावर कारवाईचा बडगा का उगारला जात नाही. असा प्रश्न आता नागरिक आणि वारकरी विचारू लागले आहेत.

> वारकरी २५ जूनपासून आळंदीत येतात. त्यांना स्नानासाठी शुद्ध मिळालेच पाहिजे, ही देवस्थानची भूमिका आहे. राज्य सरकारने प्रदूषण करणाऱ्या घटकांवर कारवाई केलीच पाहिजे. तसेच प्रस्थान सोहळ्यासाठी वडिवळे धरणातून पाणी तातडीने सोडावे.”
> **- योगी निरंजननाथ,** सोहळाप्रमुख, संत ज्ञानेश्वर महाराज



> वडिवळे आणि आंद्रा मिळून दोनशे क्युसेक पाणी सोडले आहे. २५ जूनपर्यंत पाणी आळंदीपर्यंत पोहोचेल. वारकऱ्यांच्या स्नानाची सोय होईल. मात्र, प्रदूषण करणाऱ्या या कारखान्यांवर कारवाई आवश्यक आहे. त्याबाबत वरिष्ठांना कळविले.
> **- कैलास केंद्रे,** मुख्याधिकारी, मुख्याधिकारी, आळंदी नगरपालिका

#रा

## लेखापरिक्षणात धक्कादायक माहिती आली समोर

# पालिकेच्या स्थापनेपासूनचे रेकॉर्ड गायब

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



### आक्षेपांच्या फाईली सर्वाधिक

● महापालिकेच्या सर्वच विभागांचे लेखापरीक्षण अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. तर केलेल्या लेखापरीक्षणातील आक्षेप प्रलंबित आहेत. त्यात सर्वाधिक फाईली स्थापत्य विभागातील कामांच्या आहेत. फायली उपलब्ध करणे, त्या गहाळ करणे, योग्य ती कागदपत्रे न देणे अशा अनेक अपुऱ्या फाईलींमुळे प्रलंबित आक्षेप निकाली काढले जात नाहीत, मात्र अलीकडे झालेल्या लेखापरीक्षणात आक्षेपांच्या फाईल सर्वाधिक आहेत.

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्थापन झाल्यापासूनचे मुख्य लेखापरीक्षण विभागाचे ऑडिट सुरू आहे. महापालिकेचे सन १९८२ ते २०२४ पर्यंतचे विविध विभागांचे लेखापरीक्षण केले जात आहे. यामध्ये प्रलंबित आक्षेपांची संख्या, वसूलपात्र रकमा याचे रेकॉर्ड उपलब्ध नसल्याने आक्षेप मोठ्या प्रमाणावर आहेत. विभागप्रमुख यांनी लेखापरीक्षणाकडे दुर्लक्ष करून रेकॉर्ड गहाळ करू लागले आहेत. त्यामुळे तब्बल ४ हजार ३०४ कोटी ७९ लाख ६२ हजार ४४२ रुपयांचे फाईलचे रेकॉर्ड लेखापरीक्षण तपासणीस उपलब्ध झाले नसल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे.

महापालिकेचे प्रत्येक आर्थिक वर्षाचे ऑडिट करण्यास विविध विभाग प्रमुख सहकार्य करत नाहीत. विभाग प्रमुखांनी मोठ्या प्रकल्पांचे दडवलेले व गहाळ केलेले रेकॉर्ड यामुळे वेगवेगळ्या आर्थिक वर्षातील ऑडिटच्या लेखापरीक्षणासाठी रेकॉर्ड उपलब्ध होत नाही. यामुळे चार हजार ३०४ कोटी ७९ लाख ६२ हजार ४४२ रुपयाचे "रेकॉर्ड' चोरी गेले कसे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. महापालिकेतून 'रेकॉर्ड' गहाळ झाल्याचे प्रकरण गंभीर असून या प्रकरणी आयुक्त शेखर सिंह यांनी चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. महापालिकेतील सर्वच विभागांचे १९८२-८३ आर्थिक वर्षापासून झालेल्या लेखापरीक्षणात अनेक आक्षेप प्रलंबित आहेत. विभाग प्रमुखांनी खर्च रकमेच्या फायली उपलब्ध करून न दिल्यामुळे सुमारे चार हजार ३०४ कोटी रुपयांच्या रकमा आक्षेपाधीन आढळल्या आहेत. सर्व विभागांना महिन्यात प्रलंबित आक्षेपांच्या फायली उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले होते. याकडे सर्व अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचे यावरून दिसून येते.

महानगरपालिकेच्या सन १९८२-८३ ते मार्च २०२४ अखेर अंतर्गत लेखापरीक्षणात एकूण ५ हजार ७३७ कोटी ३१ लाख ९१ हजार ३५९ इतकी रक्कम संशयाच्या भोवऱ्यात आहे, तर सन १९९९ -२००० या वर्षात उच्च न्यायालयाच्या आदेशाने झालेल्या विशेष लेखापरीक्षणात वसूल पात्र रक्कम रुपये १७ कोटी २ लाख ८३ हजार ६२१ इतकी आहे.

आक्षेपाधीन रक्कम रुपये ५ कोटी ५ लाख ९५ हजार ३९९ रुपये इतकी आहे. अशी एकूण अंतर्गत लेखापरीक्षण व विशेष लेखापरीक्षणात ५ हजार ७५९ कोटी, ४० लाख, ७० हजार, ३७९ इतकी रक्कम वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे.

## काय सांगता एसएमसाठी खर्चले २४ लाख ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महापालिकेच्या कर संकलनासाठी मालमत्ताधारकांना मालमत्ता कराची बिले भरण्यासाठी त्यांच्या मोबाइलवर एसएमएस पाठवले जातात. ३ कोटी एसएमएस पाठविण्यासाठी २४ लाखांचा खर्च करण्यात आल्याची माहिती आहे. मालमत्ताकराची बिले वसूल करण्यासाठी कर संकलन विभागाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मालत्ताधारकांना मालमत्ताकराची बिले थेट त्यांच्या मोबाइलवर पाठविली जातात. ही बिले एसएमएसद्वारे थेट लिंक दिली जात आहेत. यामुळे मालमत्ताधारकांना ही बिले त्यांच्या मोबाइलद्वारे ऑनलाइन पद्धतीने भरता येतात. परिणामी कर संकलन विभागाच्या वसुलीत वाढ झाली आहे. कर संकलन विभागाकडून २०२३-२४ या आर्थिक वर्षात तब्बल २ कोटी एसएमएस मालमत्ताधारकांना पाठविण्यात आले आहेत. त्यासाठी गो टू मार्केट इंडिया या एजन्सीला १६ लाखांचे शुल्क अदा करण्यात आले.

## » Selected



## डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना भाजपतर्फे अभिवादन

**पिंपरी :** पूर्वी जम्मू काश्मीरमध्ये जाण्यासाठी परवाना लागत असे, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी 'एक देश, एक विधान आणि एक निशान (ध्वज) साठी लढा देत काश्मीरला भारताचा अविभाज्य घटक बनवण्यासाठी प्राणांची आहुती दिली. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा लढा आणि बलिदानाचे आपण सगळे कायम ऋणी आहोत, असे प्रतिपादन भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केले.पिंपरी-चिंचवड शहर भारतीय जनता पक्षातर्फे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करण्यात आली. यावेळी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सदस्य महेश कुलकर्णी, सरचिटणीस नामदेव ढाके, संजय मंगोडेकर, रवींद्र देशपांडे, माजी नगरसेवक सुरेश भोईर, मंडल अध्यक्ष निलेश अष्टेकर, तेजस्विनी कदम यांच्यासह भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. शंकर जगताप म्हणाले, "अखंड भारताचे स्वप्न पाहणाऱ्या डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा आज बलिदान दिन आहे. स्वातंत्र्यानंतर राज्यघटना लागू झाल्यानंतर तत्कालीन काँग्रेस नेतृत्वाखालील सरकारने कलम ३७० जोडून राष्ट्रीय अखंडतेला गंभीर धक्का देण्याचा प्रयत्न केला.

## 'ट्रॅश' लघुपटाद्वारे स्वच्छतेबद्दल जनजागृती

**भोसरी :** येथील परिसरात कचरा आणि अस्वच्छता पाहून उद्विग्न झालेल्या शिक्षकाने या विरोधात आवाज उचलत स्वतः हातात झाडू घेऊन परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी घेतलेल्या कष्टाची आणि लढ्याची कथा 'ट्रॅश' या लघुचित्रपटात दाखविण्यात आली आहे. या लघुपटाला पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले असून, शहर परिसरातील स्थानिक कलाकारांनी या लघुपटात भूमिका साकारल्या आहेत. हा लघुपट शाळा, सामाजिक संस्था, बचतगट, सोसायट्या आदी भागात जनजागृतीसाठी दाखविण्यात येणार असल्याचे दिग्दर्शक अरुण काळे यांनी सांगितले. सतीश पवार, अरुण काळे, नितीन कांबळे, सयाजी ठाकूर, एम. भरतराज, दीपाली पाटील, दिलीप पाटील, मनिषा जुन्नरकर, अशोक पालवे आदींसह चाळीस कलाकारांनी भूमिका केल्या आहेत. या लघुपटाची निर्मिती अरुण काळे, नितीन कांबळे, अनिल बेंद्रे, सोपान हरिसागर यांनी केली आहे.

## कंपनीची एक कोटीची आर्थिक फसवणूक

**पिंपरी :** कंपनीने निलंबीत केलेल्या कर्मचाऱ्याने कंपनीचा लॅपटॉप आणि मोबाईल परत न करता त्यातील माहितीचा उपयोग करून कंपनीचे तब्बल एक कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान केल्याची घटना येथे घडली आहे. याप्रकरणी निलंबित कर्मचाऱ्याच्या




विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. स्वरूप रौत (रा. झारखंड) असे गुन्हा दाखल झालेल्या निलंबित कर्मचाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी मानस प्रेमकुमार शर्मा (वय ४२, रा. वडगाव शेरी, पुणे) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. शर्मा यांची पिंपरी येथे रेणुका ऑटो कंपोनंट्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी आहे. या कंपनीमध्ये स्वरूप काम करीत होता. स्वरूप याला १२ जून रोजी निलंबित करण्यात आले होते. निलंबननानंतर स्वरूपने त्याच्या जवळील कंपनीचे लॅपटॉप आणि मोबाईल कंपनीला परत दिला नाही. त्या लॅपटॉप आणि मोबाईलमधील गोपनीय माहितीचा दुरउपयोग करून त्याने कंपनीची एक कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. स्वरूप याने मेलद्वारे खोट्या लैंगिक शोषण व इतर गैरव्यवहाराच्या आरोपांमध्ये अडकवण्याची शर्मा यांना धमकी दिल्याचे फिर्यादीत सांगण्यात आले आहे.पिंपरी पोलीस या घटनेचा पुढील तपास करीत आहेत.

**राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा**

## ब्लॅक स्पॉटमुळे अपघातात होतेय वाढ

**वडगाव मावळ :** पुणे-मुंबई महामार्गावर असलेले अनेक छेद रस्ते हे वाहतूक कोंडीचे आणि अपघातांचे ब्लॅक स्पॉट बनलेले आहेत. यामुळे महामार्गावरील वाढती रहदारी व अपघातांचा धोका लक्षात घेऊन रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी अनेकवेळा ब्लॅक स्पॉटची पाहणी केली. तसेच यावर कायमस्वरूपी सुरक्षाविषयक उपाययोजनांचे प्रस्ताव तयार केला आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी होत नसल्याने या ठिकाणी अपघातांची मालिका सुरूच आहे. देहूरोड ते लोणावळा महामार्गावर वीस ते बावीस ठिकाणी छेद मार्ग आहेत. या मार्गांचा वापर करून वाहने व पादचारी महामार्ग ओलांडत असतात. यामुळे भरधाव वाहनांमुळे झालेल्या अपघातांत अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

### यामुळे होत आहे कोंडी आणि अपघात..

- तळेगाव दाभाडे, चाकण, रांजणगाव व शहरातील मोठ्या कंपन्यांमुळे कंटेनर व अवजड वाहतूक करणारी वाहने, कामगार बस व प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाड्यांच्या संख्येत वाढ
- क्रशर उद्योगातील हजारो अवजड वाहने महामार्गावरून ये-जा करतात
- पुरेसे सेवा रस्ते नसल्याने व रस्त्यांवर अतिक्रमणे झाल्याने प्रवासी वाहतूक करणाऱ्या पीएमपीएलच्या बस, कामगारांची वाहतूक करणाऱ्या कंपनीच्या बस, विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल बस, रिक्षा आदी वाहने महामार्गावरच थांबतात
- अचानक नियंत्रण न मिळवता आल्याने मागून वेगाने येणारी वाहने धडकूनही अनेकदा अपघात
- द्रुतगती महामार्गावरून येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांना महामार्ग ओलांडावा लागत असल्याने सोमाटणे फाटा व वडगाव-तळेगाव फाटा येथे वाहतूक कोंडी
- वडगाव, तळेगाव फाट्यावर एमआयडीसी तसेच चाकण येथील औद्योगिक क्षेत्राकडे जाणारी मालवाहतुकीची अवजड वाहने तसेच द्रुतगती मार्गाकडे जाणारी वाहने यांची संख्या वाढत असल्याने वाहतुकीची कोंडी

## बससेवा!

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** सुदुंबरे गावात पीएमपीएमएलची बस दाखल झाल्यानंतर या बसचे स्वागत करताना गावकरी.

### गावकऱ्यांकडून आनंद व्यक्त

## ...अखेर सुदुंबरे गावात आली बस

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** शहरापासून अवघ्या बारा किलोमीटर अंतरावर असलेल्या सुदुंबरे गावात पीएमपीची बससेवा अखेर सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिकांसह चाकरमान्यांनी आनंद व्यक्त केला. रविवारी सकाळी दहाच्या सुमारास निगडीहून सुटलेल्या पीएमपी बसचे सुदुंबरे गावात आगमन झाले. यावेळी सुदुंबरे ग्रामपंचायतीच्या वतीने या पीएमपी बसचे स्वागत करण्यात आले. सरपंच मंगल गाडे यांनी यांनी बसला हार आणि नारळ वाढवून निगडी ते सुदुंबरे पीएमपी बसचे उद्घाटन केले. यावेळी उद्योजक कालिदास गाडे, उपसरपंच बापूसाहेब बोरकर, मा. उपसरपंच ताराचंद गाडे, सुरेश नाना गाडे, अभियंते शैलेंद्र चव्हाण, उद्योजक विजय गुंजाळ, संताजी महाराज मंदिराचे व्यवस्थापक चंद्रकांत जाधव आणि गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावात केंद्र सरकारचे महत्वपूर्ण एनडीआरएफ केंद्र आहे. सिद्धांत कॉलेज नावाची मोठी शैक्षणिक संस्था येथे आहे. हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी पिंपरी चिंचवड आणि मावळ तालुक्यातून येथे येत असतात. तसेच चाकण आणि तळेगाव एमआयडीसीत कामाला जाणारा मोठा कामगार वर्ग देखील याच गावातून ये-जा करीत असतो. याशिवाय गावाला लागुनच भंडारा डोंगर, सूदवडी, वासुली, भांबोली आणि इतर गावांच्या सीमा आहेत. तिथे जाणारे देखील सुदुंबरे गावातूनच ये-जा करतात. गेल्या अनेक वर्षांपासून गावात येण्यासाठी थेट पीएमपी बस नसल्यामुळे लोकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. गावात पीएमपी बससेवा सुरू करावी, अशी मागणी होत होती. अखेरीस त्याला यश आले आहे. असे सरपंच मंगल गाडे यांनी सांगितले.

### आमदार महेश लांडगेंच्या पुढाकाराने रस्त्याचा प्रश्न निकाली

## चिखली, दिघीतील विकासकामांचे भूमिपूजन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावे आणि सोसायटीधारकांच्या समस्या मार्गी लावण्यासाठी आम्ही सातत्यपूर्ण काम करीत आहोत. सर्वसामान्य नागरिकांना पायाभूत सोयी-सुविधा सक्षमपणे पुरवण्यासाठी कटिबद्ध आहोत, अशी भूमिका भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.

आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने चिखली येथील ताम्हाणे वस्ती येथे श्रीदत्त मंदिर सभामंडपाचे भूमिपूजन करण्यात आले. तसेच शिवछत्रपती हाउसिंग सोसायटी येथील रस्त्याच्या कामाचे भूमिपूजनही करण्यात आले. यावेळी मा. नगरसेवक सुरेश म्हेत्रे, जितेंद्र यादव, किसन बावकर, माजी क्रीडा समिती सभापती कुंदन गायकवाड, पांडुरंग साने, विनायक मोरे, निलेश भालेकर, संजय ताम्हाणे, सुदाम ताम्हाणे, राजू म्हेत्रे, सुहास ताम्हाणे यांच्यासह परिसरातील भाविक, रहिवाशी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

> गेल्या १० वर्षांमध्ये दिघी गावची 'कनेक्टिव्हीटी' वाढवण्यासाठी मुख्य रस्ते आणि पर्यायी रस्त्यांचा प्रश्न सोडवण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.
> तसेच, महायुती सरकारच्या माध्यमातून समाविष्ट गावांच्या विकासाला प्राधान्य दिले असून, पायाभूत सोयी-सुविधांसह सोसायटीधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सोसायटीधारक, नागरिकांनी नागरी समस्या मार्गी लावण्यासाठी परिवर्तन हेल्पलाईन : ९३ ७९ ९० ९० ९० वर संपर्क करावा, असे आवाहन करतो.
>
> **- महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## शहरात बेकायदा रिक्षांचे प्रमाण वाढले

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** वाहन नोंदणी कायद्यानुसार एका ऑटो परमिटवर एकच ऑटो रिक्षाची नोंदणी केली जाऊ शकते. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात परमिटपेक्षा जास्त रिक्षांची नोंदणी झाली असल्याची माहिती समोर आली आहे. ३३ हजार ऑटो परमिट वितरित करण्यात आले करण्यात आले आहेत. यामध्ये नोंदणी ३९ हजार ऑटो रिक्षांची झाली असल्याचे समजते. अनेक रिक्षा तर पंधरा वर्षांनंतरही विना फिटनेस प्रमाणपत्राशिवाय रस्त्यावरून धावत आहेत. यावरून आता बेकायदा रिक्षांची संख्या वाढली असल्याचे दिसते आहे.

राज्यात २०१७ पासून ओपन परमिट प्रणाली सुरू करण्यात आली. त्यामुळे मागेल त्याला परमिट हे धोरण स्विकारण्यात आले. याचा परिणाम असा झाला की, राज्यासह परराज्यातील अर्जदारांना परमिट देण्याचा धडाकाच सुरू झाला. यामुळे शहरातील रिक्षांची संख्येत झपाट्याने वाढ झाली. मोठ्या प्रमाणात रिक्षांची संख्या वाढल्याने विविध रिक्षा संघटनांनी परिवहन विभागाकडे ऑटो रिक्षा परमिट बंद करण्याची मागणी केली.

### सरासरी चार ते पाच तास वीज गायब; नागरिकांची संतप्त प्रतिक्रिया

## शहर उपनगरांतील वीजेचा लपंडाव थांबेना!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

### वीजे अभावी पाणी भरण्यात अडचण..

● येथील थेरगाव, काळेवाडी, वास्तु उद्योग, चिंचवड, आकुर्डी, निगडी आदी भागांत नळाला पाणी येणार त्याचवेळी विद्युत पुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे नागरिकांना पुरेसे पाणीदेखील भरता येत नसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. शहरातील ५० टक्के ओव्हरहेड वाहिन्या असून त्यालाही जीर्ण स्वरुप प्राप्त झाले आहे. पिंपरी मार्केट, भोसरी, बालाजीनगर, रावेत, आकुर्डी परिसरातील विद्युत तारा जमिनीकडे झुकल्या आहेत. दोन खांबांदरम्यान तारांना जागोजागी जोड दिले आहेत. त्यामुळे, पावसाळी वातावरण होऊन वारा आल् ययास शहरातील अनेक भागांतील वीजपुरवठा खंडित होत आहे. मोरवाडी, रावेत, पुनावळे परिसरात गेल्या दोन-तीन महिन्यांपासून कमी दाबाने वीज पुरवठा होत आहे. याबाबत अनेक वेळा तक्रारी करूनही स्वतंत्र रोहित्र बसविण्यात आलेले नाही.

**पिंपरी :** गेल्या १५ दिवसांपासून शहरासह उपनगरात मान्सूनपूर्व कामांमुळे दिवसाला चार ते पाच वेळा वीज पुरवठा खंडित होत आहे. सध्या पावसाचे दिवस सुरू झालेले आहेत. त्यामुळे ठिकठिकाणी खोदकाम होत असल्याने वीजवाहिन्या तुटून विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले असल्याचे येथील विविध भागात पाहिला मिळत आहे. शहर आणि उपनगरांत महावितरणकडून मान्सूनपूर्व कामे होत आहेत. तर काही भागांत वेगवेगळ्या कारणांमुळे खोदकाम करण्यात येत आहे. वाढता वीजभार हे देखील वीज पुरवठा खंडीत होण्याचे कारण असल्याचे महावितरणचे म्हणणे आहे. मात्र, वेळी अवेळी वीजपुरवठा सतत खंडीत होत असल्याने नागरिक संताप व्यक्त करीत आहेत.

महावितरणाच्या माध्यमातून विविध योजनांच्या नवीन वीज यंत्रणा उभारणीचे काम सुरू आहे. महावितरणाकडे मनुष्यबळाचा अभाव आहे तसेच साधनांचा तुटवडादेखील त्यांना भासत आहे. एखादा भागात वीज पुरवठा खंडित झाल्यास बाहेरचे मनुष्यबळ मागवून कामे केली जात असल्याचेदेखील महावितरणाकडून सांगण्यात येत आहे. खोदकाम करताना वीजवाहिनी तुटल्यावर वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी अनेक तास लागत आहेत. परिणामी वीजपुरवठा खंडीत होत आहे.

#रा

## हवामान खात्याचा अतिवृष्टीचा इशारा

# अकोल्यात मुसळधार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अकोला:** अकोल्यात मुसळधार पाऊस होत असून, अकोट तालुक्यात पठार नदीच्या पाण्यात अचानकपणे पहाटेपासून वाढ झाली आहे. त्यामुळे पनोरी आणि जनोरी गावांचा संपर्क तुटला आहे. राज्यातील काही जिल्ह्यांना हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. यामध्ये कोकणातील जिल्ह्यांचा समावेश आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी योग्य ती खबरदारी बाळगावी असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### काही भागात पेरण्यांना वेग

● ज्या भागात चांगला पाऊस झाला आहे, त्या भागात पेरणीच्या कामांना वेग आला आहे. ठिकठिकाणी शेतकरी पेरणी करताना दिसत आहेत. मात्र, काही ठिकाणी अद्यापही पेरणीसाठी चांगल्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे. दरम्यान, चांगला पाऊस झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. साधारणत: १०० मिलीमीटर पावसाची नोंद झाल्याशिवाय शेतकऱ्यांनी पेरणी करू नये असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

मुसळधार पावसामुळे पठार नदीला पूर आला आहे. नदीवर पुलाचे बांधकाम सुरू आहे, म्हणून गावकऱ्यांना पर्यायी वाहतुकीसाठी पर्यायी रस्ता बांधला होता. पण सातपुडा पर्वतरांगातील पावसामुळे पठार नदीला पूर येऊन हा पर्यायी रस्ता वाहून गेला आहे. सद्यस्थितीत दोन्ही गावांचा संपर्क तुटला असून गावकऱ्यांचा नदीतून जीवघेणा प्रवास सुरू आहे.

दरम्यान, मुंबई, ठाणे, भिवंडी, नवी मुंबईसह लगतच्या भागात पावसाची रिमझिम सुरू आहे. मुंबईच्या तुलनेत मुंबई महानगर प्रदेशात पावसाचा



जोर अधिक आहे. मुंबई शहर आणि उपनगरात एखादी सर पडत असली तरी ढगाळ हवामान कायम आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याला रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर रत्नागिरी, सातारा, कोल्हापूरला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. सोमवार, मंगळवार आणि बुधवारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर, पुणे या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.



## बोगस शेअर गुंतवणुकीत १४ लाखांचा फटका

**द व्हॅल्यू टीम ए १३'**






**ठाणे :** शेअर ट्रेडिंग घोटाळ्याचा बळी होऊन एका व्यक्तीचे सुमारे १४ लाख रुपयांचे नुकसान झाले. कल्याण परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीची ९ एप्रिल ते २१ मे दरम्यान ही फसवणूक झाली होती. याप्रकरणी पीडिताच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारीत म्हटले आहे की, त्याला 'द व्हॅल्यू टीम ए १३' नावाचा एक व्हॉट्सॲप ग्रुप सापडला. अनेक सदस्य स्वत:ला तज्ञ म्हणवत होते. ते लोक शेअर बाजारातून पैसे कमवण्याच्या टिप्स देत होते. दरम्यान, त्यांनी लोकांना ॲप्लिकेशन वापरून गुंतवणूक करण्यास प्रेरित केले. त्याने सुचवलेल्या अर्जाद्वारे पीडिताने एकूण १३ लाख ६० हजार रुपयांची गुंतवणूक केली, परंतु त्या बदल्यात त्याला एकही पैसा मिळाला नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिस पुरावे गोळा करून आरोपींचा शोध घेत आहेत.



## सुजय, आपण पुन्हा लढू अन् जिंकू : शिंदे



**अहमदनगर:** 'सुजय नाराज होऊ नको, आपण लढणारे आहोत, पुन्हा लढू, पुन्हा जिंकू,' असा कानमंत्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दक्षिण नगर लोकसभा मतदारसंघातील पराभूत उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील यांना दिला. नाशिक शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी शिंदे यांनी किशोर दराडे (Kishor Darade) यांच्या प्रचारार्थ लोणी येथे बैठक घेतली. यावेळी ते म्हणाले, की सहकाराचे बीज रोवण्यात विखे कुटुंबाची भूमिका महत्वाची आहे. लोकसभेतील निकालावरून आपल्याला काही बोध घेण्याची निश्चित गरज आहे.

## वर्सोवा दुर्घटनेतील पीडित कुटुंबास ५० लाख

**ठाणे** : वर्सोवा खाडीजवळ झालेल्या दुर्घटनेत जेसीबीसह अडकलेल्या मजुराच्या कुटुंबीयांस मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ५० लाख रुपये मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. राकेश यादव यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी बोलावून ही मदत देण्यात आली. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री शिंदे यांनी वर्सोवा खाडीजवळील घटनास्थळी भेट दिली होती. त्यावेळी पीडित कुटुंबीयांचे सांत्वन करत मदतनिधीची घोषणाही केली होती. वसईतील वर्सोवा येथे सूर्या प्रकल्पाचे काम सुरू असताना ५० फूट खोल खड्ड्यात पोकलेनवर काम करत असताना त्यावर सिमेंटचा गर्डर कोसळून दुर्घटना झाली होती. या दुर्घटनेला २५ दिवस उलटूनही पोकलेन चालकाचा मृतदेह बाहेर काढण्यात प्रशासनाला अद्याप यश आलेले नाही. मुख्यमंत्री शिंदे यांनी एमएमआरडीएला दिलेल्या निर्देशानुसार एल अँड टी कंपनीच्या वतीने ३५ लाख, तर १५ लाख विम्याचे असा एकूण ५० लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. तसेच, राकेशचा भाऊ दुर्गेश याला एल अँड टी कंपनीमध्ये नोकरीही देण्यात आली आहे.

# नीट पेपरफुटी प्रकरणी लातुरात २ शिक्षक ताब्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लातूर :** देशभरात गाजत असलेल्या नीटचे धागेदोरे महाराष्ट्रापर्यंत पोहचले आहेत. नीट परीक्षेतील गैरव्यवहार प्रकरणी लातूरमध्ये खासगी कोचिंग क्लासेस चालविणाऱ्या दोन शिक्षकांना एटीएसच्या पथकाने संशयित म्हणून ताब्यात घेतले आहे.

ताब्यात घेण्यात आलेले दोन्ही शिक्षक जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक आहेत. संजय जाधव आणि जलील पठाण अशी या शिक्षकांची नावे आहेत. संजय जाधव बोथी (ता. चाकूर) येथील रहिवासी असून सोलापूर जिल्ह्यातल्या टाकळी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक आहेत. जलील पठाण लातूरजवळच्या कातपूर जिल्हा परिषद शाळेत शिक्षक आहेत. हे दोघेही लातूरमध्ये खासगी कोचिंग क्लासेस चालवितात.

### झारखंडमधील सहा जणांना अटक केली

● बिहार पोलिसांनी नीट प्रकरणात झारखंडमधील सहा जणांना अटक केली आहे. झारखंडच्या देवघर जिल्ह्यातील सहा जणांची पोलिसांनी चौकशी सुरू केली. आरोपी झुनू सिंग यांच्या घरी राहत होते. परमजीत सिंग, प्रशांत कुमार, अजित कुमार, राजीव कुमार, पंकू कुमार यांना ताब्यात घेतले आहे.

केंद्र सरकारने नीट परीक्षा २०२४ मधील गैरव्यवहाराचा तपास सीबीआयकडे सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. नीटचे महासंचालक सुबोधकुमार सिंह यांची हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यांच्या जागी प्रदीपसिंह खरोला यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू आहे. गुजरात, हरियाणा, पंजाब, झारखंड आणि बिहारनंतर या प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रापर्यंत आले आहेत.

लातूरमध्ये नीट परीक्षेची तयारी करण्यासाठी हजारो विद्यार्थी राज्यभरातून येतात. याचाच गैरफायदा घेऊन नीट परीक्षेचा पेपर फोडणारे रॅकेट लातूरमध्ये चालत असावे, असा संशय तपास यंत्रणांना आहे. त्यामुळे ताब्यात घेतलेल्या शिक्षकांकडून काही माहिती मिळते, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## एटीएम मशीन फोडून पिकअपने पळवले

**बीड :** धारूर येथे चार चोरांनी एसबीआय बँकेचे एटीएम मशीन अवघ्या दोन मिनिटात फोडून नंतर ते पिकअपला बांधून पळवले. हे संपूर्ण दृश्य परिसरात लागलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले होते. बँक कर्मचारी आणि पोलिसांनी अवघ्या चार तासांमध्ये ६१ किलोमीटरच्या पाठलागानंतर याचा छडा लावत २१ लाख १३ हजार ७०० रुपयांची रोकड परत आणली आहे.

गेवराई परिसरातील जायकवाडी शिवारात असलेल्या पत्र्याच्या शेडमधून अखेर हे एटीएम मशीन जप्त करण्यात आले. धारूरचे पोलिस निरीक्षक देविदास वाघमारे यांनी कर्मचाऱ्यांसह ही कारवाई केली असून फरार असणाऱ्या चार आरोपींचा शोध सध्या पोलीस घेत आहेत. चोरीची संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्या आधारे या आरोपींचा तास सुरू असल्याची माहितीही पोलिसांनी दिली आहे.

# 'नाशिकमधील पत्रक वाटप पूर्ववैमनस्यातून'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक:** पंचवटीतील काळाराम मंदिराच्या परिसरात आक्षेपार्ह पत्रके वाटण्यात आल्यामुळे शनिवारी या भागात तणाव निर्माण होऊन एका समाजाने रास्ता रोको केला होता. या पत्रकात काळाराम मंदिराच्या आसपास असणाऱ्या विशिष्ट समाजातील लोकांना मंदिरात प्रवेश वर्ज्य असल्याचे म्हटले होते. त्यावरून राज्यात मोठा गदारोळ निर्माण झाला होता. या प्रकरणी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टीकरण देत हे पत्र प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीला अटक करण्यात आल्याचे सांगितले. दुसऱ्या व्यक्तीशी असलेल्या वैमनस्यातून हा प्रकार केला गेल्याचे फडणवीस यांनी म्हटले.

### सर्व प्रश्नांचा तपास

● आरोपीकडून चार मोबाईल, दोन लॅपटॉप जप्त केले आहेत. त्या व्यक्तीच्या पाठिशी कोण आहेत? दंगल घडवण्यासाठी त्याने हे पत्र काढले आहे का? ज्याच्या नावाने पत्र काढले, त्याच्याशी त्याचे काय वैर होते? त्या व्यक्तीला बदनाम करण्यासाठी त्याने पत्र काढले आहे का? या सर्व प्रश्नांचा तपास नाशिक पोलीस करत आहेत.

ज्याच्या नावाने पत्र काढले, त्याच्याशी त्याचे काय वैर होते? त्या व्यक्तीला बदनाम करण्यासाठी त्याने पत्र काढले आहे का? या सर्व प्रश्नांचा तपास नाशिक पोलीस करत आहेत.फडणवीस म्हणाले की, त्या पत्रासंदर्भात सर्व माहिती पोलिसांनी काढली आहे. काळाराम मंदिराच्या आसपास राहणाऱ्या लोकांना धमकी देणारे पत्र काढण्यात आले होते. ते पत्र प्रसिद्ध करणाऱ्या व्यक्तीला अटक करण्यात आलेली आहे. दुसऱ्या व्यक्तीशी असलेल्या वैमनस्यातून हे पत्र काढले गेले आहे. हे पत्र काढणारी व्यक्ती अनुसूचित जातीचीच आहे. त्यामागे काय कारण आहे, हे शोधले जात आहे. हे पत्र काढून पत्र सोशल मीडियावर टाकायचे आणि लोकांमध्ये गैरसमजुती निर्माण करून दंगल घडवण्याचे प्रयत्न यापुढेही होऊ शकतात. त्याकडे आम्ही पूर्ण लक्ष ठेवून आहोत.

## नाशिक शिक्षक मतदारसंघात आरोप अन् सफाई

# हो, पैसे वाटले; पण बूथ उभारणीसाठी!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** नाशिक शिक्षक मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार किशोर दराडे यांचे बूथ उभारण्यासाठी पैशाचे वाटप केल्याची कबुली महायुतीच्या नेत्यांनी दिल्यानंतर आता निवडणूक निर्णय अधिकारी असलेले विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

विधान परिषदेच्या शिक्षक मतदार संघासाठी नाशिक विभागीय मतदारसंघांमध्ये निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. विद्यमान आमदार किशोर दराडे यांनी ठाकरे गटाची साथ सोडून शिंदे गटाची साथ पकडली आहे. त्यांच्या प्रचारासाठी खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर महाराष्ट्राचा दौरा केला. हा दौरा सुरू असताना जळगाव येथील आदित्य लॉन्समध्ये शिक्षकांची बैठक झाली त्यानंतर शिक्षकांना पैशाचे वाटप करण्यात आले. याबाबतचा व्हिडिओ ठाकरे गटाच्या सुषमा अंधारे यांनी सर्वांसमोर आणल्यानंतर प्रथम नाही म्हणणाऱ्या शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी पैशाचे वाटप झाले पण बूथ उभारण्यासाठी, असे



कबूल केले. कर्तव्यकठोर अधिकारी डॉ. प्रवीण गेडाम यांनी निवडणूक आयोगाला पैसे वाटप झाल्याचा अहवाल पाठवला तर दराडे यांच्या अडचणी वाढू शकतात.

सुषमा अंधारे यांनी एक्स या सोशल मिडियावर माध्यमावर व्हिडिओ शेअर करत मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर निशाणा साधला होता. मुख्यमंत्री शिंदे यांची जळगावातील आदित्य लॉन्स येथे सभा झाली. सभेनंतर जिल्ह्यातून आलेल्या शिक्षक, कर्मचारी, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांना पैसे वाटप करण्यात आले. सभेला उपस्थित असणाऱ्या अपक्ष उमेदवारांनी हे व्हिडिओ काढले आहेत. याबाबत आणखी व्हिडिओ आहेत.

## मंगेश चिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी तथा मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या १५ जून रोजी झालेल्या वाढदिवसाच्या निमित्ताने करमाळा तालुक्यातील शाळा, ग्रामपंचायत, रस्त्याच्या बाजूला फळ झाडांची लागवड करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदान करून चिवटे यांना आरोग्यदायी शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्य शासनाची महत्वाकांक्षी योजना म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे पाहिले जाते. चिवटे यांनी या योजनेची संकल्पना मांडून योजना शासनाच्या चौकटीत बसवत ती यशस्वी करून दाखवली. आत्तापर्यंत हजारो रुग्णांचे प्राण या योजनेमुळे वाचले आहेत. तर २५० कोटीहून अधिक मदत या कक्षाच्या माध्यमातून वितरित करण्यात आली आहे. आंबा, नारळ यासारख्या ६०० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी वैद्यकीय सहाय्यक गणेश चव्हाण, ग्रामविकास अधिकारी हनुमंत देशमुख, कृषीतज्ञ श्रीकांत सानप, धुळदेव शेंबडे, तुषार निमगिरे आधी मान्यवर उपस्थित होते.



**सोलापूर :** मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी तथा मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या १५ जून रोजी झालेल्या वाढदिवसाच्या निमित्ताने करमाळा तालुक्यातील शाळा, ग्रामपंचायत, रस्त्याच्या बाजूला फळ झाडांची लागवड करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदान करून चिवटे यांना आरोग्यदायी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मोडका पिंजरा तोडून बिबट्याने ठोकली धूम!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अहमदनगर:** विहिरीत पडलेल्या बिबट्याला बाहेर काढण्यासाठी लावलेला पिंजरा मोडकळीस आलेला असल्याने बिबट्याने पिंजरा तोडून परिसरातील शेतात धूम ठोकली. हा प्रकार कोपरगाव तालुक्यातील भोजडे शिवारातील घनगाव वस्ती येथे घडला. वन विभागाचे पथक बिबट्याला बाहेर काढताना हा गंभीर प्रकार घडला.

वनविभागाच्या गलथान कारभारामुळे प्रकार घडल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे. सुदैवाने कोणालाही इजा झाली नाही; मात्र वन विभागाच्या कामकाजावर ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. लोखंडी पिंजरा आणण्याऐवजी मोडकळीस आलेला लाकडी पिंजरा का आणला? असा सवालही ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.



गौतम घनगाव यांच्या विहिरीमध्ये बिबट्या पडल्याची माहिती गावात पसरताच गावकऱ्यांनी विहिरीजवळ एकच गर्दी केली. बिबट्याचा जीव वाचायला हवा, यासाठी विहिरीमध्ये दोरीच्या साह्याने खाट टाकली. खाटेच्या सहाय्याने बिबट्याला पाण्यात बुडण्यापासून वाचवता येईल आणि बिबट्याला सुखरूप वन विभागाकडे सोपवता येईल, असा विचार त्यामागे होता. मात्र वनविभागाने आणलेला निकृष्ट दर्जाचा पिंजरा तुटल्याने बिबट्या क्षणार्धात फरार झाला.

## 'माळीण' टाळण्यासाठी ३१ धोकादायक गावांची यादी

# सप्तश्रृंगी गडाचा जिओलॉजिकल सर्व्हे


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नाशिक :** जिल्हा प्रशासनाने महाराष्ट्राचे आराध्य दैवत व साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या सप्तश्रृंगी गडासह कळवण तालुक्यातील ३१ धोकादायक गावांची यादी तयार केली आहे. पावसामुळे या गावांमध्ये भूस्खलन होण्याचा धोका अधिक असल्याने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने जिओलॉजिकल सर्वेक्षणासाठी प्रस्ताव पाठवला आहे. पावसाळ्यात दरड कोसळून 'माळीण' सारखी दुर्घटना घडू नये, यासाठी प्रशासन ही काळजी घेत आहे.

कळवणमध्ये अनेक गावे डोंगराच्या पायथ्याशी असून लोकवस्ती आहेत. सप्तश्रृंगी गडावर पावसाळ्यात दरड कोसळण्याचा धोका अधिक असतो. त्यातून रस्ता बंद होणे, वाहतूक कोंडी होते. तसेच भूस्खलन होऊन भराव पाहून

### ९१ कोटींचे तीन प्रस्ताव

● संभाव्य धोका टाळण्यासाठी सप्तश्रृंगी गडाच्या सुरक्षेसाठी विशेष बाब म्हणून ९१ कोटी २० लाखांचे तीन प्रस्ताव राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे पाठवण्यात आले आहेत. मात्र त्यावर अद्याप कुठलीही अंमलबजावणी करण्यात आली नाही.



येत असल्याच्या घटनांमुळे भाविक व ग्रामस्थांच्या जीवितास धोका निर्माण होत शक्यता अधिक असते.

सप्तश्रृंगी गड, मांगलीदार, ततानीपाडा, जामले, कोसुर्डे, भाकुर्डे, करंभेळ, देसगाव, तिन्हळ, गांडूळ मोकपाडा, आमदर, दिगमे, खर्डेदिगर, उंबरगव्हाण, चोळीचामाळ, हनुमंतमाळ, महाल, पायरपाडा, काठरे दिगर, बोरदैवत, देरेगाव, वणी, मोहनदरी, नांद्री, मेहदर, मुळाणे वणी, वडाळे, पिंपरी माकैड, कातळगाव, पाळे पिंप्री अशा तब्बल ३१ गावांमध्ये माळीणसारखी दरड कोसळणे, पावसामुळे भूस्खलन होण्याच्या धोक्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

याशिवाय जिल्ह्यातील संरचनात्मक स्वरूपाच्या ४६ कामांसाठी १६३ कोटी २५ लाखांचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात आला आहे. बिगर संरचनात्मक स्वरूपाचा तीन कोटी दहा लाखांच्या चार कामांचा प्रस्ताव गेल्या महिन्यात प्रस्तावित करण्यात आला आहे. तर आपत्ती व्यवस्थापन विभागाने मार्च व मे २०२४ या कालावधीत २६० कोटी ६५ लाखांची विविध स्वरूपाची कामे प्रस्तावित केली आहेत. प्राप्त झालेले प्रस्ताव राज्य सरकार त्यांच्या तांत्रिक समितीकडे पाठतात. कामांची उपयुक्तता बघूनच त्यांना अंतिम मान्यता मिळते आणि निधी मंजूर केला जातो.

#रा

## ४०० पार झाल्यास संविधान बदलणार असल्याची अफवा

# ही निवडणूक अपप्रचार करणाऱ्यांची होती - श्रीरंग बारणे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणावळा :** देशहितासाठी आणि देशाच्या विकासासाठी अहोरात्र काम करणाऱ्यांची ही निवडणूक न्हवती तर अपप्रचार करणाऱ्यांची ही निवडणूक होती. समाजात अस्थिरता निर्माण करण्याचे आणि फूटीरतेची भावना पेरण्याचे काम विरोधी पक्षाने या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात केले. तसेच एनडीए ४०० पार गेल्यास संविधान बदलले जाणार हा अपप्रचार मतदारांमध्ये पसरवण्यात विरोधी पक्ष यशस्वी झाले. त्यामुळे एनडीए आघाडीला अपेक्षित यश नाही असे प्रतिपादन खासदार श्रीरंग बारणे केले.

सलग तिसऱ्यांदा खासदार झाल्यानंतर खासदार श्रीरंग बारणे यांचा महायुतीच्या वतीनं लोणावळ्यात नागरी सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना खासदार बारणे यांनी नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत विरोधी पक्षाने मतदारांमध्ये कसा अपप्रचार केला, कसा गैरसमज पसरवला, कशा अफवा पेरल्या आणि समाजात समाजात फूट पाडण्याचा कसा प्रयत्न केला याचा पाढाच वाचला. वरील सर्व अजेंडा राबविण्यात विरोधी पक्षाला यश आल्यानेच महायुती, एनडीए आघाडी अपेक्षित यशापासून दूर राहिली, अनेक दिग्गजांना पराभव पत्करावा लागला तर अनेकांचे मताधिक्य कमी झाल्याचे बारणे यांनी सांगितले. मी स्वतः मतदारसंघासाठी दिवसातील १२ तास काम करतो, पण माझ्या बाबत अपप्रचार केला गेला. मावळ मतदारसंघात आजवर स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक काम



आणि निधी मी केलं आहे. पण आम्ही त्याच भांडवल कधी केली नाही. सातत्याने खोटं नाट सांगितले तर ते सामान्य माणसाला खरं वाटत आणि तेच विरोधी पक्षाने आणि विरोधी उमेदवाराने माझ्याबाबतीत केले. माझ्या विरोधी उमेदवाराने त्यांच्या स्वतःच्या प्रभागात आजवर किमान एक तरी काम केलं का असा सवाल उपस्थित करीत मी कमी बोलतो आणि काम जास्त करतो, ही माझी कार्यपद्धती असल्याचे बारणे यावेळी म्हणाले.

लोकसभा आणि लोकसभेची निवडणूक ही इतर निवडणुकीपेक्षा वेगळी असते. मतदारसंघ खूप मोठा असल्याने निवडणूक काळात मला सर्वठिकाणी पोचता आलं नाही. पण महायुतीच्या कार्यकर्त्यांनी योग्य काम केले. त्यामुळेच माझा विजय सुकर झाल्याचे बारणे यांनी सांगितले. ज्यांनी मतं दिली त्यांचाही आणि ज्यांनी मतं नाही दिली त्यांच्यासह मी सर्वांचा लोकप्रतिनिधी आहे. मी सर्वांची काम करण्या करता निवडून आलो असून कोणामध्येही कसलाही दुजाभाव करणार नाही. माझं काम महायुतीच्या सर्वच नेत्यांनी प्रामाणिक केलं. मावळचे आमदार सुनील अण्णा शेळके यांनी देखील प्रामाणिक काम केलं, माझ्यासाठी ते स्वतः निवडणुकीच्या मैदानात उतरले होते. पण खालच्या कार्यकर्त्यांनी त्यांचं ऐकलं नाही आणि हे सर्वांना माहीत आहे असं बारणे यांनी यावेळी सांगितले. मतदारांच्या डोक्यात विष पेरण्याचे काम विरोधी पक्षांनी केली. पण मतदारांनी माझ्यावर विश्वास ठेवला, ४८ टक्क्यांपेक्षा अधिक मतदारांनी मला मतदान केले असल्याचे बारणे म्हणाले. यावेळी व्यासपीठावर आरपीआयचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, माजी नगराध्यक्षा सुरेखा जाधव, श्रीधर पुजारी, भाजपचे शहराध्यक्ष अरुण लाड, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष विलास बडेकर, शिवसेनेचे शहरप्रमुख संजय भोईर, मनसेचे शहराध्यक्ष भरत चिकणे, आरपीआयचे तालुकाध्यक्ष लक्ष्मण भालेराव यांच्यासह महायुतीचे अनेक आजीमाजी नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

संजय राऊत यांच्यावर टीका करताना रोज सकाळी येऊन भोंगा वाजवणाऱ्यावर विश्वास ठेवू नका. मोदींजींच्या नेतृत्वाखाली देश सक्षम आणि सुरक्षित असून, अजून पुढं जाणार असल्याचं प्रतिपादन बारणे यांनी केले. घरात बसून बोलणाऱ्यांना ठेच लागत नाही, बाहेर पडून जनतेची काम कारणाऱ्यांनाचा ठेच लागते. मी स्वर्गीय बाळासाहेबांच्या विचाराने काम करीत आलोय आणि भविष्यात एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बाळासाहेबांच्याच विचाराने काम करणार असल्याचं खासदार श्रीरंग बारणे म्हणाले.

निवडणुकीच्या वेळी खासदार साहेबांनी पुरेसा वेळ दिला नाही ही मतदारांची खंत होती. पण आता आपण वेळेचे नियोजन करून सर्वांना वेळ द्यावा अशी विनंती लोणावळा शहर राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष विलास बडेकर यांनी खासदार बारणे यांच्याकडे केली. शिवाय आपल्या माध्यमातून मावळ मध्ये एखादा मोठा प्रकल्प यावा अशी मागणी देखील केली. रेल्वेच्या संदर्भात केंद्राकडे पाठपुरावा करा, लोकल पुर्ववत करा, लांब पल्ल्याच्या गाड्या येथे थांबल्या पाहिजे. रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण झाले पाहिजे, वाहतूक समस्या सोडवली गेली पाहिजे. बाह्यवळण रस्त्यासाठी संरक्षण खात्याकडून आवश्यक असलेली जागा उपलब्ध करून द्या अशा अनेक मागण्या बडेकर यांनी यावेळी खासदार बारणे यांच्याकडे केल्या.

## आंबेगाव तालुक्यातील पूर्वभागात उन्हाळी भुईमूग काढणी अंतिम टप्प्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागातील उन्हाळी भुईमूग काढणी आता अंतिम टप्प्यात आली असून यावर्षी भुईमुगासाठी पोषक वातावरण असल्याने व उत्पादन झालेल्या शेंगांसाठी भावही चांगला मिळत असल्याने शेतकरी समाधानी असल्याचे धामणीतील वरचा बढेकर मळा येथील भुईमूगू उत्पादक शेतकरी बबन भागुजी बढेकर, संतोष बबन बढेकर व समीर संतोष बढेकर या भुईमूग उत्पादक शेतकऱ्यांनी सांगितले.

अतिशय कमी पाण्यावर व अतिशय रोगप्रतिकारक शक्ती चांगली असलेल्या उन्हाळी भुईमुगाकडे आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागातील शेतकरी वळला आहे. साधारणपणे फेब्रुवारी महिन्यात शेताची मशागत करून गादीवाफे तयार करून सारे पाडून अर्धा फुटाच्या अंतरावर हाताने या उन्हाळी भुईमुगाची लागवड करण्यात आली होती. खुरपणी करून खताची योग्य ती मात्रा देऊन थोडेसे पाणी भरून हे पीक जोमदार आले होते.

साधारणपणे चार ते साडेचार महिन्यात हा भुईमूग काढणीला आला आहे. मंचर बाजार समितीत या भुईमुगाच्या ओल्या शेंगांना दहा किलोस अडीचशे ते तीनशे रुपये भाव मिळत असल्याने घरच्या वापरासाठी थोड्या शेंगा ठेवून या ओल्या शेंगा विकण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे, असेही वरच्या बढेकर मळ्यातील संतोष बढेकर व समीर बढेकर यांनी सांगितले. मजूर मिळत नसल्याने सावडी पद्धतीने किंवा चौथ्या पाचव्या वाट्याने हा भुईमूग मजूर काढत आहेत. हा भुईमूग पावसाच्या आधी काढून शेतात बाजरी व तत्सम पिके पेरण्याच्या तयारीत इथला शेतकरी मग्न आहे. मांदळेवाडी येथील सेवा निवृत्त लष्करी अधिकारी रामदास पालेकर पाटील यांनीही कमी पाण्यावर अतिशय दर्जेदार भूईमूगाचे उत्पादन काढले आहे.त्यांनी आपल्या शेतात वीस किलो भूईमूगाची लागवड केली होती.

### भुईमूग काढणी

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील पूर्व भागातील उन्हाळी भुईमूग काढणी आता अंतिम टप्प्यात आली असून यावर्षी भुईमुगासाठी पोषक वातावरण असल्याने व उत्पादन झालेल्या शेंगांसाठी भावही चांगला मिळत असल्याने शेतकरी समाधानी आहे.

### Selected

## 'ओम एज्युकेशन सोसायटी'तर्फे माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन



**सासवड :** ओम एज्युकेशन सोसायटी संचलित ओम इन्स्टिट्यूट भोर तालुक्यातील सुप्रसिद्ध डॉक्टर इंजिनिअर घडवणारी फॅक्टरी आहे. ओम इन्स्टिट्यूट हे विद्यार्थ्यांसाठी एक संजीवनी ठरत आहे, ४० + डॉक्टर्स व २०० + इंजिनियर्स घडवणारे एकमेव इन्स्टिट्यूट म्हणून नावारूपाला येत आहे. येथील विद्यार्थी महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी सरकारी आणि प्रायव्हेट ठिकाणी कार्यरत आहेत. गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी, माजी विद्यार्थ्यांनी सहकार्याचा हात पुढे करत भविष्यातील अडचणीवर आम्ही सहकार्य करू असे आश्वासन दिले.

## पावसासाठी भैरवनाथास साकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाल्हे :** जून महिना संपत आलेला असून, अद्यापही पाऊस काय पडायचे नाव घेत नाही. त्यामुळे खरिपाच्या हंगामात शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. पावसाअभावी या भागातील पेरण्या रखडलेल्या असून, परिसरामध्ये भीषण पाणी टंचाई सदृश परिस्थितीने शेतकरी हवालदील झाला आहे. त्यामुळे चांगला पाऊस पडावा यासाठी वाल्हे (ता. पुरंदर) येथील ग्रामस्थांनी रविवार (ता. २३) पावसासाठी ग्रामदैवत श्री भैरवनाथांना साकडे घातले आहे.

वाल्ह्यासह आडाचीवाडी, सुकलवाडी, वागदरवाडी या गावांचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ आहे. ज्यावेळी पाऊस पडत नाही त्यावेळी ग्रामदैवतेला साकडे घातल्यानंतर देवाने याबाबत कौल दिला तरच पाऊस पडतो व खरीप हंगामाच्या पेरणीस सुरवात करण्याबाबतची ग्रामस्थांची श्रद्धा आहे. यावर्षी जून महिना संपता आला तरी मुबलक पाऊस लांबल्याने ग्रामस्थांनी एकत्र येत ग्रामदैवतेला ज्येष्ठ नागरिक भाऊसाहेब पवार यांच्या हस्ते महाभिषेक करून, विधीवत पूजा अर्चा करण्यात आली. त्यानंतर ग्रामदैवत श्री भैरवनाथ व देवी जोगेश्वरी यांची पूजा करत देवाला चांगला पाऊस पडू दे असे साकडे घालण्यात आले. सचिन आगलावे यांनी पौराहित्य केले.

यावेळी माजी सरपंच अमोल खवले, सूर्यकांत पवार, हनुमंत पवार, साहेबराव पवार, बाळासाहेब भुजबळ, प्रताप पवार, शिवाजी पवार, कैलास पवार, रवींद्र दुर्गाडे, भालचंद्र भुजबळ, नंदकुमार शिर्के, राजेंद्र दुर्गाडे, कांतिलाल भुजबळ आदींसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामदैवताच्या विधीवत पूजाअर्चा नंतर चांगल्या पाऊस व खरीप हंगामातील पेरणीसाठी साकडे घातल्यानंतर ग्रामदैवतेने कौल दिल्यानंतर "नाथ साहेबाच्या नावानं चांगभलं" च्या जयघोषात गुलालाची उधळण करीत ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी पुन्हा सुधारित धोरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी पूर्वीचे सर्व शासन निर्णय रद्द करण्यात आले आहेत. राज्य शासनाने जिल्हांतर्गत बदल्यांसाठी पुन्हा सुधारित धोरण लागू केले असून, ३१ मेपर्यंत ऑनलाइन बदल्यांची प्रक्रिया केली जाणार आहे. बदल्यांमधील अनियमिततांविरोधात शिक्षकांना दाद मागता येणार आहे. ग्रामविकास विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. २०२२ मध्ये शिक्षकांच्या ऑनलाइन बदल्यांबाबतचे सुधारित धोरण निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार ऑनलाइन बदली प्रक्रिया पूर्ण झाल्यावर काही शिक्षक संघटनांकडून सूचना, निवेदने शासनास प्राप्त झाली. तसेच उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांमध्ये याचिकाही दाखल झाल्या.

## जलजीवनचे काम सुरू झाले नाही तर उपोषण करणार : चित्तंरजन गायकवाड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी काळभोर :** हवेली मतदारसंघातील कदमवाकवस्ती ग्रामपंचायत या ठिकाणी सुरू असणारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत जलजीवन मिशन योजनेत घोटाळा झाला आहे. असा आरोप कदमवाकवस्ती माजी सरपंच देविदास काळभोर यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी हवेली तालुका समन्वय समितीच्या बैठकीत केला आहे, याला दुजोरा देत आमदार अशोक पवार यांनी एम जी पी चे मुख्य अभियंता राजेंद्र रहाणे यांना सदरील कामाच्या चौकशीची व चौकशी पूर्ण होईपर्यंत हे काम बंद ठेवावे अशी मागणी केली.त्याचसोबत विविध आरोपांमध्ये कॉन्ट्रॅक्टरचा नंबर सार्वजनिक का करत नाही?



चित्तरंजन गायकवाड व प्रीतम गायकवाड यांनी आपली वैयक्तिक पाईप लाईन यामध्ये केलेली आहे. व सदरील काम फक्त वार्ड क्रमांक १ व ६ मध्ये सुरू असून अजून वार्ड क्रमांक २,३,३,४,५ मध्ये सर्वे देखील झालेला नाही.

याला प्रतिउत्तर देताना नवपरिवर्तन फाउंडशनचे अध्यक्ष चित्तरंजन गायकवाड यांनी सांगितले की कॉन्ट्रॅक्टरचा नंबर घेऊन आमदारांच्या बगलबच्यांना काम पाहिजे का दाम पाहिजे. हा नंबर घेऊन हे लोक सुरू असलेली ही चांगली योजना बंद करतील अन्यथा या कॉन्ट्रॅक्टदाराला पैसे मागतील. विशेष म्हणजे कार्यक्षम आमदार यांना आपल्या मतदार संघात नेमके कोणती कामे कोणत्या कॉन्ट्रॅक्टदाराकडे आहे याची देखील माहिती नसेल तर हे अतिशय निंदनीय आहे.

यावरून कळते की आमदारांनी किती विकास या भागात केलेला आहे. त्याचसोबत शेतकऱ्यांचा कळवळा असणाऱ्या आमदारांनी एका शेतकऱ्याच्याच पाईप लाईनला विरोध करत असतील तर ती मी उद्या काढून टाकतो. २०१२ साली दुष्काळ सदृश्य परिस्थिती असताना त्रिंबक सर्जेराव गायकवाड व सरस्वती त्रिंबक गायकवाड या शेतकऱ्यांनी पांडवदंड आणि फुरसुंगीमधील काही भागाला आपल्या शेतातील चालू पिके जाळून पाणी पुरवठा केलेला आहे.

## लोणावळा भाजपाकडून जागतिक योगदिन उत्साहात साजरा



**लोणावळा :** २१ जून निमित्त साजऱ्या होणाऱ्या जागतिक योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी लोणावळा शहराच्या वतीने योग शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या योग शिबिरात सुक्ष्म योगा स्कुलचे पंकज शर्मा व हिमांगी वार्षने यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी विविध योग असनांचे धडे घेतले. लोणावळा शहरातील महिला मंडळ हॉल मध्ये पार पडलेल्या या योग शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना भाजप शहराध्यक्ष अरुण लाड यांनी भारताने जगाला दिलेल्या काही अमुल्य भेटींपैकी एक म्हणजे 'योग' हे आहे. जागतिक स्तरावर स्वीकारले गेलेले, भारतीय संस्कृतीचे हे एक महत्त्वाचे प्रतिक आहे. निरोगी शरीर आणि प्रसन्न मनासाठी सर्वांनी दैनंदिन योग करून, आपले आरोग्य जपावे असं प्रतिपादन केले. यावेळी लोणावळा नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्ष सुरेखा जाधव, उपनगराध्यक्ष श्रीधर पुजारी, अर्जुन पाठारे, हर्षल होगले, जयप्रकाश परदेशी, ललित सिसोदिया, राजाभाऊ खळदकर, बाबू संपत, शुभम मानकामे, चंद्रकांत गाडे, रुपेश नंदवटे, श्रावण चिकणे, शुभम दाभाडे, संतोषी तोंडे यांच्यासह अनेक मान्यवर आणि लोणावळेकर नागरिक उपस्थित होते.

## शिक्रापुरात लाच मागणाऱ्या वसुली अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरूर येथील शरद सहकारी बँकेच्या वसुली अधिकाऱ्यावर कर्ज प्रकरणी दाखल असलेल्या सर्व केसेस मागे घेण्याकरीता २ लाख २१ हजाराची लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला असून राजाराम मारुती डेरे असे लाच मागणाऱ्या वसुली अधिकाऱ्याचे नाव आहे.

शिक्रापूर येथील एका वकील तक्रारदार २०१३ मध्ये त्यांच्या मित्रासाठी शरद सहकारी बँक शिक्रापूर शाखेतून तीन कोटी रुपयाच्या कर्ज प्रकरणास कर्जदार हे रक्कम भरण्यास अपात्र झाल्याने कर्जदार व जामीनदाराविरुद्ध विविध केसेस दाखल करण्यात आले होते. सदर कर्जाची रक्कम थकल्याने अपर निबंधक सहकारी संस्था विभाग पुणे यांनी वसूली अधिकारी राजाराम डेरे यांची नियुक्ती केली होती. सदर कर्जदार हे रक्कम भरण्यास अपात्र झाल्याने कर्जदार व जामीनदारा विरुद्ध विविध केसेस दाखल करण्यात आल्याने सदर कर्जासाठी जमीनदार असलेले तक्रारदार यांनी नैतिक जबाबदारी स्विकारुन मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल करून उर्वरित कर्जाची सर्व रक्कम जामीनदार या नात्याने कर्ज खात्यात भरली व कर्ज बाकी नसल्याचा शरद बँकेकडून दाखला घेत तक्रारदार यांनी बँकेच्या संचालक मंडळास कर्ज वसुलीच्या दरम्यान लावलेल्या सर्व केसेस मागे घेण्याबाबत विनंती अर्ज केला होता. त्यास शिक्रापूर येथील शरद सहकारी बँकेने मान्यता देत तसा आदेश बँकेने वसुली अधिकारी राजाराम डेरे यांना दिला होता. त्याबाबत तक्रारदार हे वसुली अधिकारी राजाराम डेरे यांचेकडे पाठपुरावा करीत होते. मात्र वसुली अधिकारी राजाराम डेरे यांनी तक्रारदार यांच्याकडे थकीत कर्ज प्रकरणी दाखल केलेल्या सर्व केसेस मागे घेण्यासाठी ५ लाखांची लाचेची मागणी केली होती.


याप्रकरणी तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली असता सदर तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधिक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधिक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता वसुली अधिकारी राजाराम डेरे यांनी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती २ लाख २१ हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

### देशातील पहिला प्रयोग यशस्वी; एक हजार शेतकऱ्यांपर्यंत प्रकल्पाचा विस्तार

## ऊस उत्पादनवाढीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून ऊसाचे उत्पादन वाढवण्याचा देशातील पहिला प्रयोग यशस्वी झाला आहे. बारामती ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट, मायक्रोसॉफ्ट आणि ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या माध्यमातून हे तंत्रज्ञान विकसित करण्यात आले असून, आता हा प्रकल्प एक हजार शेतकऱ्यांच्या शेतावर राबवला जाणार आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पवार यांनी या बाबतची माहिती दिली. विश्वस्त प्रतापराव पवार, खासदार सुप्रिया सुळे या वेळी उपस्थित होते. गेल्या तीन वर्षांपासून बारामती येथील कृषी विज्ञान केंद्रात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित या तंत्रज्ञानाची यशस्वी चाचणी बारामती येथील कृषी विज्ञान केंद्रात घेण्यात आली आहे. कमी खर्चात अधिक उत्पादन देणारी ऊस शेती भविष्यात शक्य करण्याचा या प्रकल्पाचा उद्देश आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरातून कमी खर्चात अधिक उत्पादन देणारी ऊस शेतीचा प्रयत्न झाला आहे. त्यासाठी प्रयोगशील शेतकऱ्यांची निवड करून सातत्याने मार्गदर्शन करण्यात आले. ऊसापासून सुरू झालेला हा प्रयोग इतर पिकांपर्यंत विस्तारण्यात येईल. राज्यभरातील शेतकऱ्यांना यात सहभागी करत त्यांचे अर्थकारण बदलण्याचा हा प्रयत्न आहे, असे शरद पवार यांनी सांगितले.

प्रकल्पात उपग्रह तंत्रज्ञान, प्लॉट मॅपिंग, स्वयंचलित हवामान केंद्र, आयओटी सेन्सर प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने खत आणि पाणी व्यवस्थापन करता येते. जमिनीची सुपिकता, पोषणमूल्य आणि दर्जा टिकवता येतो. कुठले पीक कधी घ्यायचे आणि पिकांच्या निरीक्षणाद्वारे अद्ययावत माहिती शेतकऱ्याला मिळते.

### उत्पन्न २२ टक्क्यांपर्यंत वाढते

● हवामान बदलामुळे पिकांवर होणारे दुष्परिणाम वेळीच रोखून कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव टाळता येतो. संवेदक तंत्रज्ञानामुळे मातीमधील सर्व अन्नद्रव्याचे प्रमाण अवघ्या १० ते १५ मिनिटात कळते, हवामानातील तापमान, आर्द्रता, पानांचा ओलावा, सूर्यप्रकाशाची तीव्रता याची माहिती मिळते. ड्रोन तंत्रज्ञानामुळे पिकाचे आरोग्य, कीड व रोग ओळखणे, अन्नद्रव्याचे व्यवस्थापन करता येते. कमी वेळेत जास्त क्षेत्रात फवारणी करणे शक्य होते, त्यासाठी प्रती एकर ५०० ते ७०० रुपये खर्च येतो. त्यामुळे उत्पादन खर्च २५ ते ३० टक्क्यांनी कमी होऊन उत्पन्न २२ टक्क्यांपर्यंत वाढत असल्याचे दिसून आले.

#रा

## विजय शिवतारे : मराठी माणसातील धीरूभाई अंबानी बनण्याची इच्छा होती

# आयुष्यात महत्वाचा असतो तो 'आत्मविश्वास'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** नुकताच दहावी व बारावीचा निकाल लागला व पुढील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची लगबग सुरू झालेली आहे. या शैक्षणिक वर्षात ज्या विद्यार्थ्यांनी उजवलं यश संपादीत केले आहे.

पुरंदर तालुक्यातील प्रत्येक विद्यालयामध्ये, ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा व विद्यालयाचा गुणगौरव सोहळा सासवड येथील आचार्य अत्रे सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजन रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष पंकज धीवार यांनी केले होते.

या गुणगौरव सोहळ्याचे उदघाट्न दीप प्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून मा.राज्यमंत्री विजयबापू शिवतारे यांनी केले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करीत असताना ते असे म्हटले की माणसाला आयुष्यात महत्त्वाचे काय असेल तर ते म्हणजे आत्मविश्वास! मी मोठा बनणारच. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फारशा सुविधा उपलब्ध नसतात, क्लासेसच्या सुविधा नसतात. अशा प्रतिकूल परिस्थितीतून या विद्यार्थ्यांनी हे यश प्राप्त केलेले आहे ही मोठी जमेची बाजू आहे.मी शाळेत असतांना खूप वांड होतो, पण तेवढाच हुशार देखील होतो.

मला मराठी माणसातील धीरूभाई अंबानी बनण्याची इच्छा होती व त्या दृष्टिकोनातून माझे सातत्याने प्रयत्न होते. गरीब पण होतकरू हुशार विद्यार्थ्यांची उच्च शिक्षण घेण्याची इच्छा आहे परंतु आर्थिक दुर्बलता आहे अशा विद्यार्थ्यांनी माझ्याशी संपर्क करा,मी त्यांचा संपूर्ण शिक्षणाचा खर्च करेल. माझ्या कार्यालयाशी संपर्क करा किंवा या कार्यक्रमाचे आयोजक पंकज धिवार यांचेशी करा ते माझ्या पर्यंत पोहचवतील.



या कार्यक्रमाचा मुख्य आत्मा म्हणजे विद्यार्थ्यांना करिअर विषयी मार्गदर्शन करणे. यावेळी नामांकित अशा रयत प्रबोधिनी पुणे चे संचालक उमेश कुदळे यांनी करिअर विषयी मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी अनेक दाखले दिले व आपल्या करिअरच्या वाटा कशा निवडायच्या याविषयी सोप्या व समजेल अशा शब्दात मार्गदर्शन केले. या गुणगौरव सोहळ्याचे आयोजक तथा रिपब्लिकन पक्षाचे पुरंदर तालुका अद्यक्ष पंकज धिवार यांनी प्रास्ताविक केले. त्यावेळी ते असे म्हंटले की आपण समाजाचे काही तरी देण लागतो या भावनेतून व मुलांना प्रोत्साहन देऊन त्यांना भविष्यातील करिअर संबंधी मार्गदर्शन व्हावे यासाठी या सोहळ्याचे आयोजन केले आहे.जे बी काय करायचे ते सर्वोच्च करा असे ते यावेळी म्हंटले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष, रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना संबोधित करताना असे म्हटले की तुम्ही खूप मोठे व्हा.पण सर्वोच्च पद भूषविताना आपल्या आई-वडिलांना विसरू नका. मा. रामदास आठवले यांचेकडे केंद्रीय सामाजिक न्याय खाते आहे. त्या माध्यमातून मुलांना शिक्षणासाठी, परदेशात शिक्षणासाठी जाण्यासाठीच्या विविध योजना आहेत त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. व्हेंचर कॅपिटल ही आठवले साहेब यांच्या खात्याची योजना आहे. ज्याच्या माध्यमातून नवनवीन व्यवसायासाठी अत्यल्प दरात १५ लाखापासून १५ कोटी पर्यत चे कर्ज उपलब्ध करून दिले जाते.या योजनेचा लाभ घ्यावा. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन वनपुरी हायस्कुल चे शिक्षक दत्ता रोकडे यांनी केले. विद्यार्थ्यांना व शाळा प्रतिनिधींना मान्यवरांकडून सन्मानचिन्ह, पेन व वही देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष दिलीप नेवसे, पुरंदर हायस्कुल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य सय्यद सर अशा अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे युवाध्यक्ष स्वप्नील कांबळे, युवानेते गौतम भालेराव, सामाजिक कार्यकर्ते भगवान दिखले हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन अजय धिवार, प्रस्मित धिवार, बाळासाहेब धिवार, ओंकार धिवार, प्रतिक धिवार, अक्षय खवले, मनीष पवार, प्रवीण कांबळे, कोंडीबा कांबळे, राकेश कांबळे, युवराज धिवार, मयूर बेंगले, आकाश यादव यांनी केले.

## २५ ते ३० प्रवासी जखमी

# एसटी बस झाडावर आदळून भीषण अपघात; सुदैवाने जीवितहानी नाही

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**यवत :** सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दौंड तालुक्यातील सहजपुर जवळ एसटी बस झाडावर आदळून झालेल्या भीषण अपघातात २५ ते ३० प्रवाशी जखमी झाल्याची माहिती यवत पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी दिली. हा अपघात आज रविवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडला. मात्र या अपघातात सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

अपघात प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एसटी बस क्रमांक एमएच ४० एन ९५१९ ही पंढरपूर वरून मुंबई येथे सोलापूर -पुणे महामार्गाने जात होती. एसटी बस सहजपुर गावच्या हद्दीतील मकरवस्तीजवळ आली असता पुढे चाललेल्या ट्रक चालकाने अचानक ट्रक दुसऱ्या लेनवर घेतल्यामुळे एसटी बस चालकाचे नियंत्रण सुटून एसटी बस थेट महामार्गाच्या कडेला असलेल्या झाडावर जाऊन आदळली.

या अपघातात २५ ते ३० प्रवाशी जखमी झाले असून सुदैवाने जीवितहानी झाली नाही. जखमी प्रवाशांना रुग्णवाहिकेमधून उरुळी कांचन (ता. हवेली) येथील सिद्धिविनायक हॉस्पिटल, धनराज हॉस्पिटल, झेड प्लस हॉस्पिटल, हिमालया हॉस्पिटल या चार खाजगी रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. एसटीमधून साधारणतः ४० ते ४५ प्रवाशी प्रवास करीत होते. ट्रक चालकाच्या चुकीमुळे अपघात झाल्याने ट्रक चालकाविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

## भीषण

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




**यवत :** सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर दौंड तालुक्यातील सहजपुर जवळ एसटी बस झाडावर आदळून झालेल्या भीषण अपघातात २५ ते ३० प्रवासी जखमी झाले असून या अपघातात सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

# राजगुरू महाविद्यालयात योग दिनानिमित्त व्याख्यान व योग प्रात्यक्षिकांचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** जागतिक योग दिनाचे औचित्य साधून हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात व्याख्यान व योग प्रात्यक्षिकांचे आयोजन करून योग दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. सागर गाडे यांनी योग आणि मानवी आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. योगामुळे ज्ञान व आरोग्य चांगले राहत असून सर्वच वयोगटातील व्यक्तींना योगसाधनेची गरज आहे. मानसिक व शारीरिक आरोग्यासाठी योगासने प्रभावी असून योग हा सर्वांच्या जगण्याचा भाग व्हायला हवा असे त्यांनी सांगितले. तसेच त्यांनी उपस्थितांकडून योगाचे प्रात्यक्षिक करून घेतले.



या वेळी अनमोल इंगळे या विद्यार्थ्याने रिदमिक योगाचे प्रात्यक्षिक सादर केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. प्रतिमा लोणारी, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा.योगेश मोहिते, प्रा. सारिका गोरे, प्रा. तानाजी पिंगळे तसेच राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व क्रीडा विभागातील विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. प्रतिमा लोणारी यांनी तर आभार गणेश आहेरकर यांनी मानले.

# बलात्काराच्या गुन्ह्यातून मुलास सोडवितो असे सांगून साडे सहा लाखाची फसवणूक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** बनावट अश्लील चित्रफित तयार करून पन्नास लाखाची खंडणी मागणाऱ्या संदीप विठ्ठल चिकणे याने बलात्काराच्या गुन्ह्यातून तुमच्या मुलास सोडवितो असे सांगून साडेसहा लाख रुपयांची फसवणूक केल्याची फिर्याद सिंधू कांतीलाल टेंगळे यांनी दिली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी की संदीप चीकने हा आरोपी बनावट अश्लील चित्रफित तयार करून पन्नास लाखाची खंडणी मागितल्या प्रकरणी जेजुरी पोलीस स्टेशन मध्ये जेरबंद आहे. या आरोपी विरोधात आणखी तक्रारी दाखल होत आहेत. दुसऱ्या एका प्रकरणी फिर्यादी सिंधू कांतीलाल टेंगळे (वय ४५ रा. कर्नलवाडी, गुळुंचे, ता. पुरंदर) यांचा भाऊ देवा मारुती दगडे याला बलात्कारच्या गुन्ह्यात अटक झाली होती. आरोपी संदीप विठ्ठल चिकणे (वय ४७ रा. चिकणेवाडी, नाझरे क.प. ता. पुरंदर) याने फिर्यादीचे वडील मारुती दगडे यांची भेट घेऊन माझ्या ओळखीचे पोलीस अधिकारी, वकील आहेत. बलात्कार झालेल्या फिर्यादी महिलेस मी तक्रार मागे घेण्यास प्रवृत्त करतो. पण त्यासाठी पैसे खर्च करावे लागतील असे सांगून फिर्यादीच्या वडिलांचा विश्वास संपादन करून त्यांच्या कडून वेळोवेळी साडेसहा लाख रुपये घेतले. दरम्यान आरोपीने मुलाच्या जामिनाचे काम न केल्याने फिर्यादीचे वडील मारुती दगडे यांनी माझ्या मुलाचा जमीन का झाला नाही असे विचारले. त्याच्यावर आरोपीने त्यासाठी अजून पैशाची गरज आहे. तुम्ही मला तुमच्या जमिनीचे साठेखत करून द्या मी तुमच्या मुलाचा जामीन करून देतो. फिर्यादीचे वडील मारुती दगडे यांनी त्याच्यावर विश्वास ठेवून सासवड येथे साठेखत करण्यास गेल्यावर आरोपी संदीप चिकणे याने त्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेवून साठेखत व कुलमुख्त्यार पत्र स्व:ताच्या नावे करून घेतले.

फिर्यादिला याबाबत समजल्यावर त्यांनी आरोपीस जाब विचारला असता आरोपीने तुम्हाला कोठे जायचे तिकडे जावा. तुम्हाला जिवंत सोडणार नाही. अशी धमकी दिली.

POSITIVE NEWS!

जेजुरी

नादुरुस्त हापसा जेजुरी पालिकेने केला सुरू

# श्री समर्थ मठाचा पाणी प्रश्न मिटला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** येथील श्री स्वामी समर्थ मठ (अन्नछत्र )या ठिकाणी असणारा सार्वजनिक बोरवेल गेली अनेक दिवसांपासून नादुरुस्त झाल्याने दुष्काळात या परिसरात पाणी टंचाईचे सावट भीषण झाले होते. जेजुरी पालिकेने हा हापसा दुरुस्त केल्याने येथील पाणी प्रश्न मिटला आहे.

जेजुरी शहरातील श्री स्वामी समर्थ मठा जवळ पंधरा ते वीस वर्षांपूर्वी बोअरवेल घेण्यात आलेला होता. होता, या मठात दर गुरूवार, पौर्णिमा व उत्सव काळात अन्नछत्र सेवा सुरू असते.तसेच दररोज सकाळी व सायंकाळी पूजा आरती साठी भाविकांची मोठी गर्दी होते.सदरचे बोरवेल (हापसा) नादुरूस्तअसल्याने श्री स्वामी समर्थांच्या मठामध्ये व त्या ठिकाणी असणाऱ्या नागरिकांना पाणी उपलब्ध होत नसल्याने पाणी टंचाई निर्माण झाली होती.

या परिसरातील पाण्याची गरज भागवण्यासाठी येथील सामाजिक कार्यकर्ते अरुण जोशी यांनी जेजुरी नगरपालिकेमध्ये सदरचे बोअरवेल दुरुस्तीसाठी पाठ पुरावा केला. जेजुरी पालिकेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगु ले तसेच पाणीपुरवठा विभागाचे आधिकारी प्रसाद जगताप या बोअरवेल दुरुस्तीसाठी मोटर, वायर व पाईप उपलब्ध करून देवून हे बोअरवेल दुरुस्त केले. त्यामुळे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मठामध्ये पाणी टंचाईचे संकट दूर झाले. जेजुरी पालिकेने लक्ष घालून तातडीने बोअरवेल दुरुस्त केल्याने श्री स्वामी समर्थ मठ, भाविक व सामाजिक कार्यकर्ते अरुण जोशी यांनी पालिकेचे आभार मानले आहे.



## सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांचा पुढाकार

# पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गाबाबत समन्वय बैठक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या पुढाकाराने पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गाबाबत आंबेगाव तालुक्यातील लोणी येथे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी आणि लोणी व धामणी ग्रामस्थांसोबत समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले.



- आंबेगाव तालुक्यातील शेती, उद्योग, रोजगार निर्मितीस चालना मिळणार
- महामार्गासाठी शेतकऱ्यांना सहकार्य करण्यास सहमती
- शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य तो मोबदला

आंबेगाव तालुक्यातील शेती, उद्योग, रोजगार निर्मितीस चालना मिळणार आहे. शेतकऱ्यांनी केलेल्या जमिनीच्या दा दराबाबतच्या मागणी संदर्भात सकारात्मक विचार करण्यात येईल, असे महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या शंकाचे निरसन केल्याने शेतकऱ्यांनी महामार्गासाठी सहकार्य करण्यास सहमती दर्शवली.

यावेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे पुणे विभागाचे अप्पर जिल्हाधिकारी हनुमंत अरगुंडे, उपजिल्हाधिकारी भूसंपादन समन्वय कल्याण पांढरे, आंबेगावचे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, महामंडळाचे कार्यकारी अभियंता अजय भोसले यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

समृद्धी महामार्गाला या महामार्गाची जोडणी होणार असल्याने या भागात आणखी उद्योग येणार आहेत. पर्यायाने रोजगार निर्मिती होणार आहे. शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य तो मोबदला देण्यात येईल, असेही महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

#रा

## Selected



### विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप शिक्षणामुळे विद्यार्थी सुसंस्कारीत होतो : झेंडेपाटील

**जेजुरी :** पुरंदर तालुक्यातील दुष्काळी पट्ट्यातील पांडेश्वर गावातील गरीब गरजू होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी यशवंत विद्यालय भागशाळा पांडेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना कडेपठार ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या वतीने ६० विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष पुरंदर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माणिक झेंडेपाटील म्हणाले शिक्षण हे दुधारी शस्त्र आहे.शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.विद्यार्थी सुसंस्कारीत घडण्यासाठी मदत होते.शिक्षणामुळे स्वतः चार गावाचा आणि समाजाचा विकास साधला जातो.भागशाळेने विद्यालयाने गेल्या १५ वर्षांपासून १००% निकालाचे गुणवत्ता पुर्ण सातत्य राखल्या बदल सर्व अध्यापक आणि विद्यार्थी पालक व शाळेचे अभिनंदन करीत कौतुक केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते उत्तम शिंदे, संस्थेचे उपाध्यक्ष रोहिदास कुदळे मुख्यव्यवस्थापक अरविंद शेंडकर माजीसरपंच प्रताप रासकर, पोलीस पाटील अरूण धुमाळ ग्रामपंचायत सदस्य विजय नाळे प्रभारी मुख्याध्यापक रणजित खारतोडे तंटामुक्तीचे अध्यक्ष मुगुट शेंडगे, शहाजी जगताप दिपक शेळके, गौरव जगताप, शोभा भोसले ,सागर शितोळे मान्यवर उपस्थित होते . कार्यक्रमाचे प्रास्ताविक रणजित खारतोडे तर सूत्रसंचालन ज्ञानदेव खेडेकर यांनी मोहिनी कापरे आभार यांनी मानले

### बाल विकास मंदिर शाळेत योगदिन उत्साहात साजरा



**सासवड :** आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून सासवड येथील महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या बाल विकास मंदिर शाळेत योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. दिपक कांदळकर यांनी सर्व विद्यार्थ्यांना योग दिनाची माहिती सांगितली. योगासन सूर्यनमस्कार प्राणायाम केल्याने होणारे फायदे समजून सांगितले. माणिक शेंडकर यांनी विद्यार्थ्यांकडून योगासन प्राणायाम सूर्यनमस्कार यांचे प्रात्यक्षिक करून घेतले. यात ३७० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यावेळी नियमित योगासन सूर्यनमस्कार घालण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे उत्तम असे नियोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मीना खोमणे यांनी केले. यावेळी, शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब बडधे , ज्येष्ठ शिक्षिका मंजुषा चोरमले, क्रीडा शिक्षक नरेंद्र महाजन सर्व शिक्षक उपस्थित होते.

### इंदू स्कूलमध्ये योगदिनी विविध उपक्रमांनी साजरा



**जेजुरी :** आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त पुरंदर तालुक्यातील उपक्रमशिल असणाऱ्या इंदू इंग्लिश स्कूल कोळविहिरे येथे विविध उपक्रमांनी योग दीन साजरा करण्यात आला. जागतिक योग दिनानिमित्त इंदू इंग्लिश स्कूलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी योगा तज्ञ हरिश्चंद्र चामे यांनी विविध योगा प्रकार व त्यांचे आरोग्याविषयी महत्वाचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. व्यसनमुक्ती संघटनेचे उपाध्यक्ष आनंद नाईक यांनी योगा व व्यसन मुक्ती याविषयी माहिती दिली .तसेच जेजुरी उद्योजक संघाचे सचिव राजेश पाटील यांनी विद्यार्थ्यांना पौष्टिक आहाराचे वाटप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र खोपडे यांनी केले .यावेळी इंदू स्कूलच्या संस्थापिका इंदुमती कुटे, अध्यक्ष डॉ. रामदास कुटे, सचिव डॉ. मोनाली कुटे, प्राचार्य पुरुषोत्तम रोटे समन्वयक ठकसेन दुबळे ,मीना पाटील,मृणाल पाटील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## ज्ञानवापी परिसर सर्वेक्षणाचा दिला होता आदेश

# त्या न्यायाधीशांना संरक्षण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ :** ज्ञानवापी परिसराची व्हिडिओग्राफी संरक्षणाची परवानगी देणाऱ्या न्यायाधीशांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. एनआयएने अलाहाबाद उच्च न्यायालयाला न्यायाधीश रवी कुमार दिवाकर यांच्या सुरक्षेत वाढ करण्याची विनंती केली. दिवाकर यांनी २०२२ मध्ये ज्ञानवापी परिसराचे सर्वेक्षण करण्याची परवानगी दिली होती. तेव्हापासून त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याच्या धमक्या येत आहेत.



एनआयए न्यायालयाचे विशेष न्यायाधीश विवेकानंद शरण त्रिपाठी यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रार जनरल यांना पत्र लिहून न्यायाधीश दिवाकर यांना अधिक सुरक्षा देण्यात यावी, अशी मागणी केली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश दिवाकर यांना धमकावल्याप्रकरणी आरोपी अदनान खानविरुद्ध एफआयआर दाखल झाल्यानंतर तीन आठवड्यांनंतर ही घडामोड घडली.

विशेष न्यायाधीश त्रिपाठी यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, तपासात असे दिसून आले आहे की, इस्लामिक कट्टरपंथी न्यायाधीश दिवाकर यांच्या हत्येचा कट रचत आहेत. हा एक संवेदनशील मुद्दा असून, अदनान खानच्या कारवायांवर नियंत्रण ठेवले नाही तर काही अनुचित घटना घडू शकते. विशेष म्हणजे न्यायाधीश दिवाकर हे आता बरेली येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश आहेत. यापूर्वी त्यांनी उत्तर प्रदेशच्या मुख्य सचिवांना पत्र लिहून त्यांच्या सध्याच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली होती. इस्लामिक कट्टरतावादी अल्पसंख्याक समुदायाचे ब्रेनवॉश करत असून, त्यांना काफिर ठरवून त्यांच्या जीवाला धोका निर्माण करत आहेत, असे त्यांनी या पत्रात म्हटले होते.

जून २०२२ पासून न्यायाधीश दिवाकर यांना धमक्या येत आहेत. वाराणसी पोलिसांनी इस्लामिक आगाज मूव्हमेंटच्या अध्यक्षांच्या धमकीच्या पत्राची चौकशी केली होती. धमकीच्या पत्रात त्यांचे कुटुंब आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्ह टिप्पण्या होत्या, त्यामुळे त्यांची सुरक्षा वाढवण्यात आली होती.

## २४ हजार कोटींचे हवे विशेष पॅकेज

# केरळला हवी आर्थिक मदत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केरळमधील डाव्या सरकारने केंद्राकडे पुन्हा एकदा आर्थिक मदतीसाठी आवाहन केले आहे. आर्थिक गैरव्यवस्थापनाचा फटका बसलेल्या केरळने २४ हजार कोटींचे विशेष पॅकेज देण्यात यावे, अशी केंद्र सरकारकडे मागणी केली आहे. वित्तीय संकटाशी सामना करण्यासाठी या निधीचा वापर केला जाईल, असे केरळने म्हटले आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, केरळचे अर्थमंत्री केएन बालगोपाल यांनी नवी दिल्ली येथे झालेल्या अर्थसंकल्पीय बैठकीत ही मागणी केली. नवीन सरकारचा पूर्ण अर्थसंकल्प सादर होण्यापूर्वी राज्यांसोबत ही बैठक





झाली. या बैठकीत केरळसह इतर राज्यांनीही सहभाग घेतला होता.

केरळचे अर्थमंत्री केएन बालगोपाल म्हणाले की, त्यांच्या राज्याला दोन वर्षांसाठी मदत द्यावी, जेणेकरून ते आर्थिक संकटाशी लढू शकतील. २४ हजार कोटींव्यतिरिक्त, केरळने विझिंजम बंदराच्या विकासासाठी ५ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. केरळ सरकार आपला खर्च भागवू शकेल यासाठी बाजारातून आणखी कर्ज घेण्याची परवानगी द्यावी, अशीही केरळची मागणी आहे.

मे महिन्यात केरळला २१,२५३ कोटी रुपयांचे अतिरिक्त कर्ज घेण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली होती. मात्र, तरीही केरळला वित्तीय संकटातून बाहेर पडण्यासाठी आणखी २४ हजार कोटी हवे आहेत.

## बिभव कुमारच्या कोठडीत वाढ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आपच्या राज्यसभा खासदार स्वाती मलिवाल मारहाण प्रकरणी नवी माहिती मिळाली आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी स्वाती यांना झालेल्या मारहाणीतील प्रमुख आरोपी बिभव कुमार याच्या न्यायालयीन कोठडीत ६ जुलैपर्यंत वाढ करण्यात आली.

या प्रकरणात दि. ३१ मे रोजी चौकशी केल्यानंतर बिभव कुमार याची रवानगी कोठडीत करण्यात आली होती. त्यानंतर महानगर दंडाधिकारी गौरव गोयल यांनी या कोठडीत वाढ केली.

स्वाती मालीवाल यांच्या तक्रारीनंतर दिल्ली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. त्यानंतर आरोपीला १८ मे रोजी दिल्ली पोलिसांनी अटक केली होती.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## महताब यांच्या नियुक्तीने वादंग

**केंद्र सरकारने** लोकसभेच्या हंगामी अध्यक्षपदी ओडिशाचे खासदार भर्तृहरी महताब यांची नियुक्ती केल्यानंतर नव्या वादाला तोंड फुटले असून, केरळचे के सुरेश यांची या पदी नियुक्ती व्हावी, अशी विरोधकांची मागणी आहे. त्याचवेळी हंगामी अध्यक्षांना मदत करण्यासाठी नियुक्त समितीत रहायचे का नाही, याचा निर्णय इंडिया आघाडीच्या बैठकीत घेतला जाईल, असे सुरेश यांनी म्हटले आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नवनिर्वाचित खासदारांना शपथविधी करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीत सुरेश यांचा समावेश आहे. आठ वेळा खासदारपदी असलेल्या के सुरेश यांना डावलून महताब यांची नियुक्ती करण्यात आली, असा विरोधकांचा आक्षेप आहे. सुरेश यांच्यासह द्रमुक खासदार टीआर बालू, तृणमूल काँग्रेसचे सुदीप बंडोपाध्याय आणि भाजपचे राधामोहन सिंग आणि फग्गनसिंग कुलस्ते यांचा यात समावेश आहे. विरोधकांच्या दाव्यांचे खंडन करताना, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले की महताब हे सलगपणे सात वेळा खासदार असल्याने, ते या पदासाठी पात्र ठरले. सुरेश १९९८ आणि २००४ मध्ये निवडणुकीत पराभूत झाले होते. त्यांचा सध्याचा कार्यकाळ सलग चौथा आहे. यापूर्वी ते १९८९, १९९१, १९९६ आणि १९९९ मध्ये लोकसभेवर निवडून गेले होते.सोमवारपासून सुरू होणाऱ्या अठराव्या लोकसभेच्या पहिल्या सत्रात नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आणि त्यानंतर २६ जून रोजी लोकसभा अध्यक्षांची निवड आणि २७ जून रोजी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू संबोधित करतील.

» Selected

## हमास समर्थक लेबनॉनमध्ये

**बेरुत :** इस्रायलविरोधात लढण्यासाठी लेबनॉनमध्ये येण्यासाठी हजारो इराणी समर्थक तयार असून, इस्रायल-हमास संघर्षाला तोंड फुटल्यानंतर, लेबनॉनच्या उत्तर इस्रायलच्या सीमेवर दररोज चकमकी उडत आहेत. दक्षिण लेबनॉनमध्ये इस्रायलच्या हल्ल्यात हिजबुल्लाहचा वरिष्ठ दहशतवादी ठार झाल्यानंतर, उत्तर इस्रायल सीमेवर हिजबुल्लाहने इस्रायलविरोधात आघाडी उघडली आहे. हिजबुल्लाहने प्रत्युत्तर म्हणून उत्तर इस्रायलवर शेकडो क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले आहेत. हिजबुल्लाह या दहशतवादी संघटनेला दूर न केल्यास, लेबनॉनमध्ये लष्करी कारवाई करण्याचा इशारा इस्रायली अधिकाऱ्यांनी दिला आहे. त्याचवेळी, लेबनॉन-इस्रायल सीमेवर युद्ध सुरू झाल्यास या भागातील इराणी समर्थक दहशतवादी या लढ्यात सहभागी होतील, असे संबंधित अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

## सूरज रेवण्णालाही अटक

**बंगळूर :** हसनमधील लैंगिक शोषण प्रकरणी कर्नाटक पोलिसांनी आणखी एकाला अटक केली. जेडीएसचे सूरज रेवण्णा यांना



पोलिसांनी ताब्यात घेतले असून, यापूर्वी त्यांचा भाऊ प्रज्वल याच्यावर कारवाई झाली आहे. महिलांच्या लैंगिक शोषणाचा आरोप खासदार प्रज्वल रेवण्णा याच्यावर आहे. सूरज विरोधात जेडीएसच्या एका कार्यकर्त्याने आरोप केला आहे. मात्र, ५ कोटी रुपये न दिल्याने, तक्रारदाराने हा बनाव केल्याचा आरोप सूरजच्या मित्राने केला आहे.

## युरोपही तापले...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**रोम :** इटलीमध्येही उष्णतेची लाट आली असून, तेथील नागरिक उष्म्याची तीव्रता कमी करण्यासाठी अशा उपायांचा अवलंब करत आहेत.

पान १ वरून

## बेफाम कारने दुचाकीला उडवले

मिळालेल्या माहितीनुसार, मयूर महामार्गावरून नारायणगावहून खेडकडे जाताना विरुद्ध दिशेने सुसाट गाडी चालवत होता. त्यावेळी समोरून आलेल्या दोन दुचाकीस्वारांना त्याच्या भरधाव कारने धडक दिली. अपघात इतका भीषण होता, की दुचाकी हवेत उडाली आणि दुचाकीवरील तरुण रस्त्याच्या कडेला जाऊन पडले. यापैकी एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला. दुसरा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मयूरने मद्यपान केले होते, तसेच अपघातानंतर पळ काढला, असा आरोप स्थानिकांनी केला आहे. पण मयूरचे काका आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी सर्व आरोप फेटाळताना सांगितले की, मयूर इंजिनिअर आणि उद्योजक आहे. आजवर त्याने कधीच दारूला स्पर्श केलेला नाही. तो घटनास्थळावरून पळूनही गेला नाही.

### बेफाम अन् बेदरकार

● मयूर मोहिते वेगात आणि बेदरकारपणे गाडी चालवत होता, असे प्रत्यक्षदर्शींचे म्हणणे आहे. त्याने रस्त्याच्या डाव्या बाजूने गाडी चालवणे अपेक्षित असताना त्याची गाडी रस्त्याच्या उजव्या बाजूला आली आणि तिने दुचाकीला जोरदार धडक दिली. दुचाकीचा पार चक्काचूर झाला. दुचाकीचे पार्ट्स तब्बल २० फुट अंतरापर्यंत विखुरले होते. प्रथमदर्शनी तरी अपघात मयूर मोहिते याच्याच चुकीमुळे झाल्याचे बोलले जात आहे.

### प्रत्यक्षदर्शी म्हणतात, तर कदाचित ओमचा जीव वाचला असता

● अपघात झाला, त्यावेळी त्या दुचाकीच्या केवळ दीडशे ते दोनशे फूट मागे माझी गाडी होती. आमच्या पुढे दुचाकी होती. अपघात झालेल्या व्यक्तीला मदत मिळावी म्हणून मी तत्काळ गाडी बाजूला घेऊन गाडीतून बाहेर उतरलो. ओमच्या गाडीला धडक देणाऱ्या व्यक्तीला मी सांगितले की, त्याला रुग्णालयात घेऊन चला. तोपर्यंत आणखी काही लोक जमा झाले होते. आम्ही सातत्याने मयूरला त्या तरुणाला रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी विनवण्या करत होतो, पण त्याच्याकडून काहीच प्रतिसाद मिळत नव्हता. ॲम्ब्युलन्स येण्यासाठी फार वेळ लागला. आमदाराच्या पुतण्याने जर वेळीच ओमला मदत केली असती, तर कदाचित त्याचा जीव वाचला असता.

### जामीनाचा मार्ग मोकळा!

● गुन्हा दाखल झाल्यानंतर काही तासांतच मयूरची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. ३०४ कलमाअंतर्गत गुन्हा दाखल झाला, तरीही पोलीस कोठडी न मिळाल्याने पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त होत आहे. अपघाताची घटना घडल्यापासूनच मंचर पोलिसांच्या भूमिकेवर संशय घेतला जात होता. मयूरची पोलीस कोठडी मिळविण्यात मंचर पोलीस अपयशी ठरल्याने त्याला पुष्टी मिळाली. अपघातानंतर काही तासांतच मयुरच्या जामीनाचा मार्ग मोकळा झाला आहे. पोलिसांनी कठोर कलमे लावून, न्यायालयात भक्कम बाजू मांडली असती तर मयूरला पोलीस कोठडी मिळाली असती. सुरुवातीपासून पोलीस दबावाखाली काम करत असल्याचे बोलले जात होते.

## नीट परिक्षा पुढे ढकलली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** रविवारी होणारी नीट-पीजी प्रवेश परीक्षा पुढे ढकलण्यात आली असून, या परीक्षेची नवी तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. आरोग्य मंत्रालयाकडून ही माहिती देण्यात आली. काही स्पर्धा परीक्षांमध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप झाला असून, आरोग्य मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे.

आरोग्य मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे की, खबरदारीचा उपाय म्हणून हे पाऊल उचलण्यात आले आहे. रविवारी होणारी नीट-पीजी प्रवेश परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, या परीक्षेची नवी तारीख लवकरात लवकर जाहीर केली जाईल. विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेत, आरोग्य मंत्रालयाने खेद व्यक्त केला आहे. मात्र, हा निर्णय विद्यार्थ्यांच्या हिताचा आहे. परीक्षा प्रक्रियेचे पावित्र्य राखण्यासाठी हे आवश्यक होते, असेही मंत्रालयाने म्हटले आहे.

## टोमॅटोची उसळी; किलोला...

किरकोळ बाजारातही चढ्या भावाने टोमॅटोची विक्री होत आहे. पाव किलोला ३० रुपये मोजावे लागत आहेत तर किलोला शंभरीचा भाव मिळत आहे. घरात प्रत्येक भाज्यांमध्ये टोमॅटो वापरला जातो. त्यामुळे स्वयंपाक घरातील महत्त्वाचा हा घटक असलेला टोमॅटो महागल्याने याचा फटका गृहिणींना बसत आहे. टोमॅटो सामान्यांचे बजेट सध्या कोलमडत आहे. उन्हाळी हंगाम आणि पावसाळी हंगाम या दोन्ही हंगामातील काळात टोमॅटोचे भाव नेहमीच वाढत असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. अर्थात, उन्हाळी टोमॅटो पीक संपल्यानंतर वाढत्या उष्णतेमुळे आणि पावसाचा काहीसा विलंब झाल्यास नवीन पावसाळी हंगामातील टोमॅटो पीक बाजारात येण्यास उशीर लागतो. परिणामी, या काळात नेहमीच टोमॅटोचे दर तेजीत असतात.

### उत्पादक शेतकऱ्यांना अच्छे दिन

● टोमॅटोच्या दरात झालेली वाढ ही शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे. मात्र, ग्राहकांना याचा फटका बसत आहे. टोमॅटो हे रोजच्या जेवणात वापरले जाणारे एक अत्यंत आवश्यक घटक आहे. टोमॅटोच्या दरात झालेली वाढ ही सर्वसामान्य ग्राहकांसाठी खिशावर बोजा ठरत आहे. याचा ग्राहकांना जरी फटका बसत असला तरी टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना अच्छे दिन आले आहेत.

## किल्ले सिंहगडावर पालखी...

आयोजित विराट दुचाकी रॅलीने झाला. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नरवीर तानाजी मालुसरे यांच्या शिल्पाचे पूजन झाले. यावेळी सरदार जेधे घराण्याचे वंशज दिग्विजय जेधे, समितीचे अध्यक्ष किशोर चव्हाण, उपाध्यक्ष शरद जगताप यांसह शिवभक्त उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीस अभिषेक तसेच नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीचे आणि सिंहगडावरील मंदिरे व ऐतिहासिक ठिकाणांचे पूजन झाले.

पान १ वरून

## मुस्लिम कुणबींनाही आरक्षण द्या : जरांगे

आम्हीदेखील शेतकरी मराठा आहोत. तुम्ही त्यांचे लाड खूप पुरवले. आमचा त्यांना विरोध नाही. तुम्हाला सर्वकाही संविधानानं हवे आहे ना, मग आम्हाला उत्तरे द्या. तुम्ही व्यवसायाच्या आधारावर आरक्षण कसे दिले?" असा प्रश्न मनोज जरांगे यांनी केला.

काही ठिकाणी मुस्लीम समाजासह लिंगायत, मारवाडी, ब्राह्मण, लोहार या समाजाच्याही कुणबी म्हणून नोंदी निघाल्या आहेत. सरकारदरबारी हे कुणबी शेतकरी असल्याच्या नोंदी निघाल्या असतील तर मुस्लिमांनाही ओबीसीतूनच आरक्षण मिळायला हवे. त्यांच्यावरही अन्याय व्हायला नको. पाशा पटेल यांची कुणबी म्हणून नोंद निघाली आहे. हे आरक्षण कसं मिळत नाही, तेच मी बघतो, असे थेट आव्हानही जरांगे यांनी राज्य सरकारला दिले.

## कुणबी नोंदी असतील तर कोण...

ते म्हणाले, "खानदेशी कुणबी गिरणा नदीच्या काठावर राहतात. खऱ्या कुणबी समाजाचे राहणीमान वेगळे आहे. जर हिंदू कासार ओबीसीतून आरक्षण घेऊ शकतो. तर मुस्लिम कासारही त्या ठिकाणी जाऊन चौकशी करू शकतो. ते हाताने कुणबी लिहिताहेत. वसंतराव नाईक महामंडळाला निधी मिळत नाही, महाज्योतीला निधी मिळत नाही. आरक्षण एकमेव उपाय नाही."

उद्या तुम्हाला पंचायतराजमध्ये पण प्रतिनिधित्व मिळणार नाही. ओबीसी बांधवांनो, तुम्हाला आम्हाला सोबत यावे लागेल. हे राजकारणी काही करणार नाही. आता आम्ही महाराष्ट्रात लोकचळवळ उभी करणार आहोत. घटना समतेचे तत्त्व सांगते. हे समानतेला पायदळी तुडवतात. शिवाजी महाराज सगळ्यांना मावळा म्हणायचे. त्यात सगळ्या जाती धर्माचे लोक होते. त्यांनी कधी जातीभेद केला नाही, असेही हाके यांनी म्हटले आहे.

जी गोष्ट आडात नाही, ती पोहऱ्यात येणार नाही. कोणी तरी माणूस उठतो आणि इथली व्यवस्था वेठीस धरतो. जरांगे यांनी जनतेच्या दरबारात जावे. मुख्यमंत्री आमदार, खासदार कधी तुमचे नव्हते, असे म्हणत हाके यांनी जरांगे यांच्यावर टीका केली आहे.

## गाझा पट्टीत निर्णायक लष्करी कारवाई

# इस्रायलच्या हल्ल्यात ३९ जण ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गाझा :** गाझाच्या उत्तर भागात इस्रायलने केलेल्या हल्ल्यात ३९ जण ठार झाले आहेत, अशी माहिती पॅलेस्टिनी आणि रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी दिली. इस्रायलने गाझा पट्टीत केलेल्या कारवाईत हे बळी पडल्याचा आरोप पॅलेस्टिनींनी केला आहे.

दरम्यान, इस्रायलने असा दावा केला आहे की, त्यांच्या लढाऊ विमानांनी गाझा सिटी परिसरातील हमासच्या दोन लष्करी तळांवर हल्ले केले, नागरी वसाहतींवर हे हल्ले करण्यात आले नव्हते, असा इस्रायलने दावा केला आहे.

दक्षिणेकडील रफा शहराजवळ निर्वासितांच्या छावण्यांवर झालेल्या हल्ल्यात २५ जण ठार, तर ५० जण



जखमी झाले होते.

इस्रायलच्या म्हणण्यानुसार, इस्रायली सैन्य मध्य आणि दक्षिण गाझामध्ये कार्यरत असून, रफाहवर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात येत आहे. रफाह येथून १० लाखांहून अधिक पॅलेस्टिनींनी इतरत्र आसरा शोधला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या दाव्यानुसार, गाझामधील कोणतीही जागा सुरक्षित नाही आणि मानवतावादी परिस्थिती येथे गंभीर आहे. अन्न, पाणी तसेच पुरेशी वैद्यकीय मदतही पॅलेस्टिनींना मिळत नाही, असे संयुक्त राष्ट्राने म्हटले आहे.

७ ऑक्टोबरला हमास या दहशतवादी संघटनेने इस्रायलवर आजवरचा सर्वोत मोठा दहशतवादी हल्ला केल्यानंतर, इस्रायलने गाझा पट्टीत लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

हमासच्या दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात १,२०० पेक्षा जास्त इस्रायली नागरिक मारले गेले, तर २५० नागरिकांना हमासने ओलिस म्हणून ताब्यात ठेवले होते. गाझा पट्टीवर इस्रायलने केलेल्या कारवाईत, आतापर्यंत ३७ हजारांपेक्षा जास्त पॅलेस्टिनी ठार झाले आहेत.

#रा

'अफगाणिस्तान संघ आज चांगला क्रिकेट खेळला. आम्ही त्यांना १२० पर्यंत मर्यादित करू शकलो असतो. पण त्याने कदाचित २० धावा जास्त केल्या. या स्पर्धेत अनेक संघांनी प्रथम गोलंदाजी केली आहे. नाणेफेक जिंकणे किंवा हरणे याने फरक पडत नाही. पण आम्ही मैदानावर चांगली कामगिरी केली नाही हे मान्य करतो. आज आमचा दिवस नव्हता.

-मिचेल मार्श



Nippon india Mutual Fund
Wealth sets you free
Mutual Fund Investor Awareness Program
To increase awareness about Mutual Funds, we conduct Investor Awareness Programmes (IAPs) across the country. Schedule of upcoming IAP is as mentioned below:

| Date | Time | Location |
|---|---|---|
| 24th June, 2024 | 06:30 pm | Pune |

Venue: Hotel Kalasagar, Old Mumbai Pune Highway, Opp SBI Treasury Branch, Kasarwadi, Pune - 411034.
Name: Rishabh Shroff | Mob. No.: 8976969241
Nippon Life India Asset Management Limited | CIN : L65910MH1995PLC220793
Good gets better
Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

# ऑस्ट्रेलियाच्या सेमीफायनलच्या आशांवर पडणार पावसाचं पाणी?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**युएसए :** टी-२० वर्ल्ड कप २०२४ स्पर्धेत अफगाणिस्तानने मोठा उलटफेर केला आहे. त्यांनी माजी विजेत्या ऑस्ट्रेलिया संघाला सुपर-८ च्या सामन्यात २१ धावांनी पराभूत केले. त्यामुळे आता सुपर-८ मधून उपांत्य फेरी गाठण्याची शर्यत आणखी रोमांचक झाली आहे.



आता सुपर-८ मध्ये अ ग्रुपमधील भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया संघात होणाऱ्या सामन्याकडे सर्वांचेच लक्ष आहे. हा सामना सोमवारी (२४ जून) डॅरेन सॅमी नॅशनल क्रिकेट स्टेडियम, ग्रॉस आयलेट, सेंट ल्युसिया येथे हा सामना खेळवला जाणार आहे. हा सामना स्थानिक वेळेनुसार सकाळी १०.३० वाजता, तर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८ वाजता खेळवला जाणार आहे.

दरम्यान, सोमवारी सेंट ल्युसियामध्ये पावसाची शक्यता आहे. तसेच सामन्याच्या वेळेतही तिथे ढगाळ वातावरण असणार आहे. त्याचबरोबर पावसाची शक्यताही आहे. AccuWeather च्या रिपोर्टनुसार सामन्यादरम्यान शनिवारी ३० टक्क्याच्या आसपास पावसाची शक्यता आहे.

त्यामुळे सामन्यादरम्यान पावसाचा अडथळा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर पावसामुळे सामन्यात अडथळा आला, तर डकवर्थ लुईस नियमाचाही वापर होऊ शकतो. तसेच पावसामुळे सामना शक्य झाला नाही, तर मात्र सामना रद्द होऊ शकतो.

जर सामना रद्द झाला, तर भारत आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांना प्रत्येकी १ गुण दिला जाईल. यासह भारतीय संघ एकूण ५ गुणांसह उपांत्य फेरीत प्रवेश पक्का करेल, तर ऑस्ट्रेलियाला मात्र बांगलादेशने अफगाणिस्तानला पराभूत करावे अशी अशा बाळगावी लागेल.

कारण सध्या ऑस्ट्रेलियाने सुपर-८ मध्ये २ सामन्यांपैकी १ विजय आणि १ पराभवासह २ गुण मिळवलेले आहेत.

### कसे आहे एकूण समीकरण

● सध्या सुपर-८ मधील अ ग्रुपमध्ये भारतीय संघ दोन विजयांमुळे ४ गुणांसह अव्वल क्रमांकावर आहे. तर ऑस्ट्रेलिया चांगल्या नेट रन रेटमुळे अफगाणिस्तानच्या पुढे दुसऱ्या क्रमांकावर आहे. अफगाणिस्तान तिसऱ्या क्रमांकावर आहेत, तर बांगलादेश दोन्ही पराभवांमुळे शून्य गुणांसह शेवटच्या क्रमांकावर आहे.

## कुस्तीपटू बजरंग पुनिया पुन्हा निलंबित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय कुस्तीपटू बजरंग पुनियाला पुन्हा एकदा मोठा झटका बसला आहे. पुनिया यांना पुन्हा एकदा नॅशनल एन्ट्री डोपिंग एजन्सीने (नाडा) तात्पुरते निलंबित केले आहे. गेल्या वेळी जेव्हा NADA ने बजरंगला निलंबित केले होते, तेव्हा त्याला नोटीस न बजावल्यामुळे त्याचे निलंबन शिस्तपालन समितीने मागे घेतले होते. मात्र आता निलंबनासोबतच नाडाने पुनियाला नोटीसही बजावली आहे. NADA च्या म्हणण्यानुसार, बजरंगने १० मार्च रोजी सोनीपतमध्ये झालेल्या चाचण्यांदरम्यान त्याच्या लघवीचा नमुना देण्यास नकार दिला होता. त्यामुळे त्याच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. बजरंगचे वकील विष्णुपत सिंघानिया यांनी आज तकशी बोलताना सांगितले की, 'होय, आम्हाला नोटीस मिळाली आहे आणि आम्ही त्याचे उत्तर नक्कीच देऊ.



## अफगाणिस्तानने चॅम्पियन ऑस्ट्रेलियाच्या ठेचल्या नांग्या

**युएसए :** टी-२० वर्ल्ड कपच्या ४८ व्या सामन्यात अफगाणिस्तानने ऑस्ट्रेलियाला पराभूत करून इतिहास रचला आहे. अफगाणिस्तानने आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रथमच ऑस्ट्रेलियाचा पराभव केला आहे. प्रथम फलंदाजी करताना अफगाणिस्तान संघाने १४८ धावा केल्या, ज्याच्या प्रत्युत्तरात कांगारू संघ अवघ्या १२७ धावांवर ऑलआऊट झाला आणि सामना २१ धावांनी गमावला. या विजयासह अफगाणिस्तानने उपांत्य फेरीत जाण्याच्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या अफगाणिस्तान संघांनी चांगली सुरुवात केली. रहमानउल्ला गुरबाज आणि इब्राहिम झद्रान यांनी पुन्हा एकदा शतकी भागीदारी केली. दोन्ही फलंदाजांनी मिळून पहिल्या विकेटसाठी ११८ धावांची भागीदारी केली. गुरबाजने ६० धावांची खेळी खेळली आणि इब्राहिम झद्राानने ५१ धावा केल्या. मात्र त्यानंतर अफगाणिस्तानच्या फलंदाजांना चांगल्या सुरुवातीचा फायदा उठवता आला नाही आणि त्यांना २० षटकात केवळ १४८ धावा करता आल्या. मधल्या फळीत करीम जनातने १३ आणि मोहम्मद नबीने १० धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियासाठी पॅट कमिन्सने या स्पर्धेत सलग दुसरी हॅटट्रिक घेतली आणि एकूण ३ बळी घेतले. यावेळी अफगाणिस्तानने ऑस्ट्रेलियाविरुद्ध २०२३ च्या वनडे वर्ल्ड कपमधील पराभवाचा बदला घेतला आहे. या पराभवामुळे कांगारू संघ संपुष्टात येण्याचा धोका निर्माण झाला आहे. कारण त्यांचा पुढील सामना भारतीय संघाशी होणार आहे. ज्याने आतापर्यंत स्पर्धेत एकही सामना गमावला नाही.

## भारताच्या गटातील समीकरणे बदलली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**युएसए :** आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये अफगाणिस्तानने ऐतिहासिक कामगिरी करत ऑस्ट्रेलियाचा २१ धावांनी पराभव केला. २३ जून (रविवार) किंग्सटाउनच्या अर्नोस वेल ग्राउंडवर झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला विजयासाठी १४९ धावा करायच्या होत्या, परंतु त्यांचा संपूर्ण संघ १९.५ षटकात १२७ धावांवरच मर्यादित राहिला.

अफगाणिस्तानच्या ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या विजयामुळे सुपर ८ मधील ग्रुप-२ चे समीकरण पूर्णपणे बदलले आहे. या गटातील चारही संघ अजूनही उपांत्य फेरीच्या शर्यतीत आहेत.

मात्र, या गटातून दोनच संघांना उपांत्य फेरीत जाण्याची संधी मिळणार आहे. ऑस्ट्रेलियाने अफगाणिस्तानला हरवले असते तर भारत आणि ऑस्ट्रेलिया हे दोन्ही संघ उपांत्य फेरीत पोहोचले असते. पण हे होऊ शकले नाही. अफगाणिस्तानच्या विजयामुळे बांगलादेशलाही थोडा दिलासा मिळाला आहे.




## कुलदीप यादवनं बांगलादेशला नाचवलं

# भारत अपराजीत!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**युएसए :** भारताने विजयासाठी १९७ धावांचे आव्हान बांगलादेशला पेलवलं नाही. भारताचा फिरकीपटू कुलदीप यादवने भेदक मारा करत बांगलादेशच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. भारताने सामना ५० धावांनी जिंकला. भारत आता सुपर ८ च्या ग्रुप १ मध्ये ४ गुणांसह अव्वल स्थानावर पोहचला आहे.

बांगलादेशला २० षटकात ८ बाद १४५ धावांपर्यंतच मजल मारता आली. कुलदीपने ४ षटकात १९ धावा देत ३ विकेट्स घेतल्या. तर जसप्रीत बुमराह आणि अर्शदीपने २ विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली. हार्दिकने देखील एक एक विकेट घेत चांगला मारा केला. बांगलादेशकडून कर्णधार नजमुल हुसैन शन्तोने सर्वाधिक ४० धावा केल्या.



भारताने बांगलादेशविरूद्धच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आक्रमक शैलीत सुरूवात केली. रोहित शर्मा आणि विराट कोहलीने ३ षटकात ३९ धावा केल्या. मात्र त्यानंतर रोहित शर्मा १० चेंडूत २३ धावा करून बाद झाला.

पाठोपाठ विराट कोहली देखील ३७ धावांवर बाद झाला. सूर्याही आल्या आल्या एक षटकार मारून माघारी फिरला. भारताची अवस्था ३ बाद ७७ धावा अशी झाली. यानंतर ऋषभ पंतने भारताला शतकी मजल मारून दिली. मात्र तोही ३६ धावा करून बाद झाला.

## ज्योती-आदिती-परनीतने इतिहास घडवला

**अंतल्या (तुर्कस्तान) :** जागतिक तिरंदाजीतील कंपाउंड प्रकारात अव्वल स्थानावर असलेल्या भारतीय महिला संघाने विश्वकरंडक तिरंदाजी स्पर्धेत सुवर्णपदकाची हॅट्ट्रिक केली. ज्योती सुरेखा, आदिती स्वामी आणि परनीत कौर या त्रिमूर्तींनी हा इतिहास घडवला. तुर्कस्थान येथे झालेल्या या विश्वकरंडक तिरंदाजी (स्टेज ३) स्पर्धेत ज्योती-आदिती-परनीत या भारतीय महिला संघाने अंतिम सामन्यात सहाव्या मानांकित इस्तोनिया संघाचा २३२-२२९ असा पराभव केला. २०२४ मधील ही तिसरी विश्वकरंडक स्पर्धा आहे. यंदाच्या वर्षात शांघाय आणि येंचॉन येथे झालेल्या स्पर्धेतही भारतीय महिला संघाने सुवर्णपदकाचा सन्मान मिळवला होता. तुर्कस्थान येथे आज स्पर्धेचा तिसरा टप्पा (स्टेड ३) पार पडला. भारताच्या या महिला संघाला पहिल्या फेरीत केवळ १० संघ असल्यामुळे पुढे चाल मिळाली. त्यानंतर अंतिम फेरी गाठताना त्यांनी अल साल्वादोर संघावर २३५-२२७ आणि तुर्कस्थानचा २३४-२२७ असा पराभव केला.



# खेलो इंडिया निवड कार्यक्रमाला उस्फूर्त प्रतिसाद



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** संपूर्ण पश्चिम भारतातील युवा क्रीडा प्रतिभेला वाव देण्याच्या उद्देशाने भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) वतीने येथील एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग पुणे, येथे आयोजित खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन (कीर्ती) कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद लाभत आहे.या कार्यक्रमाअंतर्गत 'एमआयटी एडीटी' विद्यापीठातील सुसज्ज अशा क्रीडा संकुलात आत्तापर्यंत शेकडो विद्यार्थ्यांनी आपली क्रीडा प्रतिभा दाखवली आहे.

शनिवारी मोठ्या उत्साहात बॉक्सिंग क्रीडा प्रकाराचे उद्‌घाटन झाले. ज्यानंतर विद्यार्थ्यांची साईच्या अधिकाऱ्यांकडून विविध स्वरांवर चाचणी घेण्यात आली. भारत सरकारच्या या निवड प्रक्रियेसाठी पुण्यासह राज्यभरातील असंख्य विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करताना विद्यापीठात पालकांसह धाव घेतली आहे. तसेच, त्यांनी विद्यापीठातील क्रीडा सुविधांची स्तुती करताना कर्मचाऱ्यांनी केलेल्या पाहुणचाराबद्दल समाधान व्यक्त केले.

आता २३ जून रोजी ॲथलेटिक्स, २४ जून रोजी फुटबॉल आणि खो-खो तर अखेरच्या २५ जून रोजी कबड्डी आणि व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारांसाठी खेळाडूंचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. तरी अद्यापही या निवड चाचणी कार्यक्रमात राज्यातील युवा व प्रतिभावान खेळाडूंनी आवर्जून भाग घ्यावा, व नोंदणीसाठी श्री. सुनील मोरे यांच्याशी ९७६३३९८१३६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन 'एमआयटी एडीटी' विद्यार्थी कल्याण विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.सुरज भोयार, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त क्रीडा विभाग संचालक प्रा.पद्माकर फड यांनी केले आहे.

## धोनी, विराट अन् रोहित लागले एकत्र नाचायला,

**नवी दिल्ली :** टी-२० वर्ल्ड कप २०२४ मधील सुपर-८ फेरीत भारतीय संघाने बांगलादेशला ५० धावांनी पराभूत केले. या विजयासह भारतीय संघाने उपांत्य फेरीत पोहण्यासाठी प्रबळ दावेदारी ठोकली आहे. दरम्यान, या विजयानंतर भारताचा यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंतने एक मजेशीर रिल शेअर केला आहे, ज्याबद्दल सध्या जोरदार चर्चा आहे. पंतने इंस्टाग्रामवर जे रिल शेअर केले आहे, ती एक मीम पोस्टआहे. हे रिल त्याने बनवलेले नसल्याचे त्याने स्पष्ट केले असून ते त्याच्या इंस्टाग्राम फीडला आले होते, जे त्याने शेअर केले आहे. या व्हिडिओमध्ये दिसले की माजी कर्णधार एमएस धोनी, विराट कोहली आणि रोहित शर्मा नाचत आहेत. या रिलला 'बरसो रे' हे गाणे बॅकग्राऊंडला वाजत आहे. हे रिल शेअर करत पंतने कॅप्शनमध्ये विराट, रोहित आणि धोनी यांना प्रेमाने भैय्या म्हणत त्यांची माफीही मागितली आहे. पंतने लिहिले की 'चांगला विजय. सॉरी सारे भैय्या लोकांना. पण हा शानदार व्हिडिओ मला पोस्ट करावाच लागला. ज्याने कोणी हे बनवलं त्याचे आभार, माझे पहिले स्क्रिन रेकॉर्डिंग.' या रिलवर युजर्सच्या अनेक प्रतिक्रिया येत आहेत.

## क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत ऑलिम्पिक दिन साजरा

# मिशन लक्षवेधच्या माध्यमातून १२ खेळांवर लक्ष केंद्रित करणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. खेळाडूंना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनद्वारा सर परशुराम महाविद्यालयात आयोजित ऑलिम्पिक दिन समारंभ प्रसंगी श्री. बनसोडे बोलत होते. यावेळी क्रीडा व युवक कल्याण विभागाचे सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक सुहास पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे महासचिव नामदेव शिरगावकर, उपाध्यक्ष प्रदीप गंधे, राजीव गांधी खेल रत्न पुरस्कार विजेते धनराज पिल्ले, अर्जुन पुरस्कार विजेती अंजली भागवत आदी उपस्थित होते.

श्री.बनसोडे म्हणाले, खेलो इंडिया राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये राज्यातील खेळाडूंनी प्रशंसनीय कामगीरी केली आहे. खेलो इंडियात ५७ सुवर्ण पदकांसह १५८ पदके प्राप्त केलीत.



आशियाई खेळातही ३४ पदके प्राप्त केलीत. खेळाडूंच्या हितासाठी, त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कारात भरीव वाढ केली आहे.

मिशन लक्षवेधच्या माध्यमातून १२ खेळावर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून तालुका जिल्हा स्तरावर सर्व संघटनांना विश्वासात घेऊन या बाबतच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यात येईल. राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पदक जिंकण्याची क्षमता असलेल्या खेळाडूंना प्रोत्साहीत करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत असून पुण्यातील म्हाळुंगे-बालेवाडीच्या शिवछत्रपती क्रीडा संकूल येथील ऑलिम्पिक भवन इमारतीचे बांधकाम सुरू आहे.

ऑलिम्पिक खेळासाठी राज्यातून चांगले खेळाडू तयार झाले पाहिजेत. त्यासाठी सर्व संघटनांना एकत्रित करून बैठक घेवून खेळाडूंच्या आणि संघटनांच्या अडी अडचणी सोडविण्यात येतील. राज्यात क्रीडासंस्कृती रुजविण्यासाठी भरीव तरतूद करण्यात येत आहे. तालुका क्रीडा संकुलासाठी ५ कोटी, जिल्हा क्रीडा संकुलासाठी ५० कोटी तर विभागीय क्रीडा संकुलासाठी ७५ कोटी रुपयांचा निधी देण्यात येत आहे. आशियाई खेळात सुवर्ण पदक विजेत्या स्पर्धकांना १ कोटी, रौप्य पदक विजेत्या स्पर्धकांना ७५ लाख तर काश्य पदक विजेत्या स्पर्धकांना ५० लाख रुपयांचा पुरस्कार देण्यात येत आहे, असे श्री.बनसोडे म्हणाले.

खेळाडूंनी राज्याची प्रतिमा उंचावण्यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहन करून त्यांनी जागतिक ऑलिम्पिक दिनाच्या निमित्ताने राज्यातील सर्व खेळाडूंना क्रीडा संघटनांना, क्रीडा कार्यकर्त्यांना आणि क्रीडाप्रेमी नागरिकांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविकात श्री. शिरगावकर यांनी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या कार्याची माहिती दिली.यावेळी योगा, जिम्नॅस्टिक, वुशू (चीनी मार्शल आर्ट्स) बॉक्सिंग, किक बॉक्सिंग, तायक्वांदो, मर्दानी खेळ आदी खेळांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. तसेच पद्मश्री धनराज पिल्ले, अंजली भागवत यांच्यासह इतर यशस्वी खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. #रा